नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७१वे

ऑक्टोबर । नोव्हेंबर । डिसेंबर २०१६



अनुक्रमणिका

अभिनंदन



डॉ. अक्षयकुमार काळे
डोंबिवली येथील ९० व्या
अखिल भारतीय मराठी साहित्य
संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड



मारुती चितमपल्ली
महाराष्ट्र शासनाच्या मराठी
विभागाचा २०१६ या वर्षीचा
विंदा करंदीकर
जीवनगौरव पुरस्कार



अरुण साधू
महाराष्ट्र फाउंडेशनचा
२०१६ चा
जीवनगौरव पुरस्कार



अतुल पेठे
महाराष्ट्र फाउंडेशनचा
डॉ. नरेन्द्र दाभोळकर
स्मृती पुरस्कार



अंजली जोशी
'विरंगी मी विमुक्त मी' या
कादंबरीसाठी महाराष्ट्र फाउंडेशनचा
ललित ग्रंथ पुरस्कार



अरुण जाखडे
'इर्जिक' या ग्रामसंस्कृतीविषयक
ग्रंथासाठी महाराष्ट्र फाउंडेशनचा
विशेष ग्रंथ पुरस्कार



देवाजी तोफा
महाराष्ट्र फाउंडेशनचा
समाजप्रबोधनपर कार्यासाठीचा
२०१६ या वर्षीचा
कार्यकर्ता पुरस्कार



आसाराम लोमटे
'आलोक' या कथासंग्रहासाठी
साहित्य अकादमीचा
साहित्य पुरस्कार



महाबळेश्वर सैल
'हावठण' या कादंबरीसाठी...
के. के. बिर्ला फाउंडेशनचा
सरस्वती सन्मान

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे
वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७१ वे

ऑक्टोबर । नोव्हेंबर । डिसेंबर २०१६




अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्‌मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७१ वे

ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर २०१६



- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक, संपादक मंडळ आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

प्रकाशक
विलास मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

अक्षरजुळवणी, मांडणी व मुद्रण
माधव लोखंडे
मलय ग्राफिक्स
सुभाषनगर, नागपूर
भ्रमण : ९३२६९९९०१५

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये
वार्षिक वर्गणी : २०० रुपये
त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ. अनिल नितनवरे,
'जातक', २३/२४, स्नेहनगर,
नागपूर मार्ग, भंडारा - ४४१९०४
भ्रमण : ९८५०५५५०४९
ई-मेल : yugwani.nagpur@gmail.com
nitnaware.anil@gmail.com

अनुक्रमणिका

संपादकीय

मराठीचा वाङ्मयेतिहास शिकू लागलो तेव्हापासून एका प्रश्नाने खूप छळले होते. प्राचीन शिलालेख आणि ताम्रपटांच्या ज्ञात पुराव्यांवरून मराठी भाषेची कुळकथा सामान्यतः नवव्या शतकापासून सांगितली जात असे. आठव्या शतकाच्या अखेरीस उद्योतन सूरीच्या 'कुवलयमाला कथा' या ग्रंथात ज्या मराठीचा 'दिण्णले गहिल्ले उल्लाविरे मरहट्टे' असा उल्लेख आढळतो, ती आरंभिक मराठी अवघ्या काही शतकातच 'विवेकसिधू' वा 'श्रीज्ञानेश्वरी'सारख्या प्रगल्भ ग्रंथनिर्मितीच्या पातळीवर कशी पोचली, हा तो गूढ प्रश्न होता. 'दिण्णले गहिल्ले उल्लाविरे' अशी धुळाक्षरे गिरवणाऱ्या मराठीचे तीन-चार शतकातच 'अमृतातें पैजा जिंके' पर्यंतचे पोचणे हा प्रवास जरा चकित करणारा वाटायचा.

अलीकडच्या काळात मात्र हे गूढ उकलले आहे. अभिजात भाषेच्या संदर्भातील अभ्यासकांच्या समितीने मराठीची कुळकथा किमान दोन हजार वर्षे आधीच्या सातवाहनांच्या काळातील 'गाथासप्तसती' पर्यंत नेऊन भिडविली. प्रा. हरी नरके म्हणतात, त्याप्रमाणे आपण सर्व मराठी भाषक मराठीचे वय चोरत होतो तर...

अलीकडे मराठीच्या अभिजात भाषेच्या दर्जाविषयीचे झुंजूमुंजू सुरू आहे. राजधानीच्या उंबरठ्यावर मराठी तिष्ठत उभी आहे. आता अभिजाततेचा प्रश्न केवळ प्रार्थना-विनंत्यांनी सुटणार नसून त्यासाठी प्रभावी प्रयत्नांचा जागर मांडावा लागण्याचीच चिन्हे आहेत.

१९२६ च्या आसपास इतिहासाचार्य राजवाड्यांनी मराठी मरणपंथाला लागली काय असा प्रश्न अतीव तळमळीतून मांडला होता. या प्रश्नाला मराठीच्या अस्तित्वाने आणि काळाने आपले उत्तर दिले असले तरी त्या प्रश्नातली मराठीपुढील आव्हाने मात्र अजूनही संपली नाहीत. मराठी ज्ञानभाषेच्या चर्चा हिरिरीने रंगविणाऱ्या मराठी मध्यमवर्गाने इंग्रजीचे ज्ञानभाषापण अगदी सहज स्वतःत रुजवून घेतले. आपल्या ज्ञानव्यवहारातील आणि जीवनव्यवहारातील वतनदारी आपण इंग्रजीला लीलया बहाल केली. प्रश्न इंग्रजी वा हिंदीच्या द्वेषाचा नसून आपले मराठीविषयक अगत्य सिद्ध करण्याचा आहे. सभोवतीच्या इतर भाषांच्या गलबल्यात आपला मराठीचा सूर नेटाने आळवण्याचा आहे. हे लोकजीवनातून व्हावे आणि प्रशासनस्तरावरूनही हे अधिक आस्थेने व्हावे.

अभिजात भाषेच्या दर्जाविषयीच्या प्रश्नाने आधीच ज्ञानक्षेत्रात कच खाल्लेली मराठीची लढाई आता पुन्हा ऐरणीवर आली आहे. इंग्रजी-हिंदीसारख्या प्रभावी भाषांच्या मोठमोठ्या रेघांपुढे आपल्या मराठीची रेघ प्रयत्नपूर्वक उंचावण्याची गरज आहे. मराठीच्या अस्तित्वाची भीती नाहीच, मराठीच्या महत्तासिद्धीचा गंभीर प्रश्न आहे. आजच्या भाषिक निर्वाणीच्या काळात मराठीला तातडीने अभिजात भाषेची मान्यता मिळाल्यास मराठी भाषेला व संस्कृतीला उन्नयनाचे ऊर्जाबळ प्राप्त होईल. मायमराठीच्या कुशीत कुठेतरी पालवी फुटेल हे निश्चित.

अनुक्रमणिका

मराठीची आजची स्थितिगती, तिच्या बोलींपुढील प्रश्न, उपयोजनातील आव्हाने इ. प्रश्नांची गंभीर चर्चा घडविण्याच्या हेतूने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी संयुक्तपणे दि. २४ सप्टेंबर २०१६ रोजी एक महत्त्वाचे चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्राचे अध्यक्ष प्रा. वसंत आबाजी डहाके आणि उद्घाटक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची भाषणे मराठीच्या स्थितिगतीची गंभीर चिकित्सा करणारी व म्हणूनच संस्मरणीय ठरली होती. या चर्चासत्रातील डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. प्रमोद मुनघाटे आणि डॉ. रावसाहेब काळे या अभ्यासकांचीही भाषणे विश्लेषक व व्यासंगाची साक्ष देणारी होती. या सर्व भाषणांच्या संहिता निबंधरूपात युगवाणीतून प्रकाशित कराव्यात असे आम्हाला तीव्रपणे वाटले. तसेच चर्चासत्रात उपस्थित राहू न शकलेले प्रा. हरी नरके यांच्याही चिंतनाचा ऐवज युगवाणीला प्राप्त झाला. याआधी दि. २५ ऑक्टोबर २०१० रोजी नागपुरात विदर्भ साहित्य संघ आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ यांनी संयुक्तपणे 'प्रमाणभाषेचे सुलभीकरण' या विषयावर प्रा. प्र. ब. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेत असेच एक चर्चासत्र आयोजिले होते. या चर्चासत्रात श्री. मा. गो. वैद्य आणि श्री. दिवाकर मोहनी या ज्येष्ठ चिंतकांनी मौलिक निरीक्षणे मांडली होती. त्या निरीक्षणांमधील आशय आजही कालसुसंगत व मौलिक असाच आहे. म्हणूनच त्या ज्येष्ठ चिंतकांच्या भाषणांचा या अंकात अगत्याने समावेश केला आहे.

मराठीचा प्राचीन काळ, तिचे प्रमाणलेखन, शुद्ध-अशुद्धतेचे ग्रह-आग्रह, व्याकरणातील वादस्थळे आणि मराठी व संस्कृत यांच्यातील संबंधांचे कवित्व हे सगळेच प्रश्न आता सकारात्मक चिंतनाचे व मीमांसेचे ठरले आहेत. युगवाणीच्या या अंकातील काही प्रमेयांवरही वाद-विवादांची शक्यता आहे. यासंबंधीच्या प्रतिक्रियांना, वाद-प्रतिवादांना युगवाणी प्रकाशित करेलच, पण हे सर्व वाद-संवाद 'तत्त्वबोधा'पर्यंत पोचावेत, एवढेच.

या अंकातील श्रीपाद प्रभाकर जोशी यांची 'मूक आठवांची रात्र' ही एकांकिका महाराष्ट्राच्या अतिपूर्वेकडील अरण्यप्रदेशातील भावसंवेदन टिपणारी आहे. सध्याच्या उपनगरी अधोलोकातील स्त्रियांचे जिवारण्य वसंत वाहोकारांच्या 'पाड' या कथेतून उत्कटपणे अनुभवता येईल. प्रशांत असनारे, संजय चौधरी आणि कविता ननवरे यांच्या कवितांमधील ताजेपणही आपणास निश्चित भावेल.

या अंकाच्या निर्मितिप्रक्रियेत आमच्या संपादक मंडळातील डॉ. मोना चिमोटे यांनी विशेष प्रयत्न केलेत. या अंकाच्या मुखपृष्ठावरील चित्र प्रतिभावंत चित्रकार विजयराज बोधनकर यांनी आणि अंकातील रेखाचित्रे प्राचार्य सदानंद बोरकर व राजू महाजन यांनी साकार केलीत. अक्षरजुळणी व अंकरचना माधव लोखंडे यांनी सांभाळली. ही सर्व युगवाणीच्या प्रेमळ गोतावळ्यातली माणसे आहेत, एवढेच इथे नोंदवतो.


। संपादक

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

ऑक्टोबर । नोव्हेंबर । डिसेंबर २०१६



अं त रं ग



। लेख

मराठीची सद्यःस्थिती

▪ वसंत आबाजी डहाके

॥ एक ॥

भाषा ही एक व्यापक वस्तुस्थिती आहे. साहित्य हा भाषेचा एक भाग आहे, भाषेचे ते एक उपयोजन आहे, एकमेव नव्हे. जीवनाच्या विविध मौखिक आणि लिखित व्यवहारांमध्ये भाषेचे उपयोजन होत असते. मराठी ही एका विशिष्ट प्रदेशातील लोकांची भाषा आहे, आज ती भारतातील एका राज्याची भाषा आहे. या राज्याबाहेरही वास्तव्य असलेल्या मराठी लोकांची ती मातृभाषा आहे. महाराष्ट्रातले लोक मराठीत मौखिक व्यवहार करीत आलेले आहेत, यापुढेही ते मराठीत बोलतील अशी अपेक्षा असते. मुसलमानी राजवटीत मराठीवर पर्शियन, अरेबिक, उर्दू या भाषांचे संस्कार झाले, लिखित व्यवहारातही त्या भाषांचा प्रभाव दिसतो. इंग्रजी राजवटीत मौखिक आणि लिखित व्यवहारावर इंग्रजी भाषेचा गडद प्रभाव पडला. प्रशासन, न्याय, आर्थिक व्यवहार यांत इंग्रजीचाच वापर होत असे. इंग्रजी भाषा शिकणे व इंग्रजी भाषेत असलेले ज्ञान आत्मसात करणे ही इतर भारतीय भाषकांप्रमाणे मराठी भाषकांचीही आकांक्षा राहिली. तथापि सबंध मराठी लोक इंग्रजीत लिहत व बोलत आले असे घडले नाही. बऱ्याच मौखिक आणि लिखित व्यवहारांची भाषा मराठीच राहिली. लिखित व्यवहारासाठी प्रमाण मराठीचा आणि मौखिक व्यवहारासाठी त्या त्या प्रदेशातील बोलींचा वापर लोक करीत आलेले आहेत. ही स्थिती बदलेल अशी भीती व्यक्त होऊ लागली आहे. म्हणजे मातृभाषा असलेले मराठी लोक मराठीच्या ऐवजी लिखित व्यवहाराप्रमाणे मौखिक व्यवहारासाठीदेखील इंग्रजीचा वापर करतील अशी ती भीती आहे.

या भीतीचे मुख्य कारण अर्थातच इंग्रजी माध्यमाच्या शाळा हे आहे. महानगरांपासून ग्रामीण परिसरापर्यंतची मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकू लागलेली आहेत. पालकांचा तसा आग्रह असतो, इंग्रजी माध्यमाच्या शाळांना ते प्राधान्य देतात. त्यांच्या मते मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने ते आवश्यकच आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांविषयीच्या आकर्षणामागे इंग्रजी भाषेबरोबर येणारी प्रगतीची, विकासाची, उन्नतीची संकल्पना आहे. उच्च आणि उच्चतम शिक्षण इंग्रजी भाषेतच उपलब्ध असल्यामुळे आपल्या पाल्यांनी बालवयापासूनच इंग्रजी भाषा आत्मसात केली पाहिजे, त्या भाषेतून दिले जाणारे आधुनिक जगाशी जोडले जाणारे शिक्षण घेतले पाहिजे अशी ती भावना आहे. मराठी लोकांच्या सामाजिक इतिहासात याची मुळे आहेत हेही लक्षात घेतले पाहिजे. या शिक्षणापासून वंचित असल्यामुळे आपण मागासलेले राहिलो ही जाणीव स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळात उदयास आली. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर समाजातील समाजसुधारकांनी वंचितांच्या शिक्षणासाठी शाळा काढल्या, महाविद्यालये सुरू केली.

अनुक्रमणिका

शिक्षणाचे महत्त्व तळागाळापर्यंत पोचले होते. त्याच भावनेचे रूपांतर आज दिसते आहे. तथाकथित पुढारलेला समाज जर इंग्रजीतून शिक्षण घेत असेल तर आपल्याही पाल्यांना ते शिक्षण मिळाले पाहिजे अशी ती भावना आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून शिक्षण घेणारी मुले स्वाभाविकपणे शाळेत आणि शाळेबाहेर इंग्रजी बोलतील, त्यांचे वाचन इंग्रजी वर्तमानपत्रांचे, मासिक-पुस्तकांचे असले पाहिजे अशीही काळजी घेतली जाईल, म्हणजे ती मातृभाषेपासून हळूहळू दूर जातील, त्यांचा मौखिक-लिखित व्यवहार इंग्रजीतून होईल, मराठीतली कोणत्याही प्रकारची पुस्तके ती वाचणार नाहीत अशी चिंता अनेकांना भेडसावत असते. इंग्रजी ही जागतिकीकरणाची भाषा आहे. ती आंतरराष्ट्रीय व्यापाराची, राजकारणाची, आंतरराष्ट्रीय संबंधांच्या व्यवस्थापनाची भाषा आहे. ती उच्चतम ज्ञान-विज्ञानाची भाषा आहे. आजच्या काळात तिला अतोनात महत्त्व आलेले आहे. जागतिकीकरणाच्या अर्थव्यवस्थेमुळे विकसनशील देशांच्या अर्थकारणावर जसे विपरीत परिणाम होत आहेत, तसेच इंग्रजी भाषेचे वर्चस्व वाढत गेले तर राष्ट्रीय भाषांचे, प्रदेशभाषांचे, बोलींचे भवितव्य काय या प्रश्नाने विविध देशांतील विचारवंत अस्वस्थ झालेले आहेत. यातूनच आपल्या भाषेचा जोरदार आग्रह उत्पन्न झालेला आहे.

।। दोन ।।

प्रत्यक्ष लोकव्यवहारात भाषा हा फारच जटिल प्रश्न झालेला आहे. एका बाजूला आपल्या राज्यभाषेचा, मातृभाषेचा अभिमान आणि दुसरीकडे त्या भाषेऐवजी दुसऱ्या भाषेचा स्वीकार अपरिहार्य ठरावा अशी परिस्थिती. राज्यभाषेचा कडोविकडीचा आग्रह धरला जातो तेव्हा आपले राज्य भारतातल्या अनेक राज्यांपैकी एक आहे, आणि आपल्या राज्याच्या सीमा अन्य राज्यातल्या लोकांसाठी बंद केलेल्या नाहीत याचे भान राहत नाही. सगळ्या गोष्टी कन्नडमध्येच असतील तर मराठी माणूस गोंधळतो, तीच स्थिती कन्नडभाषकाची महाराष्ट्रात होईल. पंजाबमध्ये गुरुमुखी लिपीतले लेखन आपल्याला वाचता येत नाही. सर्वत्र देवनागरी अनिवार्य करावी असे म्हटले तर अस्मिता दुखावतात.

महाराष्ट्र शासनाने १९६० पासून मराठीचा राजभाषा म्हणून स्वीकार केला. राज्यातील सर्व व्यवहार मराठीतून झाले पाहिजे हा दृष्टिकोन त्यामागे होता. १९९९ साली पहिलीपासून इंग्रजी हे नवे धोरण महाराष्ट्र शासनाने अमलात आणण्याचे ठरवले. शासननिर्णयात म्हटले होते : एकविसाव्या शतकात प्रवेश करताना प्रत्येक विद्यार्थ्याला मातृभाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे, त्याने राष्ट्रभाषा अवगत केली पाहिजे आणि ज्ञानभाषा म्हणजेच इंग्रजी भाषाही शिकली पाहिजे... इंग्रजी भाषेला आज सर्वत्र असलेले महत्त्व व प्रामुख्याने या भाषेची उपयुक्तता लक्षात घेऊन इंग्रजी भाषा हा विषय इयत्ता पहिलीपासून सुरू केल्यास विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्रजी अत्यंत उपयुक्त ठरेल. शासनाच्या या निर्णयामागे परिस्थितीवर, लोकांच्या आकांक्षांचा रेटा आहे यात शंका नाही. मातृभाषा आणि राष्ट्रभाषा यांचे शिक्षण घेतले पाहिजे असे म्हटलेले असले तरी इंग्रजीचे महत्त्व अधोरेखित झालेले आहे हे स्पष्टच दिसते. मराठी माध्यमाच्या शाळांहून इंग्रजी माध्यमांच्या शाळांना अधिक महत्त्व आहे हेही गृहीत धरलेले आहे. समाजातील आर्थिक दृष्टीने उच्च वर्गाला इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळा उपलब्ध होतात. बहुसंख्य मुलांना मराठी माध्यमाच्या शाळांचा स्वीकार करावा लागतो. इंग्रजी माध्यमातून शिकणारा उच्च वर्ग आणि मराठी माध्यमातून शिकणारा सर्वसामान्यांचा वर्ग असे द्वंद्व समाजात निर्माण होऊ नये, हाही यामागचा उद्देश असू शकतो.

इंग्रजी-मराठी असे द्वंद्व निर्माण होऊ नये, दोन्ही भाषांना व्यक्तिजीवनात व समाजजीवनात महत्त्वाचे स्थान आहे हे लक्षात घेणे जरुरीचे आहे.


।। तीन ।।

मराठी ही एका राज्याची भाषा आहे. या राज्याबाहेर राहणाऱ्या मराठी भाषकांना त्या त्या राज्याच्या भाषेशी जुळवून घ्यावे लागते, तसेच महाराष्ट्र राज्यातील अमराठी भाषकांनी मराठी भाषा अवगत करून घ्यावी अशी अपेक्षा असते. महाराष्ट्र राज्यात अधिकृत भाषा मराठी असल्यामुळे मराठीचा आग्रह कुठे कुठे धरता येईल? राज्यकारभाराची, प्रशासनाची भाषा, कायदा, न्यायव्यवहाराची भाषा, विविध शासकीय, निमशासकीय, अशासकीय कार्यालयीन व्यवहारांची भाषा, वर्तमानपत्रे, दूरचित्रवाहिन्या, नभोवाणी,

अनुक्रमणिका

जाहिराती, विविध उत्पादनांची माहिती, रस्त्यावरच्या सूचना, दुकानांच्या पाट्या, बसवरची गावांची नावे इत्यादी गोष्टींमध्ये मराठीचा आग्रह धरता येईल. या राज्यात इतर राज्यांमधून येणाऱ्या लोकांसाठी रस्त्यावरच्या सूचना, विशेषतः घाटात सूचना इंग्रजीतूनही द्याव्या लागतील. महाराष्ट्राबाहेर, देशाबाहेर ज्यांचे व्यवहार आहेत अशा राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय अशा आस्थापनांच्या प्रतिष्ठानांच्या, निगमांच्या कार्यालयीन भाषेबाबत असा आग्रह धरता येईल असे वाटत नाही. भारतातल्या वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या भाषा आहेत हे लक्षात घेऊन रेल्वेने तीन भाषांचा अवलंब केलेला आहे. प्लॅटफॉर्मवरील गावांच्या नावांच्या बाबतीत लिप्यांचा अवलंब केला जातो. रोमन, देवनागरी आणि त्या राज्याची भाषा ज्या लिपीत लिहिली जाते ती. आपल्या राज्यापुरते मर्यादित आहेत अशा गोष्टींमध्ये संपूर्णपणे मराठीचा आग्रह धरता येईल. अन्य व्यवहारात स्थानिक-प्रादेशिक व इंग्रजी अशी भाषायोजना करावी लागेल.

या गोष्टी लक्षात घेतल्यानंतर काही गोष्टींचे निरीक्षण केले तर महाराष्ट्र राज्यात मराठीचे प्रत्यंतर अनेक ठिकाणी येते. उदाहरणार्थ, वृत्तपत्रे. आज मराठी वृत्तपत्रांची आणि त्यांच्या आवृत्त्यांची संख्या कितीतरी पटीने वाढलेली आहे. छपाईतल्या सुधारणांमुळे त्यांचे रूपरंगही आकर्षक झालेले आहे. याचा अर्थ असा की मराठी वृत्तपत्रे वाचणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे. येथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे : गोव्यातील 'सुनापरांत' हे देवनागरी लिपीतले, १९८७ साली निघालेले एकमेव कोकणी दैनिक २०१० मध्ये बंद पडले. ते देवनागरी लिपीमुळे बंद पडले असे म्हणावे तर रोमन लिपीतले कोकणी दैनिक सुरू झालेले ऐकिवात नाही. नवी पिढी कोकणी भाषेपासून दूर गेलेली आहे की देवनागरी लिपीपासून दूर गेलेली आहे हा प्रश्नच आहे. लिखित, मुद्रित रूपात कोकणी भाषा टिकवून ठेवायची असेल तर ललित साहित्याप्रमाणेच कोकणी भाषेतली दैनिकेही आवश्यक आहेत. मराठीबाबत अशी भीती अद्याप तरी दिसत नाही. गोव्यात, कोकणात मराठी वर्तमानपत्रे व्यवस्थित सुरू आहेत. दूरचित्रवाणीवरील मराठी वाहिन्यांच्या संख्येतही भर पडते आहे. गावोगावी स्थानिक केबल नेटवर्ककडून मराठीतून कार्यक्रम सादर केले जातात. वर दिलेल्या विविध क्षेत्रांत आज मराठीचे उपयोजन आवर्जून केले जात आहे हे आपल्याला दिसत आहेत. त्यावरून मराठी भाषेबाबत काही धोक्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे असे आज तरी दिसत नाही.



।। चार ।।

आता दोन क्षेत्रे पाहायची आहेत. शिक्षण आणि ग्रंथव्यवहार.

शिक्षणाला राज्याची, राज्यभाषेची मर्यादा असते का? असली पाहिजे का?

गेल्या पंचवीस वर्षांत अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण, व्यवस्थापनविद्या या ज्ञानशाखांकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. हे शिक्षण देणाऱ्या विविध संस्था महाराष्ट्रात ठिकठिकाणी निघालेल्या आहेत. त्याचबरोबर व्यवसायाभिमुख अशा ज्ञानशाखांचे शिक्षण देणाऱ्या संस्थाही आढळत आहेत. संगणक विज्ञान, माहिती तंत्रज्ञान, फॅशन टेक्नॉलॉजी, डिझाईन, केटरिंग, हॉटेल व्यवस्थापन, फिल्म आणि टेलिव्हिजन, जाहिरातविद्या, वृत्तपत्रविद्या इत्यादी. या सर्वच अभ्याक्रमांचे माध्यम

सामान्यतः इंग्रजी हेच आहे. मानव्य, वाणिज्य, काही मर्यादित विज्ञान या ज्ञानशाखांनी मराठी माध्यमाचा स्वीकार केलेला आहे. परंतु आजच्या विद्यार्थ्यांना नवी ज्ञानक्षेत्रे खुणावत आहेत. मध्यंतरी वाणिज्य शाखेला बरेच महत्त्व आले होते, परंतु आता मानव्य, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांकडे वळणाऱ्यांची संख्या क्षीण होत गेलेली दिसते. सर्वच ज्ञानशाखांचा संबंध शेवटी उपजीविकेशी, अर्थार्जनाशी असतो. पालकांना आणि त्यांच्या पाल्यांना अशाच अभ्याक्रमांची निवड करावीशी वाटते जेथे या गोष्टींची पूर्तता होते.

या ज्ञानशाखांमध्ये, अभ्यासक्रमांमध्ये माध्यम भाषा म्हणून मराठी भाषेचा आग्रह आपल्याला धरता येईल का? तसा आग्रह धरायचा झाल्यास, आणि तो आग्रह वस्तुस्थितीत आणायचा झाल्यास जे काम करावे लागेल त्याची किमान तयारी तरी आपल्याकडे आहे का? केवळ समाजविज्ञान हा विषय घेतला तरी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस वा सेज यांसारख्या प्रकाशनसंस्थांकडून नित्य जेवढी ग्रंथसंपदा प्रकाशित होत असते, त्याच्या एक प्रतिशततरी मौलिक मराठी ग्रंथ प्रकाशित होत आहेत असे म्हणता येईल का? मानव्य या ज्ञानशाखेतील समाजविज्ञानाच्या बाबतीत जर ही परिस्थिती आहे, तर अन्य ज्ञानशाखांच्या बाबतीत आपल्याला निरुत्तर होण्याशिवाय गत्यंतरच नाही. मानव्य, विज्ञान, वाणिज्य या अभ्यासक्रमांवर आधारित पाठ्यपुस्तकांशिवाय किती मौलिक ग्रंथ मराठीत प्रकाशित होतात याचे उत्तर, फारसे नाहीत असेच द्यावे लागेल.

या वस्तुस्थितीमुळे आपल्या पाल्यांनी लहानपणापासून इंग्रजी भाषेचे शिक्षण घ्यावे, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकावे असे पालकांना वाटते. महाराष्ट्रातील यच्चयावत मुले इंग्रजी भाषेतून शिकू लागली तर मराठी भाषेचे भवितव्य काय असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. मातृभाषेतून शिक्षण हे तत्त्व अनेकांना मान्य आहे. मराठीतून किमान प्राथमिक शिक्षण तरी घ्यावे, माध्यम इंग्रजी असले तरी मराठीचे शिक्षण अपरिहार्य करावे असे आपले म्हणणे असते. आदिवासींच्या बोलींमध्ये आदिवासींना शिक्षण मिळाले पाहिजे हा यातून आलेला विचार. पाठ्यपुस्तके तयार झाली. महाराष्ट्रातील आदिवासी मुलांनी आदिवासींच्या बोलीतून शिक्षण घ्यावे, इतरांनी मात्र प्रमाण मराठीतून, हिंदीतून, इंग्रजीतून शिक्षण घ्यावे, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकावे यातला विरोध काही लोकांच्या लक्षात आला. ती योजना मान्य झाली नाही असे ऐकिवात आहे.

॥ पाच॥

मराठीच्या विविध बोली आहेत. त्या बोलल्या जात आहेत. बहुसंख्य सुशिक्षित लोक प्रमाण मराठीमध्ये व्यवहार करीत असले तरी त्या बोली अद्याप नष्ट झालेल्या नाहीत. पुढे त्या नष्ट होतील असे भाकित वर्तवले जाते. प्रमाण मराठीचेच भवितव्य चिंताग्रस्त झालेले आहे, तिथे बोलींचे काय होणार हा प्रश्न रास्तच आहे. आपल्याला बोली टिकवायच्या आहेत, प्रमाण मराठीही टिकवायची आहे. हे कसे शक्य आहे? आजच्या काळाच्या गरजेप्रमाणे मुले इंग्रजी माध्यमाकडे वळली तरी बोलींशी, प्रमाण मराठीशी त्यांचे नाते कायम राहील अशी काहीतरी व्यवस्था करावी लागेल.

आपले मराठी साहित्य अतिशय समृद्ध आहे. तेराव्या शतकापासून आता एकविसाव्या शतकापर्यंत साहित्याची सातत्याने निर्मिती होत आलेली आहे. आपले मराठी विद्यार्थी मराठीपासून दूर गेले तर या समृद्ध वारशाचे काय होईल? ही चिंता आहे.

सध्या मानव्य शाखेतल्या विद्यार्थ्यांना मराठी साहित्य हा अभ्यासविषय घेता येतो. अशी सुविधा वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकविद्या, अभियांत्रिकी, ललित कला, कृषिविज्ञान, जीवतंत्रविज्ञान इत्यादी ज्ञानशाखांकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध नाही, म्हणजे बी.एच्या मोजक्या विद्यार्थ्यांना आणि त्याहूनही मोजक्या एम.एच्या विद्यार्थ्यांना मराठी साहित्य हा अभ्यासविषय घेता येतो. बहुसंख्य विद्यार्थ्यांना मराठी भाषेशी व साहित्याशी काहीच देणेघेणे उरत नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे. साहित्याचा आणि ज्ञानविज्ञानाचा काही संबंधच नाही असा एक घट्ट गैरसमज आपल्या समाजात रूढ झाला आहे. ॲस्ट्रोफिजिक्स हा विषय शिकता आहात, त्याच्यासोबत चांगल्या कविता, चांगल्या कथा वाचायला मिळाल्या आणि त्याविषयी काही लिहावे लागले तर ॲस्ट्रोफिजिक्स हा विषय डोक्यातून उडून जाईल? अनेक विश्वविख्यात वैज्ञानिकांनी उत्तम ललित लेखन केलेले आहे हे ध्यानात घ्यावे.

॥ सहा ॥

समाज म्हटल्यानंतर एक मूर्त, ठोस अशी वास्तविकता असते. या समाजात अनेक गट असतात. त्यांची राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी असते. सर्व गट एकाचवेळी एकाच स्थितीत नसतात. काही प्रगत, काही प्रगत होण्याच्या प्रक्रियेत तर काही अप्रगत अशी स्थिती असते. त्या सर्वांना एका रेषेत आणायचे झाल्यास तसे भक्कम प्रयत्न करावे लागतील. मराठी साहित्य अतिशय समृद्ध आहे असे मी म्हटलेलेच आहे. त्या तुलनेत साहित्येतर साहित्य, विज्ञाने, समाजविज्ञाने यांविषयीचे लेखन अल्प आहे. त्यामुळे एका पिढीतच ज्ञानाच्या दृष्टीने अंतर पडलेले दिसते. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर प्रतिभावंत लेखकांमुळे कविता, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यक्षेत्रे बहरलेली आहेत, तशी ज्ञानविज्ञानाची क्षेत्रेदेखील बहरली पाहिजेत. अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथांचे अनुवाद तरी उपलब्ध झाले पाहिजेत. चागंले उपक्रम सुरू होतात, मग ते बंद पडतात किंवा त्यांत पहिला जोम राहत नाही. विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाचे काय झाले हे आपल्याला ठाऊकच आहे. त्यामागे एकच कारण असेल असे नाही. साहित्य संस्कृती मंडळाची अनुवादाची चांगली योजना होती. काही ग्रंथांचे उत्तम अनुवाद झालेले आहेत. एखाद्या भाषेचे वैभव स्वतंत्र ग्रंथनिर्मितीने जसे वाढत असते, तसे ते उत्तम ग्रंथांच्या अनुवादानेही वाढत असते. आपल्याकडे प्रतिभावंत कवींची, कथा-कादंबरीकारांची, नाटककारांची वानवा नाही, पण प्रतिभावंत आणि परिश्रमी अनुवादकांची मात्र उणीव आहे. ज्यांची इंग्रजीत गती नाही, ज्यांना इंग्रजी ग्रंथ उपलब्ध होत नाहीत, उपलब्ध झाले तरी आकलन होत नाही अशा मोठ्या समाजगटांनी अज्ञानी राहावे असे तर नाही. भाषा शिकू लागलेल्या छोट्या मुलांसाठी लिहिलेल्या सचित्र पुस्तकांपासून विविध विषयांवरच्या अद्ययावत कोशापर्यंतची ग्रंथसंपदा इंग्रजीत आढळते. आपण त्या भाषकांचे थोडे अनुकरण करावे.

साहित्याच्या अनुवादाच्या बाबतीत कधीकधी आपल्याला प्रश्न पडतो की एखाद्या भाषेतले साहित्य आपण मराठीत आणतो, तर त्या भाषेत किती मराठी साहित्य गेलेले आहे? उदाहरणार्थ, कितीतरी बंगाली साहित्यकृतींचे अनुवाद मराठीत झालेले आहेत, त्या तुलनेत किती मराठी साहित्यकृती बंगाली भाषेत गेलेल्या आहेत? आज हिंदीतल्या अनेक साठोत्तरी कवींच्या कवितांची पुस्तके मराठीत आलेली आहेत. त्या मानाने किती मराठी कवींची कविता हिंदीत गेली आहे? असे प्रश्न पडून अनुवादातला उत्साह मावळण्याची शक्यता असते, तसे ज्ञान-विज्ञानाच्या ग्रंथांच्या बाबतीत होण्याचे कारण नाही,. उदाहरणार्थ, 'इंडिया आफ्टर गांधी' (गांधीनंतरचा भारत) हे पुस्तक मराठीत आणावेसे वाटले आणि ते आलेले आहे. काही जागतिक कीर्तीच्या कादंबरीकारांच्या कृती मराठीत याव्यात असे काहींना वाटले, त्या आल्या. उदाहरणार्थ सारामागो, ओरहान पामुक यांच्या कादंबऱ्या. तेच ज्ञानाच्या, विचारांच्या क्षेत्रात योगदान असलेल्या ग्रंथांविषयी म्हणता येईल.

॥ सात ॥

आपल्या भाषेच्या स्थिति-गति-नियतीला आपणच जबाबदार असतो.

मराठीची सद्यःस्थिती आपण अगदी निराश होऊन जावे अशी मुळीच नाही. किंबहुना मराठी भाषा मरू घातली आहे का या सुमारे शंभर वर्षांपूर्वी (१९२६ साली) उच्चारलेल्या प्रश्नाचे उत्तर तिने आपल्या अस्तित्वाने दिलेलेच आहे. परंतु या आत्मसमाधानाच्या कोषातच राहावे आणि अवतीभवतीच्या स्थितीकडे डोळेझाक करावी अशी मात्र सद्यःस्थिती नाही.

सध्यातरी अशी स्थिती नाही. टीव्हीचॅनल्स आहेत, इंटरनेट आहे, त्याचबरोबर छापील पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रेही आहेत. सगळी अत्याधुनिक साधने असूनही कागदावर वा संगणकावर शब्द लिहिले जात आहेत आणि ते कागदावर छापले जात आहेत. भविष्यात मराठी भाषा असेल, लोक लिहितील, वाचक वाचतील असा माझा विश्वास आहे. लेखकांचे लिहिण्याचे तंत्र बदलेल, ते वेगवेगळे प्रयोग करतील. वाचायची पुस्तके त्याचवेळी ऐकायची-पाहायची पुस्तके असतील. प्रेक्षकांना सहभागी करून घेणारी रंगभूमी आली, अवतीभवती हिंडता येईल अशी मांडणीशिल्पे आली, तीन आयामी चित्रपट आले, सर्कस आणि नाटक यांचा समन्वय साधणारे प्रयोग आले. भविष्यकालात आपल्याला वावरता येईल, पात्रांना जवळून पाहता येईल, घटनांमध्ये हस्तक्षेप करता येईल असा अवकाश उभारणारी कादंबरी येऊ शकेल. शब्द, अभिनय, चित्र,

अनुक्रमणिका

शिल्प, स्थापत्य यांचा समन्वय त्यात असेल. ब्लॉगवर लिहिल्या जाणाऱ्या कादंबरीत वाचक सहभागी होतील, मूळ लेखकाची सूत्रे स्वतः हातात घेतील. आताच आपण जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात बसून मराठी वर्तमानपत्रे वाचू शकतो, प्रतिक्रिया पाठवू शकतो. अक्षरे कागदांऐवजी संगणकांच्या पडद्यावर लिहिली जात आहेत. कागद आणि छपाई नव्हती तेव्हा दगड, धातूचा पत्रा, ताडपत्र, कापड यांच्यावर अक्षरे लिहिली जात. आता संगणकाचा पडदा आहे.

ब्लॉग हे नवीन माध्यम आता आपल्याला उपलब्ध झालेले आहे. या ब्लॉग्जवर साहित्याचे बहुतेक प्रकार आढळतात. लेख, कथा, कविता, आठवणी, प्रवासकथन, घटना-प्रसंगांवरील प्रतिक्रिया, विनोद, पाकक्रिया या गोष्टी अधिक करून आढळतात. ब्लॉग हा मुख्यतः स्वतःचे विचार, भावना, कल्पना व्यक्त करण्यासाठी वापरला जातो. काही ठिकाणी एखाद्या कवितासंग्रहाचे रूप आहे, तर कुठे संवादांवर भर आहे. काही ब्लॉग्ज पूर्णपणे व्यक्तिगत स्वरूपाचे आहेत. व्यक्तींना आपण व्यक्त व्हावे असे वाटते आणि आपली अभिव्यक्ती मराठीतून व्हावी असेही वाटते. हे अर्थातच महत्त्वाचे आहे.

ब्लॉग हे नवीन साधन आहे अथवा माध्यम आहे यात शंकाच नाही. ब्लॉग्जवर प्रचंड स्वातंत्र्य आहे. आपण स्वतःला कसेही व्यक्त करू शकतो. अर्थातच अभिव्यक्तीवरची योग्य बंधने पाळावी लागतात. या साधनाचा आपण कसा उपयोग करतो त्यावर त्याची वाचनीयता आणि मूल्यवत्ता टिकून राहील. हस्तलिखित असो, मुद्रित मजकूर असो, की संगणक-महाजालावरील मजकूर असो, शेवटी त्याची गुणवत्ताच पाहिली जाईल. मुद्रित साहित्य असो की संगणकीय साहित्य असो लेखकांना आपल्या काळाचे भान असले पाहिजे, काही एक मूल्यदृष्टी असली पाहिजे. त्याचबरोबर वाचकांना जे अवतीभवतीचे भान आलेले आहे त्याचीही जाण असली पाहिजे. एकूण मराठी भाषकांच्या ब्लॉग्जपैकी फारच थोडे ब्लॉग्ज महाराष्ट्राबाहेरच्या मराठी व्यक्तींचे आहेत. परदेशात मराठी भाषा, साहित्य, संस्कृती जतन करणाऱ्यांचे आणखी पुष्कळ ब्लॉग्ज असायला हवे आहेत. त्या व्यक्ती ज्या प्रदेशात राहताहेत, ज्या परकीय व स्वकीय व्यक्तींच्या संपर्कात येत आहेत, जे जीवन जगताहेत, जे प्रश्न त्यांच्यासमोर उभे ठाकताहेत त्यांविषयी त्यांनी लिहिले पाहिजे. आपण ज्या काळात काही मजकूर लिहित आहोत, त्याच काळात मुद्रित सहित्यात काय लिहिले जाते आहे याचेही भान येथल्या आणि बाहेरच्या व्यक्तींनी ठेवले पाहिजे. सध्या ब्लॉग्जवर जो मजकूर आलेला आहे, विशेषतः कविता, त्याने माझे फारसे समाधान झाले नाही. परंतु ब्लॉग्जवरच्या कवितांची दखल घेतली पाहिजे असे मला निश्चितपणे वाटते. ब्लॉग्जवरून विचारांना चालना देणारा मजकूरही असू शकतो. ब्लॉग्जवरून वाङ्मयीन वादही घालता येतील!

ब्लॉगमुळे कागदी पुस्तके टाळता येतील. बरेच कवी पदरमोड करून आपले कवितासंग्रह छापतात. वितरणाची नीट व्यवस्था नसल्यामुळे ते वाचकांपर्यंत पोचत नाहीत. कविता ब्लॉगवर टाकल्या तर त्यांना जगभरातले वाचक मिळतील. पुस्तकाप्रमाणे ब्लॉगचे वाचन अजून तेवढे रूढ झालेले नाही. पण ते होईल यात शंका नाही. (सध्या तरी संगणकसाक्षरतेचे प्रमाण कमी आहे.) नव्याने लिहिणाऱ्या लेखक - कवींनी ब्लॉगचा उपयोग करावा असे मला वाटते. लघुनियत-कालिकांसारखी वेबमॅगझिन्सही काढता येतील. अधिकाधिक मराठी वाचकांना, समीक्षकांना या नव्या माध्यमाची दखल घ्यावी लागेल यातही शंका नाही. मुद्रणाच्या पलीकडच्या या नव्या माध्यमातूनही उत्कृष्ट साहित्यकृती येतील.

• • •

▪ **प्रा. वसंत आबाजी डहाके,** कॅक्टस्, दक्षिण मालटेकडी, परिगणित परिसर, अमरावती-४४४६०६

अनुक्रमणिका



मराठी : अभिजात, बोली आणि उपयोजित

■ डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठी ही आपली मातृभाषा आहे आणि ती किमान दोन ते अडीच हजार वर्षांएवढी जुनी भाषा आहे. दोन हजार वर्षांपूर्वीच्या शिलालेखांमधील काही शब्द आजच्या मराठीमध्येही वापरले जात आहेत. तसेच 'गाथा सत्तसई' मध्येही आजच्या मराठीतील शब्द असल्याचे जाणवते. साधारणतः इ. स. च्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकातील 'गाथा सत्तसई'ची निर्मिती आहे. तीमधून अस्सल मराठी जीवन तर येतेच परंतु आज वापरात असलेले अनेक शब्दही 'गाथा सत्तसई'त आहेत. हा प्रारंभीचा भाग यासाठी सांगावयास हवा की बहुसंख्य लोकांचा असा समज आहे की, साधारणतः दहाव्या शतकापासून मराठी अस्तित्वात आलेली आहे. प्रथमतः हा समज दूर करणे गरजेचे आहे आणि तो समज दूर करण्याचा प्रयत्न भारत सरकारकडे 'अभिजात' भाषा म्हणून मराठीचा जो प्रस्ताव दाखल करण्यात आला, त्यात सप्रमाण सिद्ध केलेले आहे. राज्य शासनाने नेमलेल्या समितीचा सदस्य म्हणून हे मी खात्रीपूर्वकच सांगू शकतो. महाराष्ट्र शासनाने जो अहवाल- प्रस्ताव केंद्र सरकारकडे दाखल केला, त्यास (केंद्र शासनाच्या पद्धतीप्रमाणे) साहित्य अकादमीने मान्यता देऊन, किंबहुना शिफारस करून तो केंद्रशासनाकडे पाठविलेला आहे. दोन वर्षांपासून केंद्र शासनाच्या औपचारिक मान्यतेसाठी तो पडून आहे. मराठी माणसांनी जर आपले बळ वापरले नाही तर केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा कधीच मिळणार नाही. हा दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्रातील आमदार, खासदार यांनी तर प्रयत्न केलेच पाहिजेत. परंतु सामान्य माणसेसुद्धा या प्रश्नावर एकवटली पाहिजेत. केवळ अभिजात भाषेचा केंद्र सरकारकडून दर्जा घोषित व्हावा, त्यासाठीचे काही अनुदान मिळावे, आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा वाढावी, यासाठी तरी सामान्य मराठी माणसांनी सर्व भेद विसरून एकत्र आले पाहिजे. वस्तुतः ही भारत सरकारची योजना आहे. त्यांचे काही निकष आहेत. ते निकष पूर्ण करणाऱ्या तमीळ, तेलगू इ. भाषांना हा दर्जा मिळालेला आहे. पण त्यासाठी त्या त्या भाषक लोकांनी आपली सामूहिक शक्ती प्रकट केली. राजकीय इच्छाशक्ती ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. तीही त्या त्या भाषकांनी प्रकट केली आहे. मला वाटते, मराठी माणूस यात कमी पडतो आहे. त्याची राजकीय इच्छाशक्ती तो प्रकट करीत नाही. ती जेव्हा प्रकट होईल तेव्हा केंद्र शासनाला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणे अपरिहार्य होईल. तो दिवस जवळ आणण्याची जबाबदारी तुम्हा-आम्हावरच आहे. परंतु मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे एवढाच काही मराठीचा प्रश्न नाही. त्यापेक्षा कितीतरी गंभीर प्रश्न आज निर्माण झालेले आहेत. सगळ्यात गंभीर गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे आज मराठीसंबंधीची चर्चाच थांबली आहे. आम्ही मनोमन गृहीतच धरलेले आहे की, मराठीचे भवितव्य काही चांगले नाही. तेव्हा चिंता करीत वेळ घालविण्यापेक्षा इंग्रजी शिकून उदरनिर्वाह

अनुक्रमणिका

भागवू या असे आम्हाला वाटू लागलेले आहे आणि ही सर्वात दुःखद बाब आहे.

आणखी एक दुःखद गोष्ट म्हणजे मराठीचा विषय निघाला की, तो केवळ मराठीच्या अध्यापकांचा प्रश्न आहे, असे मानले जाऊ लागले आहे. शाळा कॉलेजमधून मराठीचे शिक्षक कमी होतील म्हणून आम्ही बोलतो आहोत, असेही अनेकांना वाटते. जेव्हा महाराष्ट्र शासनाने कनिष्ठ महाविद्यालयात मराठीऐवजी माहिती तंत्रज्ञान हा विषय घेण्याची सवलत दिली, तेव्हा मराठीच्या शिक्षक-प्राध्यापकांनी आवाज उठविला. बाकीच्या मराठी माणसांना या प्रश्नाचे काही सोयरसुतक आहे असे वाटलेच नाही. नाहीतर त्यांनी आवाज उठविला असता. आणखी एक अशीच चुकीची समजूत झालेली आहे. ती म्हणजे काही राजकीय पक्षांच्या राजकारणाचा हा भाग आहे. खरे म्हणजे सर्वपक्षीय राजकारणाचा हा विषय झाला पाहिजे. परंतु तसे होत नाही. बंगाली लोक ज्याप्रमाणे आपल्या भाषेवरती आणि लेखकांवरती प्रेम करतात तसे आपण करतो का? नाही तर मराठीचा प्रश्न सर्वपक्षीय झाला असता.

तेव्हा सांगायचा मुद्दा असा की, हा प्रश्न केवळ मराठीच्या अध्यापकांपुरता अगर राजकारणाचा प्रश्न नाही. तो महाराष्ट्रात राहणाऱ्या दहा-अकरा कोटी जनतेचा प्रश्न आहे. या जनतेच्या विकासाचा प्रश्न आहे. कुठल्याही देशाचा अगर प्रांताचा विकास हा भाषेमधूनच होत असतो. भाषा म्हणजे नुसते संवादाचे, संप्रेषणाचे माध्यम असत नाही. त्यापलीकडे जाऊन एकूण जीवनमान उंचविण्याचे कार्यही भाषा करीत असते. जीवनमान म्हणत असताना केवळ उपजीविका अभिप्रेत असत नाही. उपजीविका तर महत्त्वाची असतेच. पण त्यापलीकडे जाऊन माणसाच्या काही सांस्कृतिक गरजा असतात. आत्मिक उन्नयनही महत्त्वाचे असते. किंबहुना यामधूनच एक सुसंस्कृत, समंजस समाज निर्माण होत असतो. म्हणूनच भारतातील महामानवांनी लोकभाषांचा कायम आग्रह धरलेला दिसेल. गौतम बुद्धांनी पालीचा आणि महावीरांनी अर्धमागधीचा आग्रह धरलेला दिसेल. अकराव्या-बाराव्या शतकांमध्ये जेव्हा जनसामान्यांच्या उत्थापनाचा प्रश्न आला तेव्हा म. बसवेश्वरांनी कन्नडचा, तर म. चक्रधर आणि संत ज्ञानेश्वरांनी मराठीचा आग्रह धरला. या महनीयांना संस्कृत येत नव्हते असे नाही. उलट संस्कृत ही मुठभरांची भाषा, म्हणूनच ती बहुजनांवर अन्याय करते, या भावनेतून या संतांनी लोकभाषांचा आग्रह धरला. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच भावनेतून राजभाषा कोश निर्माण केला. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे तर स्व. यशवंतराव चव्हाण हे ''लोकभाषा या ज्ञानभाषा झाल्या पाहिजेत'' असे म्हणत असत. त्यामुळेच त्यांनी मराठी विश्वकोश निर्माण करण्यासाठी यंत्रणा उभी केली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारख्या विद्वान व्यक्तीची नेमणूक तेथे केली. आज काय परिस्थिती आहे, यासंबंधी न बोललेले बरे! तर मुख्य मुद्दा आहे, बहुजनांच्या सर्वांगीण उत्थानाचा. त्यासाठी बहुजनकेंद्री आर्थिक धोरणे जशी महत्त्वाची असतात, तशीच बहुजनांच्या भाषिक धोरणांचीही आवश्यकता असते. दुर्दैवाने अशा प्रकारची कुठलीही धोरणे आम्ही आखली नाहीत आणि वरचेवर इंग्रजी आम्ही कधी अपरिहार्य म्हणून तर कधी आपद्धर्म म्हणून स्वीकारत निघालो आहोत. सत्तर ऐंशी वर्षांपूर्वी इतिहासाचार्य राजवाडे यांनी मराठी मरणपंथाला लागली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हापासून नुसत्या चर्चा सुरू आहेत आणि इंग्रजी हातपाय पसरत निघाली आहे. शेवटी घरात शिरलेल्या उंटाप्रमाणे होण्यापूर्वी काही धोरणे आखणे गरजेचे आहे आणि या संदर्भात मात्र आपण झोपलेलो आहोत.

येथेच एका प्रश्नाचा विचार केला पाहिजे. तो असा की, आपण इंग्रजीला विरोध करतो आहोत का? खरे म्हणजे कुठल्याही भाषेला विरोध करण्याचे कारणच काय? आपण इंग्रजी, फ्रेंच, रशियन अशा भाषा शिकायला मुळीच विरोध नाही. खरे म्हणजे आपण भारतीय भाषाही अवगत केल्या पाहिजेत. परंतु कुठली तरी भाषा येण्यासाठी शिक्षणाचे संपूर्ण माध्यम इंग्रजी असण्याची खरोखर गरज आहे का? आणि इंग्रजी शिकण्यासाठी आपल्या मातृभाषेचा द्वेष करण्याचे कारण काय आहे? आज इंग्रजी शाळांमधून भारतीय भाषा अजिबात शिकविल्या जात नाहीत. एवढेच नाही तर मुले मातृभाषेत परस्परांशी बोलल्यास त्यांना मारहाण केली जाते. हैद्राबादच्या एका इंग्रजी शाळेत एक बालकाचा यामुळे मृत्यू झाला. पुण्याजवळच्या भोसरी येथील इंग्रजी शाळेमध्ये मराठी बोलणाऱ्या मुलांना जबर शिक्षा करण्यात आली. या घटनांची नोंद यासाठी केली की आपण इंग्रजीसाठी सर्व काही सोडायला तयार झालो


अनुक्रमणिका

आहोत. मग मातृभाषा आपल्या मुलांना न आली तरी चालेल, असाच दृष्टिकोन वाढत चालला आहे. विशेषतः जागतिकीकरणानंतर आणि संगणकीकरणानंतर याचे प्रमाण अधिकच झाले आहे. जागतिकीकरणामुळे भारतीय माणूस, मराठी माणूस कमालीचा धास्तावला आहे आणि त्याला इंग्रजी हीच आपली तारणहार भाषा आहे, असे वाटू लागले आहे. 'बहुजन हित' 'कल्याणकारी राज्य' असल्या संकल्पना कधीच लोप पावल्या आहेत.

या बदललेल्या परिस्थितीत सामान्यांच्या उत्थापनाचे काय हा प्रश्न अधिकाधिक गंभीर होत चालला आहे. तो कसा ते समजून घेण्यासाठी भाषा किती पातळ्यांवर काम करते ते लक्षात घेणे गरजेचे आहे आणि भाषिक राजकारणही समजून घेण्याची गरज आहे.

राजकारण दोन प्रकारचे असते. एक सामान्यांच्या उत्थापनाचे आणि दुसरे हितसंबंधीयांच्या हितसंबंधांच्या रक्षणाचे. हितसंबंधीयांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी प्रामुख्याने भाषिक राजकारण केले जाते. कधी अजाणता किंवा अधिक मोठ्या प्रमाणात जाणीवपूर्वक हे केले जाते. या भाषिक राजकारणाला आपल्या देशात जवळजवळ दोनशे वर्षांची परंपरा आहे. ती अव्वल इंग्रजी कालखंडापासूनची. इंग्रज येथे आले. त्यानंतर त्यांनी एका व्यवस्थेची निर्मिती केली. शिक्षण, औद्योगिकीकरण या तर महत्त्वाच्याच गोष्टी होत्या. पण न्यायदान, महसूल इ. क्षेत्रांतही त्यांनी काही नवे पायंडे पाडले. परिणामी वेगवेगळ्या क्षेत्रांत नोकऱ्यांची संधी निर्माण होत गेली. या नोकऱ्या शिक्षितांना मिळत गेल्या. विशेषतः ज्यांचे इंग्रजी चांगले होते, त्यांना नोकऱ्या मिळत गेल्या. येथे आणखी एक गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे. प्रारंभी इंग्रजांनी देशी भाषांमध्ये शिक्षण द्यावयास आरंभ केला. त्यासाठी त्यांनी भाषा तज्ज्ञांची नेमणूक केली. परंतु पुढे उच्च शिक्षण सुरू झाले आणि एतद्देशीयांनी इंग्रजी माध्यमाचा आग्रह धरला. इंग्रजीमुळे सत्ताधारी वर्गाच्या जवळ जाता येते याची जाणीव त्या काळातील उच्चभ्रू आणि हितसंबंधी मंडळीला होती. परिणामी ज्यांना इंग्रजी येते ते सत्तेच्या जवळ जाऊ लागले. नोकऱ्यांमध्ये त्यांना संधी मिळू लागली. तेव्हापासून नोकरी आणि इंग्रजी भाषा यांचे संबंध दृढ झाले. स्वातंत्र्यानंतरही प्रशासनातील इंग्रजीचे महत्त्व अबाधित राहिले. परिणामी आज नोकरी हवी किंवा काही प्रगती करावयाची असेल तर इंग्रजी आवश्यक वाटू लागले.

इंग्रजी येणाऱ्यांना नोकरी हे सूत्र एकदा निश्चित झाले की इंग्रजी न येणारे आपोआप स्पर्धेतून बाजूला होतात. हे एक भाषिक राजकारणच आहे. अर्थात या भाषिक राजकारणाचे दीर्घ स्वरूपी परिणामही होतात. म्हणजे प्राचीन काळी शिक्षणाची वाटणी झालेली होती. अक्षरज्ञान ब्राह्मणांना आणि शस्त्रास्त्रांचे शिक्षण क्षत्रियांना अशी कडेकोट वाटणी होती. परिणामतः समाजातील बहुसंख्य वर्ग सत्तेपासून, संपत्तीपासून आणि अक्षरांपासून दूरच होते. हेही एकप्रकारे वर्गवर्चस्व टिकविण्याचे राजकारणच होते. पुन्हा याला धर्माचा पाठिंबा म्हणून ते कित्येक शतके चालूच राहिले. याला पहिला तडा गेला तो इंग्रज येथे आल्यानंतर. पण आता एक नवाच खोडा निर्माण झाला तो इंग्रजी भाषेचा. त्यामुळेच आज सर्व गटांना वाटते की इंग्रजी आलेच पाहिजे. त्यासाठी ते वाटेल ते करायला तयार आहेत. असे असले तरी भारतातील प्रचंड लोकसंख्या आणि दारिद्र्य, अज्ञान इ. गोष्टी लक्षात घेतल्या की, इंग्रजीने आपला अभ्युदय होणार नाही हे लक्षात येते. म्हणूनच कल्याणकारी राजकारण



अनुक्रमणिका

करावयाचे असेल तर येथील मातृभाषांचाच आग्रह धरावा लागेल हे उघड आहे. परंतु आता जागतिकीकरण येऊन थडकले आहे. त्यालाही पाव शतक होऊन गेले. सर्वच क्षेत्रांतील प्रश्न अधिक बिकट होत आहेत. मातृभाषा मराठीचा प्रश्नही बिकट आणि गुंतागुंतीचा होऊन गेला आहे.

भाषांचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते की माणूस खऱ्या अर्थाने त्याच्या भाषेतूनच व्यक्त होतो. कारण शब्द उच्चारला की त्यामधून संवेदना, भावना, विचार आणि ज्ञान इत्यादी बाबी एकत्वाने ध्वनित होतात. कारण त्या त्या भाषांना कित्येक शतकांचा इतिहास असतो. संस्कृती असते. म्हणूनच एकाच संस्कृतीतील माणसांना एखाद्याने शब्द उच्चारला की कितीतरी गोष्टी सहजपणे लक्षात येत जातात. त्यासाठी त्याला शब्दकोश घेऊन बसावे लागत नाही. उलट परभाषेतून या साऱ्याच गोष्टी करणे अवघड होते. ते स्वाभाविक असतच नाही. तरीही सर्व क्षेत्रांतील आजचे चित्र काय आहे? विशेषतः जागतिकीकरणानंतर आणि तंत्रज्ञानाच्या घोडदौडीनंतर तर चित्र अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे.

जीवनाच्या सर्व क्षेत्रांत भाषेशिवाय कुठलाही व्यवहार करणे शक्यच होत नाही. तरीही स्थूल मानाने आपण काही क्षेत्र निश्चित करू शकतो. आपण काही क्षेत्र निश्चित करून एकूण परिस्थितीचा विचार करू. यातील पहिले क्षेत्र हे शिक्षणाचे आहे. कारण भाषेच्या वापराशिवाय शिक्षण प्रक्रिया पूर्णच होऊ शकत नाही. शिवाय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत प्रवेश करावयाचा तर कुठल्या ना कुठल्या प्रकारचे शिक्षण आवश्यकच असते. म्हणून जीवनातील शिक्षणक्षेत्र ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. त्यातून ज्ञानाचे संक्रमण होते. ज्ञानाचे संक्रमण स्वाभाविक रीतीने व्हावयाचे असेल तर ते मातृभाषेतूनच होते हे जगभरात मान्य झालेले शैक्षणिक सूत्र आहे. माणूस विचार करतो ते मातृभाषेतूनच. विचारातूनच ज्ञाननिर्मिती होते. याचा अर्थ असा की ज्ञाननिर्मितीसाठी मातृभाषा महत्त्वाची असते. म्हणूनच भारतापेक्षा पुढारलेले सारेच देश आपापल्या मातृभाषेतूनच शिक्षण देतात. रशिया, फ्रान्स, जर्मनी, जपान आणि चीन हे देश आपल्या कितीतरी पुढे आहेत. त्यांनी जागतिक पातळीवरील महत्त्वाचे शोध लावले आहेत, ते त्यांच्या मातृभाषेमधून शिक्षण घेऊनच. एवढेच नाही तर भारतातील महत्त्वाच्या संशोधकांचे शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून झाले आहे. अब्दुल कलाम, माशेलकर, गोवारीकर यांचे शिक्षण काही इंग्रजी माध्यमातून झाले नाही. असे असतानाही आपल्या देशात इंग्रजी शाळांचे प्रस्थ वाढते आहे. विशेषतः जागतिकीकरणानंतर खेडोपाडी इंग्रजी शाळा निघत आहेत. ज्यांची ऐपत नाही, ती मंडळीही आपल्या पाल्यांना इंग्रजी शाळेत टाकत आहेत याचे कारण काय हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचा आज गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. त्याचे एक कारण तर उघड आहे. जागतिकीकरणानंतर देशोदेशीचे उद्योग भारतात येतील, तेव्हा तेथे नोकरी मिळवायची असेल तर इंग्रजी आली पाहिजे, असे आपल्या लोकांना वाटते आहे, खरे म्हणजे ज्यांना येथे उद्योग सुरू करावयाचे आहेत, फायदा मिळवायचा आहे, त्यांनी, त्यांच्या अधिकाऱ्यांनी इथल्या भाषा शिकल्या पाहिजेत. त्यांना आपणही ठणकावून सांगितले पाहिजे की, तुम्हाला येथे नफा कमवायचा आहे ना? मग आमच्या भाषेत आमच्याशी व्यवहार करा, परंतु हे न करता आपण त्यांना पायघड्या टाकून, मानसिक गुलाम होऊन त्यांच्या स्वागताला उभे आहोत. येथे फक्त उपजीविकेचा विचार केला जातो आहे. खऱ्या खुऱ्या ज्ञाननिर्मितीचा विचारच नाही. यातून आपले शोषणच होणार आहे. परंतु असा दीर्घ पल्ल्याचा विचार करण्याची दृष्टी ना आमच्या शासनाजवळ आहे ना, समाजधुरीणांजवळ आहे. पण एवढाच एक मुद्दा नाही. मराठी शाळांची दुःस्थितीही त्याला कारण आहे. खडूचा पुडा घ्यायला पैसे नाहीत, वशिल्याने भरलेले आणि कायम अशैक्षणिक कामात गुंतविले गेलेले शिक्षक, गळक्या इमारती आणि कसल्याच आधुनिक सुविधा नसणे हे आज मराठी शाळांचे वैशिष्ट्य झाले आहे. याउलट भांडवली पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या इंग्रजी शाळा अत्याधुनिक सोयींनी सज्ज असतात. पहिल्या वर्गापासून संगणक शिकविला जातो. त्यामुळे पालकांना इंग्रजी शाळांचे आकर्षण वाटल्यास नवल नाही. दोन प्रकारच्या शाळांमधील अभ्यासक्रमाच्या दर्जातही फरक असतो. सी.बी.एस.सी. बोर्ड आणि एस.एस.सी. बोर्ड यांच्या अभ्यासक्रमातील दर्जामध्ये लक्षणीय फरक असतो. शासन आपली लोकप्रियता वाढविण्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी उत्तीर्ण व्हावेत, असे निर्णय घेत असते. सोयी द्यायच्या नाहीत, अनुदान द्यायचे नाही, शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा बोजा लादायचा हे शासनाचे धोरण आहे. मराठी शाळा बंद

अनुक्रमणिका

व्हाव्यात अशीच शासनाची इच्छा असावी, असे एकूण चित्र आहे!

म्हणजे मातृभाषा मराठीच्या पिछेहाटीला शासनच जबाबदार आहे, असे म्हणावे लागते. या धोरणाचा परिणाम आणखी काही वर्षांनंतर जाणवायला लागतील. जेव्हा नुसतं इंग्रजी बोलणारे आणि ज्ञान क्षेत्रात कोणतीही भर न घालणारे लोक मोठ्या प्रमाणात भोवती दिसायला लागतील!

भाषेच्या संवर्धनाचे एक स्वाभाविक क्षेत्र म्हणून आपण शिक्षणक्षेत्राकडे पाहतो. शालेय शिक्षणाची दुःस्थिती आपण पाहिली. उच्च शिक्षणाची कथा काही वेगळी आहे, असे नाही. त्याचीही विस्ताराने चर्चा केली पाहिजे.

स्वातंत्र्यानंतर अनेकविध बाबींचा विस्तार सुरू झाला. प्रशासन, शिक्षण, उद्योग, वित्त, चित्रपट, प्रसार-माध्यमे, सेवाक्षेत्रे अशा कितीतरी क्षेत्रांचा विस्तार होऊ लागला आहे. जागतिकीकरणानंतर या विस्ताराने गती घेतली आहे. गेल्या २५ वर्षांतील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या घोडदौडीने आजच्या वास्तवाला अधिकच गुंतागुंतीचे केले आहे. तेव्हा या गुंतागुंतीच्या काळातील एकेका जीवनक्षेत्रांतील मराठीची स्थिती काय आहे याचा शोध घेताना अधिकच निराशाजनक परिस्थिती आहे, असे म्हणावे लागते.

कुठल्याही उद्योगातील कामगार जर सोडले तर वरचे सर्व व्यवहार इंग्रजीमध्ये होतात. तेथे मराठी अजिबात चालत नाही. सर्व प्रकारच्या निर्मित वस्तूंच्या वेष्टणावरील नावे इंग्रजीत लिहिलेली असतात. सर्व प्रकारच्या औषधींवरील नावे इंग्रजी असतात. आता सामान्य मराठी माणसांसाठी वेष्टणावर 'कोलगेट' असे नाव देवनागरीत लिहिणे हा अपवाद होऊ नये. हे एक उदाहरण झाले. कारखान्यातील कुठलीही वस्तू, त्याची माहितिपत्रके इ. साऱ्याच बाबी इंग्रजीत असतात. अगदी खतांची नावेसुद्धा पाहा. आता शेतकऱ्यांसाठी जर ही उत्पादने असतील तर हे सारे त्याच्या भाषेत नको का? एका प्रकारची उत्पादकांची ही गुर्मी असते आणि ती आपण खुशाल चालवून घेतो. हरियाणा प्रातांत उद्योग सुरू करावयाचा असेल तर सर्व अर्ज, प्रपत्रे हिंदीमध्येच सादर करावी लागतात. महाराष्ट्रात मात्र मराठी अगर इंग्रजीमध्ये अर्ज आणि प्रपत्रे सादर केली तर चालतात. अशी सवलत असेल तर कोण मराठीमध्ये पत्रव्यवहार करील? महाराष्ट्राचा असा सगळा भोंगळ कारभार. मराठी सक्तीची केल्यास उद्योगांमधील अधिकारी मराठी शिकतील किंवा मराठी जाणणाऱ्यांची नेमणूक करतील. यातून मराठी माणसांचा रोजगार वाढेल. शेवटी जी भाषा रोजगाराला उपयोगी ठरत नाही ती कोण कशाला जपून ठेवील? येथे महाराष्ट्र शासनाची इच्छाशक्तीच नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. याचा दुसरा अर्थ असा की, उद्योग वाढत जातील, इथली शेती नष्ट होईल आणि मराठी माणूस केवळ कामगार होत जाईल!

सध्या नवेनवे उद्योग सुरू होत आहेत. उदा. जनसामान्यांशी निगडित असणारा बांधकाम व्यवसाय आणि त्यानंतरच्या गृहनिर्माण संस्था जरी आपण पाहिल्या तरी तेथील सर्व प्रपत्रे व संस्थांच्या बैठकीचे अहवाल इंग्रजीमध्ये असतात. गृहनिर्माण उद्योगाची ही अवस्था असेल, तर औषध-निर्माणासारख्या उद्योगांची काय अवस्था असेल, याची कल्पनाच केलेली बरी.

सामान्य माणसांसाठी न्याय व्यवस्था असते. तेथील सर्व निकालपत्रे इंग्रजीमध्ये असतात. सर्व प्रकारचे 'आरगुमेंटस' इंग्रजीमध्ये होतात. आपल्या खटल्याबद्दल नेमके काय चालले आहे, ते सामान्य माणसाला कळण्याचे कारणच नसते. हे भाषेच्या आडून होणारे सामान्य माणसांचे शोषण नव्हे काय?

न्यायालयापाठोपाठ आपण वित्त क्षेत्राकडे येतो, तेव्हा तेथील परिस्थिती वरचेवर बिकट होत चाललेली दिसेल. बँकांचे वार्षिक अहवाल, सर्व प्रकारची प्रपत्रे, पासबुकांमधील सर्व नोंदी आणि जवळजवळ इतर सर्वच व्यवहार इंग्रजीमधून होतात. आता जर मराठीत चेक लिहिला तर त्याच्या अनुवादाचे पैसे दंड म्हणून भरावे लागणार आहेत, असे कळते. म्हणजे पहा, या सर्व बँका मराठी माणसांच्या जीवावर उभ्या राहणार आणि मराठीत लिहायला मात्र बंदी! वस्तुतः प्रादेशिक भाषांमध्ये कामकाज करावे असे निर्देश रिझर्व्ह बँकेने दिलेले आहेत. पण कायदे पायदळी तुडविण्यात आपल्या देशातील लोकांना धन्यता वाटते! मराठीमध्ये व्यवहार न करण्याचे कारण मात्र संगणकाचे सांगितले जाते. खरे म्हणजे मराठी सॉफ्टवेअर भरले की संपूर्ण कामकाज सहजपणे मराठीत होऊ शकते. पण कोणालाच ते करायचे नाही. येथे राज्य शासनाने इच्छाशक्ती दर्शविली तर हे सारेच व्यवहार मराठीत होऊ शकतात.

महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनाची भाषा मराठी असली तरी शासनाशिवायचे सारे प्रशासन इंग्रजीतूनच

चालते, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

नव्याने जी सेवाक्षेत्रे येत आहेत, ती सारी मातृभाषेत व्यवहार करणे कमीपणाचे मानतात आणि उच्चभ्रूंशी संबंधित हॉटेल्ससारखे उद्योग तर मातृभाषा बोलणे तर गुन्हेगारीसदृश्यच मानतात.

इत्यर्थ काय तर बदललेल्या जगात अनेक गोष्टींचा विस्तार होतो आहे. परंतु देशभरातील त्या त्या प्रांतांच्या भाषा या प्रक्रियेमधून क्रमाने बाद होत चाललेल्या आहेत. हे असेच चालत राहिले तर भारतातील भाषा क्रमाक्रमाने केवळ ग्रंथालयांपुरत्या राहतील. जसे सध्या पाली, प्राकृत, अर्धमागधी आणि काही प्रमाणात संस्कृतचे झाले आहे!

कुठल्याही भाषेच्या संदर्भात अशा प्रकारची अवस्था जेव्हा निर्माण होते, तेव्हा त्या त्या भाषिकांवरील जबाबदारी वाढते. अशावेळी केवळ आपल्या भाषेचे गतकालीन वैभव सांगून अगर गौरवपर गीते रचून भागत नसते. त्यासाठी कंबर कसून सामूहिकपणे काम करावे लागते. अशा कामास स्थूलमानाने 'व्यावहारिक' ही संज्ञा दिली जाते. म्हणजे सर्व प्रकारच्या व्यवहारास - विशेषतः ज्ञान व्यवहारासाठी आपली भाषा सामोरी जाऊ शकते हे सिद्ध करावे लागते. हे सर्वच भाषांना करावे लागते. इंग्रजीमध्ये Functional English म्हणून जो भाग शिकविला जातो, तो व्यावहारिक इंग्रजीच असतो. काळ सतत बदलत असतो. सतत ज्ञानक्षेत्रात भर पडत जात असते. नवे नवे शोध लागत असतात. नवे नवे सिद्धान्त सांगितले जात असतात. त्यांना सामोरे जावयाचे असेल तर नव्याने भाषा घडवावी लागते. त्यासाठी दोन पर्याय असतात. त्यापैकी एक म्हणजे मूळ शोध जेथे लागले आहेत. तेथील संज्ञा स्वीकारणे किंवा नव्या अर्थपूर्ण आणि सोप्या शब्दांची जडणघडण करणे. इंग्रजीने या दोन्ही पर्यायांचा स्वीकार केलेला दिसतो. मूळ ग्रीक आणि लॅटीन शब्द काही ठिकाणी स्वीकारलेले दिसतात. उदा. कायद्याच्या क्षेत्रातील अनेक शब्द असेच स्वीकारले गेले आहेत. 'मुटाडी मुंटडीस' असा एक शब्द कायद्यामध्ये येतो. तो मुळातील लॅटीन आहे किंवा अनेक भारतीय शब्द इंग्रजीने स्वीकारले आहेत. उदा. धरणे, सत्याग्रह, घी, लाठीचार्ज इ. इंग्रजीमध्ये जवळजवळ हजारेक शब्द बाहेरच्या भाषेतून घेतले आहेत, असे सांगितले जाते.

मराठीपुढेही हे दोन पर्याय आहेत. काही संज्ञा जशाच्या तशा स्वीकारणे आवश्यक असेल तशा त्या स्वीकारणे, वापरणे आणि रूढ करणे. काही शब्दांची नव्याने निर्मिती करता येऊ शकते. संगणक, कळफलक, अभियंता असे काही नवे शब्द सध्या मराठीमध्ये निर्माण करण्यात आले आहेत. ते साधे, सोपे, अर्थवाही असल्याने सहजपणे रूढही झाले आहेत. परंतु कधी कधी चमत्कारिक शब्दांची निर्मिती केली जाते. उदा. सिग्नलसाठी 'अग्निरथगमनागमनदर्शक ताम्र लोहपट्टिका' आता असे शब्द रूढ कसे व्हावेत? विविध संज्ञा निर्मितीच्या वेळी उगीचच संस्कृताश्रयी होण्याचा आग्रह दिसतो. असे करण्याचे कारण नाही. पुष्कळ संज्ञांना बोलींमध्ये काही शब्द सापडू शकतात का ते पाहिले पाहिजे. असंख्य बोलींमुळे मराठीएवढी समृद्ध भाषा दुसरी कोणती नसावी. फक्त बोली बोलणारे तद्दन अडाणी ही उच्चभ्रू भूमिका सोडून दिली पाहिजे. बोलींमध्ये अर्थवाही असणारे शब्दधन ओळखले पाहिजे. परंतु आपल्या मनात मुख्यतः शिक्षितांची मराठी, तसेच पुणेरी मराठी हीच प्रमाण आहे असा एक समज होऊन बसला आहे. तो प्रथमतः काढून टाकावा लागेल.

प्रतिशब्द घडविताना किंवा संज्ञांची निर्मिती करताना आपण सारेच संस्कृतच्या आश्रयाला जाण्याचा प्रयत्न करतो. त्याची दोन कारणे आहेत. पैकी एक म्हणजे संस्कृत ही 'देववाणी' आहे. म्हणून ती पवित्र आहे. म्हणून तर संत एकनाथांनी प्राकृत ही चोरांपासून आली काय असा प्रश्न उपस्थित केला होता. दुसरे कारण म्हणजे भारतातील मराठीसारख्या अनेक भाषा संस्कृतपासून आल्या आहेत, असा वृथा समज आहे. खरे म्हणजे संस्कृतच्या पूर्वीही येथे प्राकृत भाषा होत्या. या साऱ्या भाषांच्या मिश्रणामधून संस्कृत तयार झालेली असण्याची शक्यताच अधिक आहे.

तात्पर्य काय की, नव्या ज्ञानाला सामोरे जाताना व्यावहारिक भाषा निर्माण करण्याची फार फार आवश्यकता असते. हे झाले नाही तर माणसे अपरिहार्यपणे इतर भाषांच्या आश्रयाला जातात. उदा. नव्याने संगणक आला तेव्हा इंग्रजीशिवाय पर्याय नाही असेच चित्र निर्माण केले गेले. कारण मुळात संगणक नावाची गोष्ट आपण शोधलेली नव्हती. खरे म्हणजे आपण काहीच शोधलेले नाही, हा भाग वेगळा. भारतीयांचा सगळाच उसना संसार असतो. असो. हा मुद्दा थोडावेळ आपण बाजूला ठेवू. संगणक जेव्हा प्रथमतः आपल्याकडे आला, तेव्हा इंग्रजी महत्त्वाची

अनुक्रमणिका

ठरली. परंतु पुढे मात्र भारतीयांवर व महाराष्ट्रीयनांच्या पुढे मोठी जबाबदारी होती. ती म्हणजे संगणकयोग्य मराठी निर्माण करण्याची. यासाठी थोडी माणसे पुढे आली, नाही असे नाही. परंतु खरे काम केले ते अमेरिकास्थित 'युनिकोड' या संस्थेने.

आज जगभर ज्ञानाचा स्फोट झालेला आहे. नव्यानव्या ज्ञानशाखा उदयाला आलेल्या आहेत. येत आहेत. आंतरविद्याशाखीय अभ्यास वाढले आहेत. त्यातून पुन्हा नवे संशोधन होत आहे. भाषाविज्ञानातील सिद्धान्त राजकीय विश्लेषणासाठी वापरले जात आहेत. अशी सगळी परिस्थिती असताना मराठी माणसे किती काम करतात, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जगामध्ये सगळे संशोधन केवळ इंग्रजी भाषा बोलणाऱ्या प्रदेशातच होते हा आपला मोठा गैरसमज आहे. अनेक शोध आणि तत्त्वज्ञानपर लेखन/सिद्धान्त मुळात जर्मन भाषेमध्ये झालेले दिसेल. चंद्रावर प्रथम पाय ठेवणारा माणूस रशियन भाषा बोलणारा होता, हेही लक्षात घ्यावे लागते. परंतु जगभरातील लोक इतके सजग आहेत की, काही महिन्यांमध्ये ते संशोधन किंवा तत्त्वज्ञान आपापल्या भाषांमध्ये ते लोक घेऊन येतात. आपल्या भाषेत मुरवून घेतात. त्याचे कारण म्हणजे त्यांना आपल्या समाजबांधवांची चिंता असते. भारतात तर एक जात दुसऱ्या जातीला ज्ञान देऊ इच्छित नव्हती. आज थोडी परिस्थिती बदलली आहे. पण पीळ मात्र जात नाही! तेव्हा महत्त्वाचा मुद्दा असा की नव्या ज्ञानाला सामोरे जाण्यासाठी आपली भाषा व आपण सतत प्रयत्नशील राहावे लागते.

''अमृतातेही पैजा जिंके'' एवढे म्हणून भागत नाही. मध्ययुगामध्ये केवळ आध्यात्मिक ज्ञान तेवढे महत्त्वाचे होते. शिवाय ते भारतीय परिवेशातीलच होते. तेव्हा मराठीला अध्यात्मासाठी सिद्ध करणे हे आव्हान होते. मध्ययुगातील महनीयांनी ते यशस्वीपणे केले. परंतु आज लौकिक जग अधिक महत्त्वाचे झाले आहे. बहुजनांचा उद्धार ही गोष्टही महत्त्वाची झाली आहे. त्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञान महत्त्वाचे झाले आहे. त्यासाठी मराठीला सिद्ध करण्यासाठी खूप खूप प्रयत्न करावे लागतील. नवी नवी जी क्षेत्रे येत आहेत त्यासाठी मराठीला सिद्ध व्हावे लागेल. उदा. पर्यटन आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया यांसारख्या नव्या गोष्टी आपल्या देशात आलेल्याच आहेत. या सगळ्याच गोष्टींसाठी मराठीला नवे शब्द, संज्ञा आणि वाक्यरचनाही घडवावी लागेल. मराठी माणूस यासाठी किती तयार आहे? आजचा 'व्यवहार' खूपच वाढला आहे, तेव्हा आपल्या 'व्यावहारिक मराठी'ची व्याप्ती त्या व्यवहाराला न्याय देते का हाही महत्त्वाचा प्रश्न आहे.

त्याचे कारण असे की 'व्यावहारिक मराठी' म्हटले की काहीतरी किरकोळ अभ्यासक्रम / कंटाळवाणा अभ्यासक्रम असा शिक्षक व विद्यार्थ्यांचा समज असतो. ही आपली गरज आहे आणि त्याचे क्षेत्र फार मोठे आहे, याची जाण फार कमी लोकांना असते. या संदर्भात माझा स्वतःचा काही अनुभव येथे सांगायला हरकत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये इ.स. २००० मध्ये प्रथमतः सत्र आणि श्रेयांक पद्धती सुरू करण्यात आली. तसेच विद्यापीठ विभागांना स्वायत्तता देण्यात आली. त्यावेळी तेथे मी मराठी विभागप्रमुख असल्यामुळे काही नव्या अभ्यासपत्रिका सुरू करण्याची संधी विभागाला मिळाली. त्यावेळी मी काही नव्या ऐच्छिक अभ्यासपत्रिका सुरू केल्या. उदा. आपण नेहमी वाङ्मयाच्या इतिहासाचे पुनर्लेखन व्हायला पाहिजे असे म्हणतो. त्यासाठी 'इतिहासलेखन शास्त्र' हा ऐच्छिक विषय सुरू केला. 'सृजनशील साहित्य आणि निर्मिती मीमांसा', 'अनुवाद मीमांसा', 'साहित्य आणि इतर सामाजिक शास्त्रे' अशा नव्या अभ्यासपत्रिका सुरू केल्या. मराठीच्या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे व्यवसाय करता यावा अगर व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये नोकरी करता यावी यासाठी 'व्यावहारिक मराठी'ची एक अभ्यासपत्रिका सुरू केली होती. या अभ्यासपत्रिकेचे समन्वयक म्हणून मराठी विभागातील एक प्राध्यापक काम करीत असत. परंतु अभ्यासपत्रिकेचे स्वरूप इतके व्यापक होते की, बाहेरच्या अभ्यागतांना बोलविले जात होते. हे अभ्यागत प्राध्यापक नव्हते. तर मुद्रणालयाचे मालक व व्यवस्थापक, प्रकाशन संस्थेचे मालक आणि संपादक, वर्तमानपत्राच्या संपादन विभागातील आणि जाहिरात विभागातील अधिकारी व्यक्ती, दिवाळी अंकांचे संपादक, स्मरणिकांचे संपादक, जिल्हावर्तमानपत्रातील लोक आणि चांगले लेखक यांना अतिथिव्याख्याते म्हणून बोलाविले जात होते. विभागातील समन्वयकही काही भाग शिकवायचे. अशा पद्धतीने हा अभ्यासक्रम पूर्ण केला जायचा. यातून तयार झालेले काही विद्यार्थी आज उत्तम व्यवसाय करीत आहेत. काही वर्तमानपत्रांमध्ये सहसंपादक म्हणून काम

अनुक्रमणिका

करीत आहेत. परंतु एक गोष्ट मात्र खटकते की, अशा अभ्यासपत्रिका घेणारे विद्यार्थी फार थोडे असत. दरवर्षी सात-आठच्या पुढे ही संख्या जात नसे. विद्यार्थ्यांचा ओढा नेहमीच्या अभ्यासपत्रिका निवडण्याकडे असायचा. तरीही मला वाटते की अशा प्रकारची व्यापक विषयपत्रिका प्रत्येक विद्यापीठात सुरू केली पाहिजे. आमच्या विभागाने तयार केलेली अभ्यासपत्रिका परिपूर्ण होती, असे मी काही म्हणणार नाही. त्यात आणखी काही विषयांचा समावेश केला जाऊ शकतो. उदा. नव्यानव्या ज्ञानशाखा आणि संज्ञांची निर्मिती इत्यादी.

'व्यावहारिक मराठी'ची अभ्यासपत्रिका तयार करताना विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता व कौशल्ये वाढविणे हा मुख्य दृष्टिकोन ठेवण्यात आलेला होता. त्यामुळे या अभ्यासक्रमाचे नाव 'भाषिक कौशल्ये' असे दिले गेलेले होते. मला वाटते, व्यावहारिक मराठीचा हेतू भाषेला विविध व्यवहारासाठी सिद्ध करणे हा असतो आणि त्यासाठी भाषिक कौशल्यांचा विकास आवश्यक असतो. हा दृष्टिकोन ठेवला तर ही अभ्यासपत्रिका रूक्ष वाटणार नाही. किंबहुना भाषिक कौशल्ये विकसित करणे ही आजची गरज आहे, हेही लक्षात ठेवले पाहिजे. ही गरज लक्षात घेऊन मराठीच्या अभ्यासकांनी स्वयंस्फूर्तीने विविध प्रकारचे कोश तयार केले पाहिजेत. इंग्रजीतील विविध विषयांतील महत्त्वाचे ग्रंथ अनुवादित करणे. त्यासाठी संज्ञा तयार करण्याचे कार्य सतत चालू राहिले पाहिजे. तसेच विविध ज्ञानशाखांचे उत्तमोत्तम मराठी ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत. तसेच नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून भाषिक कौशल्ये विकसित करणे, तसेच नव्या तंत्रज्ञानाला सामोरे जाणे, यासारख्या खूप गोष्टी करणे ही आजच्या काळाची गरज आहे. किंबहुना आजचा मराठी माणूस आणि महाराष्ट्र शासन किती इच्छाशक्ती दाखवते, त्यावरच सर्व काही अवलंबून राहणार आहे.


'व्यावहारिक मराठी'च्या अभ्यासक्रमा-सोबतच मराठीच्या बोलींच्या संशोधनालाही महत्त्व दिले पाहिजे. विशेषतः विविध बोलींमुळे मराठी ही समृद्ध भाषा झाली आहे. तसेच संज्ञांच्या निर्मितीमध्ये बोलीतील शब्द वापरता येऊ शकतात असे म्हटले जाते. बोलीतील शब्दांचे प्रमाणीकरण करून ते शब्द प्रमाणभाषेतही वापरता येऊ शकतात, हेही लक्षात घेतले पाहिजे.

वस्तुतः कुठल्याही भाषेच्या काही बोली असतातच. काही भौगोलिक आणि प्रादेशिक कारणांमुळे भाषा वेगवेगळ्या रूपात व्यक्त होत जातात. उदा. हिंदीचा विचार केला तर ब्रजसारख्या अनेक बोली उत्तर भारतात आहेत असे दिसेल. महाराष्ट्रात अहिराणी, वऱ्हाडी, मराठवाडी, नागपुरी, मालवणी इ. बोली आहेत. या बोलींना एक वेगळा अंगभूत गोडवा आणि लय आहे. हा विलक्षण गोडवा ऐकताक्षणी लक्षात येतो. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, या सगळ्या बोलींकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन फारसा चांगला नाही. या बोलींना आपण गावंढळ, अशुद्ध वगैरे म्हणतो. प्रमाणभाषेपेक्षा - ग्रांथिक भाषेपेक्षा जर ती वेगळी असेल तर ती अशुद्ध किंवा गावंढळ कशी असेल? ती केवळ वेगळी असते आणि त्यासाठी काही कारणे असतात. म्हणून लोकमानसातून शुद्ध-अशुद्ध असा भाव काढून टाकला पाहिजे. आणि त्यातील शब्द प्रमाणभाषेत कसे आणता येतील, त्यांना प्रतिष्ठा कशी देता येईल यांचा विचार केला पाहिजे. कारण या बोलींमध्ये त्या त्या प्रदेशाने अर्जित केलेले ज्ञान साठवलेले असते. त्या त्या बोलींमध्ये फार सुंदर लोकसाहित्य असते. हे सारे धन अभ्यासायचे असेल तर बोलींकडे दुर्लक्ष करून कसे चालेल? उलट अभ्यासकक्षेत न आलेल्या अनेक बोलींचे अभ्यास झाले पाहिजेत. उदा. कैकाडी, वैदू इ. असंख्य जातींची वेगळी भाषा आहे. या भाषांचा अभ्यास समाजशास्त्रीय अभ्यासासाठी फार फार महत्त्वाचा ठरू शकतो. त्या दृष्टीने सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक आणि भाषा विषयांचे अभ्यासक एकत्र येऊन आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास होऊ शकतो.

• • •

▪ **डॉ. नागनाथ कोत्तापल्ले,** प्लॅनेट मिलेनिअम, रो-हाऊस नं. ४, पिंपळे सौदागर, पुणे-४११०२७

अनुक्रमणिका



मराठीचे प्रमाण लेखन

■ मा. गो. वैद्य

प्रत्येकच भाषेचे प्रमाण लेखन असते. असलेही पाहिजे. अन्यथा, सर्वांची भाषा एक आहे, असा ठसा उमटावयाचा नाही. गोंदियापासून गोव्यापर्यंत लोकांची भाषा मराठी आहे. भाषा एक आहे, पण बोली अनेक आहेत. बोलीबोलीत फरक पडण्याचे कारण, उच्चारसुलभतेतील विविधता हे आहे. कोणत्या लोकसमूहाला कोणता उच्चार सोपा वाटेल, याचा निकष नाही. आपण 'गूळ' शब्द उच्चारतो. तो प्रमाण उच्चार आहे. परंतु, आमच्या वर्धा जिल्ह्यातील खेड्यापाड्यात 'गुर' असा उच्चार करतात. अमरावतीकडे 'गुय' म्हणतात. तर गोंदियाकडे 'गुड' म्हणतात.

जोडाक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांचा उच्चार कठीण असतो. तो उच्चार सामान्यतः तीन पद्धतींनी सोपा केला जातो. एक पद्धत मागे स्वर टाकण्याची आहे. 'स्टेशन'चे उत्तरेत 'इस्टेशन' होते. दुसरी पद्धत आत स्वर घुसविण्याची आहे. जसे, पंजाबात 'सटेशन'. तर तिसरी पद्धत जोडाक्षरातले पहिले व्यंजन गाळण्याची आहे. जसे खेड्यापाड्यात 'ठेसन'. 'ठेसन'ला हसण्याचे कारण नाही. इंग्रजीतही ही पद्धत रूढ आहे. लिहायचे Know आणि म्हणायचे 'नो'. लिहायचे पळसहीं (निग्त) आणि म्हणायचे 'नाईट'. जोडाक्षरातील एक वर्ण गाळणे आणि स्वर दीर्घ करणे ही सुलभीकरण क्रिया बहुधा जगभर असावी. पर्ण-पण्ण-पान. सर्प-सप्प-साप. कर्म-कम्म-काम. हे संस्कृत-पाली आणि आधुनिक भाषा असे क्रमशील परिवर्तन आहे. तात्पर्य असे की, प्रमाण भाषेने एकच उच्चार स्वीकारला पाहिजे. तरच विस्तीर्ण प्रदेशातील लोकांना भाषेच्या एकत्वाचे भान राहील.

प्रमाण लेखनासाठी, माझे असे मत आहे की, मराठीने संस्कृतशी असलेली नाळ तोडू नये. संस्कृतमध्ये नेमकेपणा आहे. तो अनुकरणीय आहे. आपल्या भाषेतील ८५ टक्क्यांहून अधिक शब्द संस्कृताधारित आहेत. काही तत्सम, म्हणजे जसेच्या तसे आले आहेत, तर काहीत बदल झालेले आहेत. ते बदल सोडण्याचे कारण नाही. जसे पर्ण, सर्प, कर्म यांची रूपे पान, साप व काम ही सोडायची नाहीत. पण पर्ण, सर्प, कर्म यांचा विसरही पडू द्यायचा नाही. अमेरिकेत उच्चाराप्रमाणे spelling चा आग्रह काही दिवस चालला. rite, nite, labor- असे spelling ते करू लागले. ती प्रक्रिया आता त्यांनीच थांबविली आहे. कारण, आता त्यांच्या ध्यानात आले की उच्चाराप्रमाणे लेखनही केले, तर शब्दाचा इतिहास विसरला जातो. घपुं असा उच्चार करणे कठीण आहे. म्हणून 'नो' असा उच्चार करा, पण लिहा मात्र 'क्नो'च. म्हणजे मग ग्रीक भाषेतील 'gnost' शी नाळ जुळेल. आपणही 'ज्ञान' शब्दाचा उच्चार 'ज्ञ्ञान' असा करीत नाही. 'द्न्यान' असा करतो. हिंदीभाषी ग्यान असा करतात. पण लिहितो मात्र 'ज्ञ्ञान' असेच. 'ज्ञ' ही आकृती 'ज्' व 'ञ्' यांचा संयोग आहे. जशी 'क्ष' ही आकृती 'क्'


अनुक्रमणिका

व 'ष्' यांचा संयोग आहे. 'क्नो' लेखनामुळे 'ग्नॉस्ट'शी तसेच आपल्या 'ज्ञ'मुळे 'ञ्आ'शी संबंध जुळतो. Psyche (सायकि)त 'पी' ला कायम ठेवल्यामुळे ग्रीक व लॅटिनशी संबंध जुळतो.

असे सांगितले जाते की, उच्चारानुसार प्रमाण लेखन असावे. पण कुणाचे उच्चारप्रमाण मानावयाचे? अखेरीस शिष्टांचे म्हणजे शिक्षितांचेच उच्चार प्रमाण मानावे लागतात. 'cut' चा उच्चार 'कट्' असाच करावा लागतो. 'put' पुट् म्हणून 'cut' 'कुट्' असे चालायचे नाही.

नव्या प्रमाण लेखनात, मराठीत शेवटचा स्वर दीर्घ करावा असा एक सरधोपट मार्ग सांगितलेला आहे. मला वाटते विद्वानांनी, त्या मागची कारणमीमांसा समजून घेतली पाहिजे. म्हणजे समास करताना गोंधळ व्हायचा नाही. उदाहरणार्थ, 'बुद्धी', 'मती' हे शब्द आपण दीर्घ ईकारान्त लिहितो. पण बुद्धिनिष्ठ, मतिमंद अशा सामासिक शब्दात तो इकार ऱ्हस्व करतो. हे अगदी योग्य आहे. फक्त आपण त्यामागचे शास्त्र समजून घ्यावे असे मला वाटते. त्यासाठी मी संस्कृत व्याकरणातील दोन संज्ञांचा उपयोग करणार आहे. (१) प्रातिपदिक आणि (२) पद. ज्याला अर्थ आहे, पण जो शब्द धातू नाही, म्हणजे क्रियावाचक नाही व प्रत्ययही नाही त्याला 'प्रातिपदिक' अशी संज्ञा आहे आणि पद म्हणजे ज्याला विभक्तीचा प्रत्यय लागला आहे असा शब्द. अनेकदा विभक्तीचा प्रत्यय दिसत नाही. पण त्याचे कार्य संपन्न झालेले असते. उदा. मी आंबा खातो. यात 'मी' प्रथमा विभक्ती आहे आणि 'आंबा' ही द्वितीया विभक्ती आहे. हे वाक्य कर्तरि प्रयोगातील आहे. म्हणजे कर्ता बदलविला तर त्याप्रमाणे क्रियापद बदलवावे लागते. म्हणजे खाणारी व्यक्ती स्त्री असेल, तर 'ती आंबा खाते' असे वाक्य होईल. 'खातो'चे 'खाते' करावे लागेल. परंतु 'आंबा' हे कर्म आहे. म्हणजे त्याची द्वितीया विभक्ती आहे. क्रियापद, कर्तरि प्रयोगात कर्त्याप्रमाणेच चालेल. त्यामुळे, 'आंबा' ऐवजी 'चिंच' म्हटले तरी 'मी' चिंच खातो', 'ती चिंच खाते' असेच प्रयोग होतील.

परंतु, 'मी आंबा खाल्ला' असे वाक्य असेल तर हा कर्मणि प्रयोग आहे. म्हणजे 'मी' ही तृतीया विभक्ती आहे व 'आंबा' प्रथमा. येथे क्रियापद 'आंबा'प्रमाणे चालेल. 'मी आंबा खाल्ला, तिने आंबा खाल्ला' यात खाणारा बदलला, तरी क्रियापद बदलणार नाही. पण 'आंबा' ऐवजी 'चिंच' ठेवले की, 'मी चिंच खाल्ली' असेच



म्हणावे लागेल. मला हे सांगायचे आहे की, या वाक्यातील मी, आंबा, ती, तिने, चिंच ही पदे आहेत. कारण ती विभक्तियुक्त आहेत. वाक्यात विभक्तियुक्तच प्रयोग होत असतो. कारण, कोणताही शब्द, कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, अधिकरण किंवा सामान्य संबंध यापैकीच कोणत्या ना कोणत्या अर्थात वापरला जात असतो आणि विभक्तीचा प्रत्यय लागण्यापूर्वी अंत्य स्वर दीर्घ होणे ही मराठी भाषेची सामान्य प्रवृत्ती आहे. 'घर'चे 'घराला', 'घरात' होते. त्याची 'बुद्धी' स्थिर नाही. त्याची 'मती' भ्रष्ट झाली आहे. अशा वाक्यांमध्ये बुद्धी, मती हे शब्द दीर्घ ईकारान्तच हवेत. पण आपण जेव्हा समास करतो आणि बुद्धिनिष्ठ, मतिमंद असे शब्द वापरतो, तेव्हा विभक्तीच्या प्रत्ययाचा लोप होतो. म्हणून मूळ प्रातिपदिकासारखा तो वापरावा लागतो. म्हणून या शब्दांमध्ये 'बुद्धि', 'मति' हे ऱ्हस्व इकारान्तच हवेत.

याच नियमाप्रमाणे 'स्वामीनिष्ठा' लिहिणे चालणार नाही. 'स्वामिनिष्ठा' असेच लिहिले पाहिजे. मी असे जेव्हा एकदा सांगितले तेव्हा मला प्रश्न करण्यात आला होता की, आम्ही 'स्वामीनिष्ठा' म्हणजे दीर्घ ईकारान्त 'स्वामीनिष्ठा' लिहिले तर चूक कोणती? मी उत्तर दिले

अनुक्रमणिका

की, हे चूक नसेल तर मग 'राजावाडा' लिहाना. राजवाडा का लिहिता? 'राजाचा वाडा' याचा समास करताना 'राजवाडा' असे लिहितो, तर 'स्वामीवरील निष्ठा' यांचा समास करताना 'स्वामिनिष्ठा' असेच लिहिले पाहिजे. 'स्वामिन्' हा नकारान्त शब्द आहे आणि 'राजन्'ही नकारान्त शब्द आहे. स्वामी, स्वामीला, स्वामीने, असे प्रथमा, द्वितीया आणि तृतीया विभक्तीचे प्रत्यय लागले, की ते शब्द 'पदे' बनतात. म्हणून त्यांमध्ये दीर्घ ईकार हवाच. तसेच 'राजन्'ची राजा, राजाला, राजाने अशी आकारयुक्त रूपे होतील. पण समासात विभक्तीचा प्रत्यय लुप्त होतो. म्हणून राजवाडा, राजपुत्र, राजनिष्ठा असे शब्द बनत असतात. म्हणजे मूळ शब्दातला अकार कायम असतो. त्याचप्रमाणे स्वामिनिष्ठा, बुद्धिभ्रम, मतिमंद इत्यादी शब्दातील मूळ ऱ्हस्व इकार समासात कायम असला पाहिजे. हे एकदा विद्वानांनी, शिक्षकांनी व प्राध्यापकांनी समजून घेतले, तर मग प्रमाण लेखनातील बरेचसे अराजक कमी होईल. सुलभीकरण याचा अर्थ प्रमादीकरण नव्हे, अराजकही नव्हे किंवा ज्याला जे सुलभ वाटेल ते करणेही नव्हे. नियमानुसार चालले तर मग सर्वच सुलभ वाटते, असा माझा अनुभव आहे. अचूक उत्तर एकच असते. चुकीची उत्तरे अनेक असू शकतात. आपण अचूक उत्तराचा आग्रह धरावा.

अनेकांना ऱ्हस्व दीर्घाची भानगड समाप्त करावी असे वाटते. पण हा अविचार आहे. अनेक शब्दांमधला अर्थभेदच त्यामुळे समाप्त होईल. दिन व दीन, सुर व सूर, रवि व रवी इत्यादि शब्दांमध्ये ऱ्हस्व-दीर्घाने अर्थ कसा बदलतो, हे कुणाच्याही ध्यानात यावे.

जी भाषा, बोलण्यात आणि लेखनात चालू असते, म्हणजेच जी जीवमान असते, तिच्यात बदल होतच असतात. ज्ञानेश्वरीची किंवा बखरकारांची भाषा आपण लिहित नाही. लेखनभाषेवर बोलभाषेचाही परिणाम होत असतो. तसेच, अन्य भाषांच्या संपर्कामुळेही काही शब्द भाषेत येत असतात. जरूर, गरज, जबाबदार इत्यादी शब्द फारसीच्या संपर्काने आले आहेत. तसेच इंग्रजीच्या संपर्कानेही शब्द आले आहेत. 'पास' म्हणजे उत्तीर्ण होणे हा निर्भेळ इंग्रजी शब्द आहे. 'नापास' असा शब्द आपण आपल्या पद्धतीने नकारात्मक केला आहे. मला वाटते, तो शब्द रूढ झाला आहे तर चालवून घ्यावा. स्टेशन, फोन, टी. व्ही., डॉक्टर यांसारखे अनेक इंग्रजी शब्द स्वाभाविक वाटतात. मात्र इंग्रजीचा सोस नसावा. जेथे सुलभतेने आपल्या भाषेत जो शब्द उपलब्ध आहे, तेथे तोच वापरावा.

सारांश असा की, प्रमाण लेखन सर्वांचे, सर्वत्र समान असले पाहिजे. त्यामुळे, भाषेचा विकास थांबेल, ही भीती निरर्थक आहे.

• • •

▪ **मा. गो. वैद्य,** ८०, विद्याविहार, रिंगरोड, राणाप्रताप नगर, नागपूर - ४४००२२

लेखकांसाठी सूचना

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
मकर संक्रांत १९२३

- साहित्य कागदाच्या एकाच बाजूने व सुवाच्य अक्षरांत लिहिलेले किंवा संगणकीय अक्षरजुळणीच्या स्वरूपात पाठवावे.
- 'युगवाणी'साठी लेखन पाठविताना एक स्थळपत्र लेखकांनी आपल्याजवळ राखून ठेवावी.
- 'युगवाणी'साठीचे लेखन इतरत्र प्रकाशित झालेले नसावे. लेखनाची छायाप्रत (Xerox) पाठवू नये.
- पत्रव्यवहारासाठी पुरेसे टपाल जोडावे. भ्रमणध्वनी क्रमांक वा ई-मेल दिल्यास उत्तम.
- आपले लेखन शक्यतो प्रमाणलेखनाच्या नियमानुसार असावे. तसेच संपादकांना संबोधणारे पत्र जोडावे.
- 'युगवाणी'ला नव्या प्रवाहांचे, नव्या जाणिवांचे आणि सर्जनाच्या नव्या शक्यता धुंडाळणारे सशक्त लेखन हवे आहे.
- लेखकांनी आपले लेखन डॉ. अनिल नितनवरे, 'जातक', २३/२४, स्नेहनगर, नागपूर मार्ग, भंडारा - ४४१ ९०४ या पत्त्यावर पाठवावे.

अनुक्रमणिका



मराठीचे प्रमाणभाषालेखन : माझी संकल्पना

■ दिवाकर मोहनी

मराठीची प्रमाणभाषा, बोलण्याची नव्हे तर लिहिण्याची कशी असावी तर तीमध्ये कोणताही विषय मांडता यावा. शास्त्र किंवा विज्ञान यांची सतत वाढ होत असते म्हणजे त्यांचा परिघ वाढत जातो. त्याचप्रमाणे त्या विषयांची खोली देखील वाढत जाते. असे सतत वाढत जाणारे विषय आमच्या भाषेला पेलता यावे आणि तीमध्ये केलेले लेखन निःसंदिग्ध आणि अल्पाक्षर असावे अशी गरज आहे. ही गरज असताना त्याचवेळी लेखननियमांच्या सुलभीकरणाची मागणी होत आहे. सुलभीकरणाची गरज आहे असे मानून मी लेखनाच्या विषयात प्रवेश केला. पण सुलभीकरणाची गरज नाही अशा निष्कर्षाला मी आलो.

येथे एक घटना सांगण्याचा मला मोह होतो. मी मुळात मुद्रक. निरनिराळ्या प्रकारची कामे माझ्या तरुणपणी मी करीत असे. मी आमच्या मुद्रकांच्या संघटनेतही भाग घेत असे. 'प्रिंटर्स गिल्ड'ने म्हणजे आमच्या संघटनेने एकदा मुद्रितशोधनाचा वर्ग चालवला. त्या वर्गावर डॉ. द. भि. कुळकर्णी, श्री. गोसावी आणि मी शिकवत असू. डॉ. द. भि. मराठीचे प्राध्यापक, श्री. गोसावी संस्कृतचे शिक्षक आणि मी मुद्रक. आम्ही त्या वर्गाला मुद्रितशोधन कसे करावयाचे ह्याचबरोबर मराठीचे प्रचलित लेखनही शिकवत असू. माझे तेथले शिकवणे माझ्या बरोबरीच्या मुद्रकांनी पाहिले आणि ते नियम शिकविण्यासाठी एक छोटे पुस्तक मी लिहावे असा आग्रह त्यांनी धरला. मी पुस्तक लिहायला बसलो. एक पानभर मजकूर लिहिला. तो लिहीत असताना माझ्या मनात विचार आला, की मी ज्याला 'शुद्ध' लेखन समजतो ते बरोबर की माझे ग्राहक जो निराळ्या प्रकारचा मजकूर लिहून आणतात ते बरोबर. ज्याअर्थी मी सोडून बाकी सगळे लोक निराळ्याच तऱ्हेने लिहितात, त्याअर्थी त्यांच्या लेखनामागेही काही विचार असला पाहिजे/असावा आणि तो मला समजून घेतला पाहिजे. माझे पुस्तक-लेखन तेथेच थांबून गेले. आजपर्यंत ते पूर्ण होऊ शकले नाही. लेखननियम कसे असावे याचे विचारमंथन मनात सुरू झाले. लेखन उच्चाराप्रमाणे असावे की नसावे ह्याविषयी मी काही एका निष्कर्षापर्यंत पोहोचलो तो आपल्यापुढे मांडत आहे. लेखन उच्चारानुसार नसावे अशाच ठाम निर्णयाला मी आलो आहे.

भाषण आणि वाचन ह्या दोन्ही क्रियांनी आपणाला काही कळते. भाषण कानांना ऐकू येते किंवा ते ऐकायचे असते. आणि लेखन डोळ्यांनी वाचायचे असते. दोन वेगवेगळ्या इंद्रियांचा उपयोग आपण करीत असतो.

आंधळे लोक कानांनी ऐकून आणि बोटांनी स्पर्श करून पुष्कळ गोष्टी शिकतात. डोळ्यांच्या वापराशिवाय त्यांना विषयाचे आकलन होऊ शकते. जन्मापासून बहिरे असलेले, कर्णेंद्रियांचा वापर अजिबात न करणारे लोक वाचायला शिकू शकतात आणि त्या वाचनातून

अनुक्रमणिका

ज्ञान मिळवू शकतात. याचा अर्थ असा की आपल्याला ज्ञान मिळविण्यासाठी कोणतेही एक इंद्रिय पुरेसे असते. आपण जसे ऐकतो तसेच लिहिले गेले पाहिजे असे काही नाही. कोणतीही परकी भाषा शिकायची झाली तर ती दोन प्रकारे शिकता येते. ऐकून किंवा वाचून. व्याकरणाची पुस्तके, शब्दकोश ह्यांच्या साहाय्याने तिचे उच्चार कसे होतात हे न समजता कोणतीही भाषा शिकणे सहज शक्य आहे असे माझ्या लक्षात आले. असे जर आहे तर उच्चाराप्रमाणे लिहिण्याची गरज नाही.

काही शतकांपूर्वी एक काळ असा होता की आपल्या देशात सुशिक्षितांची परस्पर-संपर्काची भाषा संस्कृत होती. बंगालमधले संस्कृत पंडित, केरळमधले आणि पंजाबमधले पंडित संस्कृत ग्रंथांमध्ये लिहिलेल्या शब्दांचा उच्चार आपापल्या पद्धतीने, त्यांच्या मुखाला असलेल्या सवयीप्रमाणे करीत. पण ते उच्चार लेखनात आणण्याचा प्रयत्न त्यांनी कधीच केला नाही. संस्कृतभाषेचे लेखन कधीच उच्चारानुसार झालेले नाही. प्रदेश जितका मोठा तितके उच्चारभेद असणारच.

लेखन उच्चार दाखविणारे कमी, तर अर्थ सांगणारे जास्त हवे हे केवळ संस्कृत भाषेतच नाही तर एका अत्यंत परक्या म्हणजे इंग्रजीसारख्या भाषेमध्येही आहे. एकाच उच्चाराच्या शब्दांचे स्पेलिंग निरनिराळे करून ते हे कार्य साधतात. (SON, SUN, WRITE, RIGHT, BLUE, BLEW वगैरे.)

भाषण आतापर्यंत आमोरासमोर होत असे म्हणजे एकाच प्रदेशात आणि काळात बोलणारा आणि ऐकणारा असे. त्यामुळे ऐकणाऱ्याला आपले शंकानिरसन तेथल्या तेथे करून घेता येत असे. लेखन मात्र दूरदूरच्या प्रदेशात जाते. इतकेच नव्हे तर लिहिणारा आणि वाचणारा यांच्या काळात काही शतकांचेही अंतर असू शकते. असे लेखन समजून घेताना त्या लेखनाचा उच्चार त्याकाळी आणि त्या प्रदेशात कसा होत असे यांच्याशी वाचकाला कसलेही कर्तव्य नसे. आपण वाचताना आपल्याला आलेल्या शंका लेखकाला विचारू शकूच असे नाही कारण आपण ज्यावेळी ग्रंथ वाचत असू त्यावेळी त्याचा लेखक हयात असेलच असे नाही.

मग एखाद्या शब्दाची शंका फेडायची कशी? अशावेळी शब्दकोशाचा आश्रय घ्यावा लागतो. क्वचित एखाद्या व्युत्पन्न पंडिताच्या लेखनात तो लेखनाच्या ओघात त्याच्या गरजेप्रमाणे घडवलेले नवीन शब्द वापरतो. त्यांचा अंतर्भाव शब्दकोशात असेलच असे नाही. अशा ठिकाणी शब्दकोश उपयोगी पडत नाही. तो शब्द व्याकरणशुद्ध असेल आणि वाचकालाही तेवढे व्याकरण येत असेल तर त्याला अशा नव्या शब्दापासूनसुद्धा अर्थबोध होतो. त्या नव्या शब्दाचा उच्चार कसा करायचा हे त्याला माहीत नसले तरी चालते.

लेखननियमांच्या सुलभीकरणाची मागणी करणाऱ्यांना तशी गरज का वाटत असावी असा विचार करीत असता मला एक गोष्ट जाणवली. त्यांना आपली भाषा संस्कृतपासून निघालेली आहे आणि जे संस्कृत चांगल्या प्रकारे शिकले आहेत त्यांनी ती सामान्यजनांवर लादली असे वाटत असावे. भाषा पूर्वी जास्त कठीण होती आणि कालमानाप्रमाणे ती सोपी होत चालली आहे आणि ती आणखी सोपी केली पाहिजे असा त्यांचा समज आहे असे सुद्धा मला जाणवले.

येथे मी एक विवाद्य विधान करतो, ते असे की मराठी किंवा तिच्यासारख्या अन्य भारतीय भाषा संस्कृतपासून निघालेल्या नाहीत. संस्कृत त्यांची जननी नाही. आपल्या आजच्या भाषा संस्कृतप्रभावित आहेत. संस्कृतोद्भव नाहीत असे माझे मत आहे. पण तो वेगळा विषय असल्याकारणाने त्याचा येथे विस्तार करीत नाही.

आपल्या भाषेच्या लेखननियमांचे सुलभीकरण करावे अशी मागणी करणाऱ्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की अशी मागणी केल्यामुळे त्यांच्या ठिकाणी आकलनशक्ती किंवा बुद्धिमत्ता कमी आहे असा समज पसरतो. वास्तव तसे नसल्यामुळे सुलभीकरणाची मागणी त्यांनी टाकून द्यावी अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे.


ज्याला शुद्धलेखनाचे जुने नियम म्हणतात त्या नियमांनुसार लिहिलेले वाचायला मला आवडते. याचे कारण असे की त्यातील प्रत्येक वाक्य मला एखाद्या गोफासारखे विणलेले दिसते. कोणत्याही नामाचे लिंग, वचन आणि विभक्ती सतत डोळ्यांसमोर असते. क्रियापदाच्या समोर असलेल्या रूपावरून काळ, कर्त्याचे लिंग, वचन आणि पुरुष ही सारी पुष्कळशा वेळी बरोबर समजतात. नाव (होडी) आणि नांव (नाम) ह्यांतला फरक डोळ्यांना दिसावा म्हणून नाम या अर्थाने जेव्हा तो शब्द लिहिला जातो तेव्हा त्यातल्या 'ना' वर अर्थभेददर्शक अनुच्चारित अनुस्वार पूर्वी देत असत, तो आता काढून टाकला आहे आणि आपणांस संदर्भावर

अवलंबून राहण्यास सांगितले आहे. येथे प्रश्न असा आहे की अर्थभेददर्शक अनुस्वार फक्त नाव किंवा तत्सम शब्दांवरच आहे काय? 'मला खाऊ दे' हे वाक्य पूर्वी दोन पद्धतीने लिहिले जात होते. 'मला खाऊ दे' आणि 'मला खाऊं दे' पहिल्या 'खाऊ'चा अर्थ मला खाण्याचा पदार्थ दे असा आहे आणि दुसऱ्या 'अनुच्चारित अनुस्वारयुक्त' 'खाऊ'चा अर्थ मला खाण्याची क्रिया करू दे असा होतो. खाऊ हे एका ठिकाणी नाम आहे तर दुसऱ्या ठिकाणी साहाय्यक क्रियापद आहे. येथे जो बिंदुचिन्हाचा वापर झाला आहे. त्यामुळे त्या शब्दाच्या नव्हे वाक्याच्या ठिकाणी निश्चितार्थ आला आहे. तेवढ्या एका टिंबाने पुष्कळ मोठा संदर्भ मनात निर्माण करण्याचे कार्य केले आहे. हेच वाक्य आपण सुटे वाचले आणि त्यातला अनुच्चारित अनुस्वार नको म्हणून तो दिला नाही तर खाऊ हे नाम की क्रियापद हे कळायला मार्ग नाही. हे वाक्य ज्यावेळेला उच्चारले जाते आणि ते कानांनी ऐकले जाते त्यावेळी संदर्भ तेथे उपस्थित असतो. हे वाक्य डोळ्यांनी वाचत असताना तेथे आविर्भाव नसतात. उच्चारात हेल नसतात आणि त्या वाक्याचा अर्थ स्वतंत्रपणे समजून घेण्याची सोय नसते. जुन्या पद्धतीच्या लेखननियमांत ती सोय होती.

फक्त नाम आणि क्रियापद यातला फरक दाखविण्यासाठीच टिंबाचा उपयोग होत होता काय? नाही. तो नामाची विभक्ती दाखविण्यासाठीही होत होता. 'मी गावाला गेलो' आणि 'मी पुस्तक वाचले.' ह्या दोन वाक्यातील पहिल्या 'मी'ची विभक्ती प्रथमा आहे आणि दुसऱ्या 'मी' ची विभक्ती तृतीया आहे. 'डोळ्यांनी बघतो ध्वनी परिसतो कानी पदी चालतो' या चरणाचा कर्ता 'मी' की 'तो' हे तेथे हा अनुच्चारित अनुस्वार काढून टाकल्यामुळे समजण्याचा मार्ग खुंटला आहे. बघतो, परिसतो, चालतो, चाखतो वगैरे क्रियापदे प्रथमपुरुषी आणि तृतीयपुरुषी कर्ता असताना त्यांचा उच्चार समान असला तरी प्रथमपुरुषी क्रियापदाच्या अंत्याक्षरावर टिंब असते. त्या एका टिंबामुळे वाक्याच्या कर्त्याचा पुरुष माहीत होतो. 'घोडे पळाले' येथे एक घोडे की पुष्कळ घोडे पळाले हे सांगण्यासाठीसुद्धा अनुच्चारित अनुस्वाराचा उपयोग होत होता. 'घोडें पळाले' येथे कर्ता नपुंसकलिंगी आहे आणि एकवचनी आहे हे त्या अनुस्वाराच्या योगाने स्पष्ट होते. असे प्रत्येक शब्दाच्या ठिकाणी निश्चितार्थ येण्यासाठी जुने शुद्धलेखन जास्त उपयुक्त आहे, अशा निष्कर्षाला मी आलो आहे. पूर्वीच्या हस्तलेखनात दोन शब्दांमध्ये अंतर ठेवण्याचा प्रघात नव्हता. त्यामुळे दिनचर्या आणि दीन चर्या अशांसारखे शब्द जोडून लिहिले जात होते. (ह्या दोन शब्दांतील अर्थभेद स्पष्ट करण्यासाठी उच्चाराचे ऱ्हस्व दीर्घत्व सांभाळण्याची गरज आहे.) भाषेमध्ये सतत नवनवीन शब्द येतात. त्यापैकी काहींचे उच्चार पूर्वीच्या एखाद्या शब्दासारखे असू शकतात. अशा दोन शब्दांमधील अर्थभेद स्पष्ट व्हावा यासाठी त्यातील स्वरांचे ऱ्हस्वदीर्घत्व बदलून अनुच्चारित अनुस्वाराचा उपयोग करून अर्थभेद दाखविण्याचे कार्य होऊ शकते. पुढे तीन शब्द मी लिहित आहे. कोणत्याही शब्दाचे अर्थनिश्चयन करण्यासाठी बिंदुचिन्हांचा उपयोग कसा होतो ते दाखविण्यासाठी आहेत. अंगकाठी, जरीकाठी आणि इंद्रायणीकाठी. पूर्वीच्या नियमानुसार ते अंगकाठी, जरीकांठी आणि इंद्रायणीकांठीं असे लिहिले जात असत. काठ हा शब्द किनारा या अर्थाने वापरला गेल्यास कां असा टिंब देण्याचा प्रघात होता आणि नदीकाठीमध्ये काठ या शब्दाची सप्तमी विभक्ती आहे हे त्या टिंबाने स्पष्ट होत होते.

नामांपासून अव्यये डोळ्यांना वेगळी ओळखता यावी ह्यासाठी अव्यये ऱ्हस्वान्त ठेवली जात असत. किंवा ऱ्हस्व करणे शक्य नसल्यास त्यावर अनुच्चारित अनुस्वार दिला जात असे. 'आणी' हे क्रियापद आणि 'आणि' हे अव्यय डोळ्यांना वेगळे दिसावे ह्यासाठी तसे लिहिले जात होते. 'यशाशक्ति'सारखी अव्यये आजही ऱ्हस्वान्त लिहिली जावीत, असा नियम आहे. पण अव्यये म्हणजे काय हे माहीत नसल्यामुळे आणि सगळेच शब्दांच्या अंती येणारे इकार, उकार दीर्घान्त लिहावे एवढाच नियम माहीत असल्यामुळे ते दीर्घान्त लिहिले जाऊ लागले आहेत. मुळे हे नाम आणि मुळें अव्यय, साठी, साठीं (नाम आणि अव्यय), तो जाता झाला. जाता जाता गाडीत त्याने पुस्तक वाचले. ह्या वाक्यातील पहिला जाता आणि पुढचे जातां जातां ह्यामधला अर्थभेद डोळ्यांना दाखविण्याची सोय आम्ही गमावली आहे आणि प्रत्येक ठिकाणी संदर्भ लक्षात ठेवण्याची गरज निर्माण केली आहे.

वाचताना संदर्भावर कमीतकमी अवलंबावे लागावे ह्यासाठी शब्दांच्या लेखनामध्ये फरक करण्याची पद्धत बहुतेक सगळ्याच भाषांमध्ये आहे. उर्दूमध्ये तीन भाषांचे मिश्रण आहे. अरबी, फारसी आणि हिंदी. तिचे लेखन पुष्कळसे फारसीप्रमाणे करण्याची पद्धत आहे.



परंतु तीमध्ये अरबी शब्द अरबीसारखेच लिहिले जातात. एकच किंवा जवळचे उच्चार दाखविणारी तीन-तीन व्यंजने आहेत. परंतु कधीही एका व्यंजनाची जागा ते दुसऱ्या व्यंजनाला घेऊ देत नाहीत. इंग्लिशमध्येही अर्थभेद दाखविण्यासाठी शब्दाच्या लिखित रूपाने निश्चित अर्थ दाखवावा, अशी सोय असल्याचे पूर्वी सांगितले आहे.

आणखी पुष्कळ उदाहरणे मला देता येतील. पद्यामध्ये वृत्ताच्या गरजेप्रमाणे काही ठिकाणी शब्दांच्या रूपात फरक घडवावा लागतो. करी या शब्दाचा अर्थ जसा करीत असे असा होतो तसाच तो कर असाही होतो. ह्या ठिकाणी दुसऱ्या करींचा वापर आज्ञार्थी केला आहे आणि त्यासाठी तेथे अनुच्चारित अनुस्वाराचा उपयोग केला आहे. 'जो-तो' ही सर्वनामे आहेत परंतु तेच दोन शब्द अव्यये म्हणूनही वापरली जातात. हा नियम एकदा माहीत झाला की ज्या ठिकाणी अनुस्वार असेल त्या ठिकाणी तो शब्द अव्यय म्हणून वापरला आहे अशी खात्री होते. प्रत्येक शब्दाच्या ठिकाणी निश्चितार्थ येतो. संदर्भ पाहण्याची किंवा लक्षात ठेवण्याची गरज कमी होते आणि मधले शब्द गाळून एका कटाक्षात पुष्कळ शब्द पाहून वाचन करणे म्हणजे द्रुतवाचन करणे शक्य होते. आपणां सर्वांनाच ह्यापुढे द्रुतवाचन करण्याची सवय लावावी लागणार आहे.

मुद्रणपूर्व काळात पद्य बाळबोधीत (देवनागरीत) आणि गद्य मोडीत लिहिले जात होते. पद्य अल्पाक्षर आणि छंदोबद्ध असल्याकारणाने त्यामध्ये अर्थबोधासाठी त्याचा अन्वय करण्याची गरज असते. त्याचप्रमाणे त्यामध्ये छंदाच्या गरजेसाठी ऱ्हस्व दीर्घाचे बंधन पाळणेही गरजेचे असते. अन्वय करणे सोपे जावे ह्यासाठी लिंग-वचन-विभक्तीच्या त्याचप्रमाणे काळाच्या आणि अर्थाच्या खुणा सगळ्या शब्दांना अंगावर वागवाव्या लागतात. इतकेच नव्हे तर काही शब्दांचे वा प्रकल्पांचे अध्याहरण करावे लागते. पद्यलेखनाच्या वरील गरजांसाठी घडलेले लेखनाचे नियम आपण नंतर गद्यातही वापरू लागलो. हे गद्य मुख्यतः मुद्रणासाठी लिहिले गेले. (आपसातला पत्रव्यवहार मोडीमध्ये चालू होता. मोडीमध्ये एकच वेलांटी आणि एकच उकार आहे आणि कोणत्याच उच्चारित अनुस्वाराचादेखील वापर होत नाही.)

हे सारे घडले ते मुद्रणाच्या गरजेमुळे पण त्याचवेळी मराठीचा इंग्रजीशी संपर्क वाढत चालला होता आणि आपल्या भाषेमध्ये तोवर कधीच न आलेल्या विषयांचा अंतर्भाव होऊ लागला होता. ह्या नवीन विषयांसाठी नवे पारिभाषिक शब्द घडविण्याची गरज होती आणि ते घडविण्यासाठी संस्कृत भाषेचा आश्रय करावा लागणे अपरिहार्य होते. हे पारिभाषिक शब्द पूर्णपणे नवीन असल्याकारणाने ते कोशगत झाले नव्हते. म्हणून त्या शब्दांचे आकलन होण्यासाठी संस्कृतच्या व्याकरणाच्या ज्ञानाची गरज होती. ते शब्द आपल्या भाषेत पुढे रुळल्यामुळे त्यांच्या ठिकाणी सातत्य हा गुण आला आणि त्या सातत्यामुळेसुद्धा त्यांच्यात निश्चितार्थता आली. भाषेला या शब्दांमुळे प्रौढत्व आणि सौष्ठव प्राप्त झाले. हे सारे शब्द संस्कृत भाषेच्या नियमांप्रमाणे घडविल्यामुळे ते कोणाच्याही उच्चाराप्रमाणे लिहिले गेले नाहीत. तर मुळाप्रमाणे (तत्सम) लिहिले गेले. ह्या नव्या, संस्कृतातून घेतलेल्या, शब्दांची संख्या जशी मराठीत वाढू लागली तशी मोडीलिपी त्यांच्या वापरासाठी अपुरी पडू लागली.

एखादा नवीन विषय भाषेमध्ये आणायचा हे मोठे अवघड काम आहे. त्या विषयाचे आकलन होण्यासाठी वाचकांच्या ठिकाणी कोणतेही संदर्भ असत नाहीत. कारण तो विषय त्यांच्यासाठी पूर्णतया नवीन असतो. तेवढ्याचसाठी प्रत्येक शब्दाने संदर्भावर अवलंबून न राहता नेमका अर्थ व्यक्त करावा अशी गरज असते. हे काम उच्चारानुसारी लेखनामुळे होऊ शकत

अनुक्रमणिका

नाही. कारण त्या शब्दांच्या योगे उच्चार व्यक्त करावयाचा नसतो तर वाचकाच्या मनामध्ये अर्थाचे संक्रमण करावयाचे असते. त्यासाठी ते व्याकरणशुद्ध असावे लागतात. एकदा हे शब्द भाषेत रूढ झाल्यानंतर ते वाचकांच्या डोळ्यांना परिचित झाले. इतकेच नव्हे तर त्या शब्दांपासून एकच अर्थ व्यक्त व्हावा ह्यासाठी त्यांच्या लेखनात सातत्य राखावे लागले. त्या शब्दांना कोशगत करावे लागले. त्यांच्या लेखनात सातत्य राखल्यामुळे एक आनुषंगिक गुण त्यांना प्राप्त झाला. ते ओझरते पाहून देखील त्यांचा अर्थ (नित्य परिचयामुळे) वाचकाला समजू लागला.

मराठीच्या बोलीभाषा ह्या घरांत, शेतात किंवा रणांगणावर वापरण्यासाठी घडलेल्या आहेत. रणांच्या गरजेसाठी घडवलेल्या भाषेत देश्य शब्दांच्या बरोबर काही परकीय म्हणजे फारसी, अरबी आणि पोर्तुगीज शब्दही आले. पण ज्यावेळी मराठी ही तीन क्षेत्रे सोडून विज्ञानाच्या वा तत्त्वज्ञानाच्या सभामंडपात शिरली त्यावेळी तिला संस्कृत भाषेचा आश्रय करावा लागला आणि तत्सम शब्दांचा तिच्यात भरणा झाला. आमची मराठी बोली पारिभाषिक शब्दांच्या बाबतीत पूर्णपणे परावलंबी आहे. ह्या परावलंबनामुळे बोलीभाषांची स्वतंत्रपणे होऊ शकणारी वाढ खुंटून गेली. न्यायालयात वापरण्यासाठी संविधानासारखे ग्रंथ रचण्यासाठी वा विश्वकोशातील नोंदी लिहिण्यासाठी जी भाषा वापरावी लागते, ती पूर्णपणे संस्कृतनिष्ठ असल्याकारणाने आमच्या बोलीपासून फार दुरावलेली आहे. परंतु नाइलाजास्तव तीच वापरणे भाग आहे.

अंदाजे गेल्या साठ वर्षांपासून मराठी भाषेच्या शिक्षणाकडे आपले दुर्लक्ष आहे. मला येथे मुद्दा मांडावासा वाटतो तो असा की आम्ही जसे बोलतो तसे लिहितो किंवा तसे लिहावयास पाहिजे ह्या आपल्या समजामुळे "मातृभाषा काय शिकवायची?" असे आम्हांस वाटू लागले. भाषेच्या शिक्षणाच्या नावाने आम्ही थोडे साहित्य शिकविले; परंतु भाषेचे व्याकरण व शब्दांची घडण ह्या दोन गोष्टी शिकविण्याकडे आम्ही पूर्ण दुर्लक्ष केले. कोणतीही भाषा फक्त साहित्य व त्यातही ललित साहित्य लिहिण्यासाठी वापरली जात नाही. तर तिच्यात जीवनावश्यक सगळेच विषय लिहिले-बोलले जातात. भाषा जर चांगली नसेल तर त्या विषयांच्या संकल्पना स्पष्ट होत नाहीत. वाढ खुंटते. गेल्या अनेक वर्षांत. साहित्याचा प्रांत सोडल्यास आपल्या भाषेतून नवीन विचार मांडले गेले नाहीत ते यामुळेच.

भाषा कानांसाठी आहे व लेखन डोळ्यांसाठी हे आपण पूर्वी पाहिलेले आहे. येथे सांगायचे ते असे की, वाचन श्रवणापेक्षा कठीण आहे, त्रासदायक आहे. तोंडाने आवाज करणे व तो कानांनी ऐकणे हे बहुतेक सगळे चार पायांचे प्राणीसुद्धा करतात. ही त्यांची क्षमता माणसांत आली आहे इतकेच नव्हे तर अन्य प्राण्यांपेक्षा निरनिराळ्या प्रकारचे आवाज काढणे त्याला शक्य झाले आहे. दृश्य संकेत हे अगदी अलीकडे म्हणजे पाच सहा हजार वर्षांपासून माणूस वापरू लागला आहे. हातांनी निरनिराळी चिन्हे काढून त्यांच्या योगाने अर्थबोध करून देणे हे मानवाच्या इतिहासात अगदी नवीन आहे. परंतु त्याचा वापर झपाट्याने वाढणार आहे. कानांनी ऐकताना अर्थबोध करून घेण्यासाठी पूर्ण वाक्य ऐकावे लागते आणि डोळ्यांनी वाचताना अक्षरन् अक्षर वाचण्याची गरज नसते हे आपणास ठाऊक आहे. कानांना Sequential Access (क्रमेण) असतो आणि डोळ्यांना Random Access (यादृच्छिक) असतो तेवढ्यामुळेच वाचन लवकर होते. मुद्रण सुरू झाल्यापासून माणसाला वाचनाची गती वाढविणे भाग पडले आहे, आणि शक्यही झाले आहे. सगळ्यांचीच वाचनाची गती दिवसेंदिवस वाढवावी लागणार आणि ते साध्य व्हावे म्हणून मुद्रणात एकसारखेपणा ठेवणे आवश्यक झाले आहे. मुद्रणात एकसारखेपणा असल्याशिवाय वाचनाची गती वाढू शकत नाही. एकसारखेपणा ठेवण्याच्या गरजेमुळेच शुद्धलेखनाचे नियम करावे लागतात आणि जुन्या-नव्या पुस्तकांमध्ये लेखनविषयक सातत्य राखावे लागते.

लेखननियम सुलभ करण्याचा हेतू, ते सर्वांच्या आटोक्यात यावेत हा असतो. सगळ्या लोकांची क्षमता सारखी नसते. त्यामुळे जे सगळ्यांना सहजपणे अमलात आणता येतील असे नियम अमलात आणणे इष्ट आहे असा समज आहे. पण तो चुकीचा आहे. कारण सध्या सुलभ केलेले नियमही फारच थोड्यांना वापरता येतात व सोपे करण्याच्या भानगडीत त्यात विसंगती आल्यामुळे ते कठीणही झाले आहेत.

येथे प्रश्न हा पडतो की, गणित हा विषयही सर्वांच्या आटोक्यातला नाही. पण म्हणून गणितातील नियम (सूत्रे) बदलायची का? की शिकविण्याच्या पद्धती बदलायच्या? बीजगणित आणि शून्यलब्धी हे विषय

पुष्कळांना जड जातात म्हणून ते कायमचे टाकायचे का?

शास्त्रीय संगीत गाता येणार नाही म्हणून ते शिकवायचेच नाही, सुगम संगीताच्या पलीकडे संगीत जाऊच द्यायचे नाही. संगीताचे शास्त्र कुणाला शिकवायचे नाही असे करायचे का? सगळेजण चांगले चित्रकार होऊ शकणार नाहीत. म्हणून चित्रकलेची मूलतत्त्वेच अभ्यासक्रमातून कायमची हटवायची का? मला वाटते असे करून चालणार नाही. असे केल्यास मानवाची वाढच खुंटेल. म्हणून आपण सगळ्यांना सगळ्या विषयांची मूलतत्त्वे शिकविल्यास काहींना तरी तो विषय पुढे नेता येईल. तसेच अशा थोड्यांना हुडकून काढून त्यांना त्या विषयातील उच्च शिक्षण देणे शक्य होईल. याबरोबरच प्रत्यक्ष गाता किंवा चित्र काढता किंवा शुद्ध लिहिता आले नाही तरी त्यांची त्या त्या विषयाच्या आकलनाची, आस्वादाची पातळी/क्षमता वाढेल.

जे चांगले लेखक होऊ शकतील अशांची संख्या हजारात पाच इतकी कमी असली तरी ह्या दहा कोटी लोकांच्या महाराष्ट्रात पाच लाख लोक हे भाषेवर पकड असलेले निर्माण होतील आणि जे व्याकरणशुद्ध भाषा वाचतील त्यांची वाचनाची गती वाढेल व अर्थबोध व संकल्पना स्पष्ट होतील. इतकेच नव्हे तर त्यांना शब्दाशब्दांतील सौंदर्यही कळू शकेल.

आज आपल्या भाषेतल्या लेखननियमांच्या बदलत्या स्वरूपामुळे परभाषी लोक मराठी भाषा शिकायला धजत नाहीत. त्याचप्रमाणे जुन्या शुद्धलेखनाचे नियम गेली साठ वर्षे शाळांमधून न शिकविल्यामुळे प्राचीन मराठी वाङ्मयाचा आस्वाद आज कोणालाच घेता येत नाही. व आमची साहित्याची उज्ज्वल परंपराच नष्टप्राय झाल्यामुळे एक मोठी सांस्कृतिक पोकळी निर्माण झालेली मला जाणवते, ती आपल्याला का जाणवत नाही? ही कोण आणि कशी भरून काढणार? चिपळूणकरांच्या पूर्वीचे सर्व गद्य व केशवसुतांच्या पूर्वीचे सर्व पद्य यथामूल म्हणजे जुन्या लेखननियमांप्रमाणेच लिहावे हा नवा नियम करून तर अधिकच गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे काही 'नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे' ह्यासारख्या म्हणी कशा लिहायच्या असा प्रश्न पडतो. त्या म्हणी चिपळूणकरपूर्वकालीन की उत्तरकालीन, हे कसे ठरवायचे? सोनारें ही सोनार या शब्दाची तृतीया विभक्ती आहे आणि व्याकरणाच्या नियमाप्रमाणे तृतीया विभक्तीच्या सर्व प्रत्ययांवर अनुच्चारित अनुस्वार देणे आवश्यक आहे. व्याकरण हे शास्त्र Positive Science आहे, ते Normative Science नाही, आपली भाषा पूर्वी कशी लिहिली गेली एवढेच व्याकरणशास्त्र सांगते. पुढे ती कशी लिहावी हे सांगण्याचा अधिकार व्याकरणाला नाही. लिहिलेल्या भाषेचे व्याकरण आणि बोलीभाषेचे व्याकरण ह्या दोन गोष्टी भिन्न आहेत. बोली प्रत्येक दहा कोसांवर बदलते, इतकेच नव्हे तर ती महाराष्ट्रात प्रत्येक जातीप्रमाणेही बदलते. त्यामुळे बोलीचे व्याकरण अशक्यप्राय आहे. व्याकरणामध्ये लिंग, वचन आणि विभक्ती इत्यादींचे विकार नामांना कसे होत आले आहेत त्यांचे वर्णन असते. बोलीत ठिकठिकाणी ते विकार बदलतात. त्यामुळे मराठीच्या बोलीभाषांचे एक व्याकरण होऊ शकत नाही. बोलीभाषेतले शब्द प्रमाणभाषेत घेण्यात कसलीच आडकाठी नाही. फक्त ते घेताना त्या त्या शब्दाचे लिंग ठरवून त्याची अनेकवचनी रूपं कशी होतील आणि सामान्य रूप कसे होईल ह्याचा निर्णय करणे आवश्यक असते. कोणत्याही भाषेमध्ये शब्दांची भर सतत पडावयासच पाहिजे आणि बोलीभाषेतून मोठ्या संख्येने ते घेतले जावेत.


प्रमाणभाषेचे नियम फक्त छापील मजकुराला लागतात. छापील म्हणजे सार्वजनिक मजकुराला लागतात. खाजगी मजकूर त्यांपासून मुक्त असतो. कोणताही मजकूर छापण्यापूर्वी तो जाणकारांनी पाहून छापण्यास द्यावयाचा असतो. पूर्वीचे प्रकाशक आणि मुद्रकसुद्धा हे काम नियमितपणे करीत होते. सगळा मजकूर नियमानुसार छापल्यामुळे वाचकांच्या वाचनाची गती वाढते आणि सगळ्यांनाच हे नियम शिकविल्यामुळे वाचकाचे आकलन आणि आस्वादन ह्यांची पातळी उंचावते.

प्रमाणभाषा ही सगळ्यांनाच परकीय भाषेसारखी शिकवायला पाहिजे कारण ती बोलीभाषेपासून अगदी वेगळी असते. ती उच्चारबोधक असण्यापेक्षा जास्त प्रमाणात अर्थबोधक असते. ती इतिहासाकडे वळलेली असते आणि ती कानांसाठी नसून डोळ्यांसाठी असते.

• • •

▪ **दिवाकर मोहनी**, श्री मोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर-४४००१०

अनुक्रमणिका



अभिजात मराठीचे वय किती?

▪ प्रा. हरी नरके

अभिजात म्हणजे उच्चकुलीन असा सर्वदूर समज असतो. संत ज्ञानेश्वर म्हणतात, ''तरि आतां पवित्र तयाचेंचि कुळा! अभिजात्य तेचि निर्मळा!'' इकडे अभिजात म्हणजे उच्च कुळातला हाच अर्थ अभिप्रेत आहे हे उघड आहे.

गेली सात-आठशे वर्षे हाच अर्थ आपल्याकडे कोरला गेलेला आहे. स्थिर झालेला आहे. १३ वर्षांपूर्वी जेव्हा सर्वप्रथम तमीळ भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला तेव्हा पुन्हा एकदा या शब्दाकडे लक्ष वेधले गेले. पुढे संस्कृत, तेलगु, कन्नड, मल्याळम आणि ओडिया यांनीही हा दर्जा मिळवला. मराठीलाही तो मिळावा असा विचार स्वाभाविकपणे सुरू झाला. हा दर्जा मिळण्याचे निकष काय आणि तो मिळाल्यास काय काय फायदे होतात? अशी विचारणा होऊ लागली.

अभिजात या शब्दाचा शब्दकोशातला अर्थ पाहिला तर काय आढळते?

दाते-कर्वे यांच्या महाराष्ट्र शब्दकोशात 'अभिजन' चा अर्थ उच्चकुलीन असा दिलेला आहे आणि 'अभिजात'चा अर्थ, कुलीन, सभ्य, थोर मनाचा, प्रतिष्ठित, उच्च दर्जाचा, सुसंस्कृत, विदग्ध वाङ्मय, उच्च दर्जाचे वाङ्मय, श्रेष्ठ प्रतीचे, पहिल्या प्रतीचे ग्रंथ-साहित्य असा दिलेला आहे. (महाराष्ट्र शब्दकोश, संपा. य. रा. दाते - चिं. ग. कर्वे, वरदा प्रकाशन, पुणे, १९८८, खंड-१, पृ. १०७)

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केलेल्या इंग्रजी-मराठी शब्दकोशात (क्लासिकल) अभिजातचा अर्थ ''प्राचीन ग्रीक आणि रोम यांच्या शैलीचा, पारंपरिक, विशेषतः १७५० ते १८०० या काळातले, शास्त्रीय, क्लासिकली- साधेपणामुळे आकर्षक अशा तऱ्हेचे'' असा दिलेला आहे. (संपा. रमेश धोंगडे, मुंबई, १९९७, पृ. १३२)

प्रा. एस. व्ही. सोहोनी, यांच्या 'ए न्यू डिक्शनरी ऑफ लिव्हिंग इंग्लिश'मध्ये त्यांनी हाच अर्थ, ''पहिल्या दर्जाचा, संगीतात क्लासिकल आणि वाङ्मयात क्लासिक शब्द लावतात. ग्रीक अगर रोम कलासंबंधीचा, क्लासिक-पहिल्या श्रेणीचा, उत्कृष्ट, श्रेष्ठ दर्जाच्या वाङ्मयासंबंधीचा, ग्रीक आणि रोमन वाङ्मयासंबंधीचा, दीर्घकाळ चालत आल्यामुळे अतिप्रसिद्ध'' असा दिला आहे. (संपा. एस. व्ही. सोहोनी, नितीन, पुणे, १९९०, पृ. ९४)

यावरून असे म्हणता येते की, सुरुवातीला, म्हणजे सुमारे २००० ते ५००० वर्षांपूर्वी 'उच्च कुलीन' या अर्थाने प्रचलित असलेल्या या शब्दाला पुढे प्रबोधनकाळात साधारणपणे अठराव्या शतकापासून 'श्रेष्ठ दर्जाचा' असा अर्थ येत गेला. आपल्याकडे मात्र कालपरवापर्यंत अगदी आजही जुनाच अर्थ प्रचलित असलेला दिसतो. आता मात्र आपण त्याचा प्रबोधनकालीन अर्थ प्रचलित करण्याची गरज आहे. काळाच्या ओघात आपण जर बदलणार नसू तर मग

अनुक्रमणिका

आपल्यासारखे करंटे आपणच.

केंद्र सरकारने कोणत्याही भाषेला हा दर्जा देण्यासाठी प्रामुख्याने श्रेष्ठता हाच निकष लावलेला आहे.

भाषेच्या अभिजातपणासंबंधीचे केंद्र सरकारचे एकुण ४ निकष आहेत. - भाषेत श्रेष्ठता, भाषेची दीड ते दोन हजार वर्षांची प्राचीनता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूपण, तसेच प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यांच्यात पडू शकणाऱ्या खंडासह असलेले नाते. या चारही मुद्यांच्या अनुषंगाने विचार करता मराठी भाषा ही अभिजात भाषा आहे असे निःस्संदिग्धपणे म्हणता येते.

आपल्याकडे बोलीभाषांना गावंढळ म्हणून हिणवल्याने मराठी भाषेचे फार मोठे नुकसान झालेले आहे. हा भाषक दहशतवाद मराठीचे कंबरडे मोडून तिला पंगू बनवित आहे.

कोणतीही भाषा अशुद्ध नसते. प्रमाणभाषा असावी की नाही, याबाबत भाषा अभ्यासकांमध्ये दुमत आहे. शिक्षणासाठी तिची गरज आहे असे मानणारेही अप्रमाणभाषा हलक्या किंवा अशुद्ध नसतात असे आग्रहपूर्वक सांगतात ते याचमुळे. मात्र, प्रमाणभाषा म्हणजे प्रतिष्ठित भाषा नव्हे. वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी या हलक्या असला भेदभाव करून आपण त्यांच्या लेखन आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर बंदी घालतो. हिणवल्यामुळे संबंधितांमध्ये अपराधीपणाची भावना निर्माण होऊन त्यांचे व्यक्त होणे थांबते. उच्चभ्रू आणि गावंढळपणाच्या नावाखाली चालू असलेल्या ह्या भाषक दहशतवादाने मराठी मरू घातली आहे. बोलीभाषेची विविधता हे मराठीचे खरे वैभव असून, त्याचा अभिमान बाळगला पाहिजे. त्याला प्रमाणभाषेचे लेबल लावून मिटवून टाकणे, हा वेडेपणा आहे. या भेदाचा दोष धुरीणांकडे जातो. त्यांनी आतातरी सुधारले पाहिजे. नाहीतर फार उशीर झालेला असेल. दलित साहित्यामुळे मराठीची पताका जगात फडकली. मराठीला सुमारे ५२ बोलीभाषा आहेत. जिला जास्त ओढे ती नदी मोठी, याच न्यायाने मराठीला रसद पुरवणाऱ्या या सर्व बोलींचा अभिमान बाळगला पाहिजे. या सर्वच बोलीभाषांतील साहित्य खूप सकस आहे. बहिणाबाई, व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके, भुजंग मेश्राम, सदानंद देशमुख, रंगनाथ पठारे, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, राम नगरकर, राजन गवस, मच्छिंद्र कांबळी, प्र. ई. सोनकांबळे, बा. भ. बोरकर, नामदेव ढसाळ या साऱ्यांमुळेच मराठी श्रीमंत झालेली आहे हे कसे विसरता येईल?

बोलीभाषा आणि उच्चार यांचा भौगोलिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाशी जैविक संबंध असतो. विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र इथले उच्चार वेगळे आहेत. ही विविधता अभिमानास्पद आहे. ती शेकडो प्रकारची आहे. उच्चारांवरून शुद्ध-अशुद्ध किंवा श्रेणी ठरवणे हा वेडेपणा आहे. स्वरयंत्र आणि उच्चार यांचा विचार केला तर प्रांतनिहाय स्वरयंत्र बदलते काय? अजिबात नाही. स्वरयंत्र तेच पण उच्चार मात्र बदलतात. उच्चारांमधला हा लहेजा, पोत, त्यातली अवीट गोडी ही आपली खरी संपत्ती आहे. समान गुणवत्तेची स्वरयंत्रे एका प्रांतातील सगळ्यांनाच मिळतात असे म्हणता येईल का? नाही. भीमसेन, लताबाई, आशाबाई, बालगंधर्व, कुमार गंधर्व, पृथ्वीराज कपूर, अमिताभ, रजनीश आणि कितीतरी, गळ्यांची उंची, माधुर्य, खोली, घनता, पदर सारे किती विलक्षण! यांचे प्रांत आणि त्यांच्या गळ्याची श्रेष्ठता यांचा काय संबंध लावणार?

अभिजातपणासंबंधी केंद्र सरकारच्या निकषातील साहित्याची आणि भाषेची श्रेष्ठता विचारात घेता, गाथा सप्तसती, हरिभद्राचे समरादित्याची कथा, उद्‌योतन-सुरीचे कुवलयमाला, चक्रधरांचे लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, एकनाथांची भारुडे, माझा प्रवास, धग, कोसला, बनगरवाडी, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, गोलपिठा, शांतता कोर्ट चालू आहे हे सारेच दस्तऐवज इतके चिरेबंदी आहेत, की मराठीची श्रेष्ठता स्वयंभू आहे. दुर्गा भागवतांनी राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना म्हटले आहे की, जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे.

मराठी संस्कृतोद्‌भव नाही. ती संस्कृतपेक्षा जुनी आहे. ती संस्कृतची मावशी आहे.

गाथा सप्तसतीतील मराठी, जे महाराष्ट्री प्राकृत या नावाने ओळखले गेले, हरिभद्र, भद्रबाहू, उद्‌योतन सुरी आदींचे लेखन आणि चक्रधर, ज्ञानेश्वर, चोखा, चोंभा, सावतामहाराज, नामदेव, संत बहिणाबाई, एकनाथ, बखरी, फुले-आंबेडकर, अण्णाभाऊ, लोकहितवादी, आगरकर, रानडे, टिळक, विष्णुभट गोडसे, लक्ष्मीबाई टिळक, साने गुरुजी, बेडेकर, भाऊ पाध्ये, नेमाडे,

ढसाळ, कोलटकर, चित्रे यांच्या साहित्याची महत्ता आणि त्यांचे 'जैविक नाते' स्वयंस्पष्ट आहे.


अभिजात मराठी भाषा म्हणजे श्रेष्ठ मराठी भाषा. ''इथे कुलेजातीवर्ण हे अवघेचि गा अकारण'' मराठी सर्व जातीचे लोक बोलतात. अनेक पंथ, धर्म, प्रांत, संस्कृती यांना मराठीने पोटात सामावून घेतलेले आहे. त्यामुळे खांद्यावर मायमराठीची पताका घेतलेल्या बारा कोटींची ती 'भाषांमाजी भाषा साजिरी आहे.' ती चोरांपासून जन्मलेली नाही. ती कष्टकऱ्यांची-ज्ञानवंतांची आहे. ही श्रमाची-घामाची, निर्मितीची भाषा आहे. मराठी ज्ञानभाषा आहे. धर्मभाषा आहे. अक्षर भाषा आहे. अजरामर भाषा आहे. जगातील सर्व भाषा मेल्या आणि अवघ्या दहा जगल्या तरी मराठी जगणार आहे हे लक्षात ठेवा. तेव्हा तिच्या मरणाची चर्चा करण्याऐवजी मी माझ्या मायबोली मराठीसाठी काय करू शकतो, याचा विचार करा आणि तसे वागा. मराठी श्रीमंत होईल.

माणूस हा विचारशील प्राणी आहे. प्रत्येक माणूस आपल्या भाषेतून विचार करतो, त्यामुळे मातृभाषा ही माणसाची अस्मिता आणि अस्तित्वखूण असते. माणसाने भाषेच्या माध्यमातूनच आजवर ज्ञाननिर्मिती केलीय. साहित्य, विचार, तत्त्वज्ञान यांच्याद्वारे संस्कृतीची जनुकं भाषेच्याच माध्यमातून एका पिढीकडून दुसरीकडे वाहून नेली जातात.

जगात आज हजारो भाषा आहेत. सुमारे सत्तर हजार वर्षांपूर्वी माणसाने पहिली भाषा जन्माला घातली. काळाच्या ओघात हजारो भाषा जन्माला आल्या. कोणतीही भाषा ही स्थिर नसते. ती सतत प्रवाही असते. बदलत असते. जिला भरपूर ओढे असतात ती नदी सर्वात मोठी बनते. मराठीला रसद पुरवणाऱ्या सुमारे ५२ बोली भाषा आहेत. अमृतातेही पैजा जिंकणारी मराठी ही जगातली दहाव्या क्रमांकाची भाषा आहे. ''ती संस्कृतोद्भव भाषा आहे आणि तिचे वय सुमारे आठशे वर्षे आहे,'' असे आम्हाला शिकवण्यात आलेले आहे. मराठीचे आद्यग्रंथ म्हणून आपण ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र आणि विवेकसिंधू यांचा उल्लेख करतो. पहिला शिलालेख म्हणून श्रवणबेळगोळ आणि अलिबागजवळील अक्षीच्या शिलालेखांचा उल्लेख केला जातो. ही माहिती आमच्या मनावर इतकी खोलवर कोरली गेलेली आहे की, यापेक्षा सत्य काही वेगळे असू शकेल हे मान्य करायला मराठी माणसाची तयारीच नसते. या जुन्या समजुती पुराव्यानिशी तपासून घेतल्या तर नव्या प्रकाशात उजेडात येणारे सत्य काही वेगळेच आढळेल. स्त्रिया वय चोरतात असा आक्षेप घेतला जातो. खरं तर वय चोरण्यात पुरुषही मागे नसतात, अगदी देशाचे सरसेनापतीही यात आघाडीवर असतात हे आपल्याला माहीत आहे. मराठी ही मायबोली असल्याने की काय पण तिचे वय चोरले गेले आहे एवढे निश्चित आहे. साधा प्रश्न असा आहे की कोणतीही भाषा बालवयातच ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र आणि विवेकसिंधू यांसारखे जागतिक दर्जाचे ग्रंथ कसे प्रसवू शकेल? आठशे वर्षांपूर्वी मराठीत हे ग्रंथ लिहिले गेले तेव्हा मराठी बोलभाषा नव्हती. तर ती एक परिपक्व झालेली समृद्ध भाषा होती. ज्ञाननिर्मिती, साहित्य, विचार, तत्त्वज्ञान आणि संस्कृतीची त्याआधीची फार मोठी परंपरा मराठीला होती. मग मराठीतला आद्यग्रंथ कोणता? आणि मराठीचं नेमकं वय किती? मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ आहे, 'गाहा सत्तसई' (गाथा सप्तसती). गाथा म्हणजे कविता. सातशे लोककवितांचा संग्रह म्हणजे हा ग्रंथ होय. पैठणच्या हाल या सातवाहन राजाने सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी पन्नास कवींच्या या कविता संकलित केल्या. सातवाहनांची राजभाषा मराठी असल्याने त्यांचे जिथे जिथे राज्य होते, तिथे तिथे या ग्रंथाची हस्तलिखिते मिळालेली आहेत. सातवाहनांचे संपूर्ण भारतावर तर राज्य होतेच, परंतु पार अफगाणिस्तानपर्यंत राजभाषा मराठीची पताका फडकत होती. हा ग्रंथ 'महाराष्ट्री प्राकृत' या भाषेत असल्याचे आजवर सांगण्यात आले आहे. ३१ मार्च १९५६ रोजी थोर संशोधक श्री. स. आ. जोगळेकर यांनी तो ग्रंथ पहिल्यांदा सोप्या आणि ताज्या मराठीत प्रकाशित केला. त्याला त्यांनी तब्बल ४६४ पानांची प्रस्तावना लिहिलेली आहे. गाथा सप्तशतीचे १९७३ पासून अनेक इंग्रजी अनुवादही प्रकाशित करण्यात आलेले आहेत, गोदावरी नदीच्या काठावरील लोकजीवनाचे शृंगारिक तसेच करुण, दारुण व हृद्यरूप या ग्रंथात चित्रित करण्यात आलेले आहे. मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारा हा श्रेष्ठ मराठी ग्रंथ आहे. रावसाहेब मंडलिक, राजारामशास्त्री भागवत, श्री. व्यं. केतकर आदींनी गेल्या शतकातच या ग्रंथाकडे आपले लक्ष वेधले होते. राजा बढे यांचा या ग्रंथाचा 'शेफालिका' या नावाचा सुंदर पद्यानुवादही प्रसिद्ध आहे.

मुळात महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश आणि

मराठी या तीन वेगळ्या भाषा असल्याचे आपल्या मनावर बिंबविण्यात आले आहे. खरंतर या तीन वेगळ्या भाषा नाहीतच. ही एकाच भाषेची तीन वेगवेगळी नावं आहेत. हे सत्य सर्वप्रथम उजेडात आणणारे लेखक होते, श्री. ल. रा. पांगारकर. त्यांनी हे १९३२ सालीच दाखवून दिलेले आहे. मराठीची ही तीन नावं मराठीच्या आद्यकाळ, मध्यकाळ आणि अर्वाचीन काळात प्रचलित होती. वेगवेगळ्या काळात रूढ असलेली मराठीची ही नावं पुढे 'देशी' भाषा आणि 'नागर' भाषा म्हणूनही वापरात असल्याचे दिसते. प्राकृत हा शब्द मूळ ''पाअड'' या शब्दापासून बनलेला आहे. आंबा पाडाला आला असे आजही आपण म्हणतो. म्हणजे 'आंबापण' दिसायला लागले. मराठी ही वाहत्या पाण्यासारखी, प्रवाही भाषा होती, आहे, राहील. जुन्या काळात धर्मग्रंथाची भाषा होती संस्कृत. पण तिचा जन्म झाला वैदिक भाषेपासून आणि वैदिकची आई होती वैदिकपूर्व बोली भाषा. हार्वर्ड विद्यापीठाचे डॉ. मायकेल विट्झेल यांनी आपल्या 'ट्रेसिंग दि वैदिक डायलेक्ट्स' या ग्रंथात हे दाखवून दिले आहे. तेव्हा संस्कृत ही मूळ भाषा होती ही माहिती बरोबर नाही. पाणिनीने जेव्हा या भाषेचे व्याकरण लिहिले तेव्हा तो तिला 'छंद' भाषा म्हणतो. महाराष्ट्री प्राकृत किंवा महारठ्ठी या नावाने दोन-अडीच हजार वर्षांपूर्वी प्रचलित, लोकप्रिय व मान्यताप्राप्त असलेली भाषा ही संस्कृतपेक्षाही जुनी असल्याचे महामहोपाध्याय राजारामशास्त्री भागवत (विदुषी दुर्गा भागवत यांचे आजोबा) यांनी १८८५ सालीच दाखवून दिले होते. त्यांचा 'मराठ्यासंबंधी चार उद्‌गार' हा ग्रंथ जिज्ञासूंनी अवश्य वाचावा. त्यांचा 'मराठीची विचिकित्सा' हाही ग्रंथ महत्त्वाचा आहे. १९२७ साली ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास दोन खंडात लिहिला. त्यात त्यांनी मराठीचे वय किमान अडीच हजार वर्षे असल्याचे पुराव्यानिशी दाखवून दिले आहे. डॉ. कृ. पां. कुलकर्णी यांनीही 'मराठीची उत्पत्ती' सांगताना 'मराठी भाषा उद्‌गम आणि विकास' मध्ये तिचे वय किमान दीड



हजार वर्षे नमूद केले आहे. 'ॲन ओल्ड मराठी डिक्शनरी' मध्ये डॉ. शं. गो. तुळपुळे आणि डॉ. ॲन फेल्डहाऊस यांनी तसेच डॉ. वि. भि. कोलते यांनी मराठीचे व अपभ्रंशचे नाते सांगताना महाराष्ट्री-अपभ्रंश आणि आजची मराठी यांचे जैविक नाते स्पष्ट केलेले आहे. मनातील दूषित पूर्वग्रह बाजूला ठेवून वरील पुरावे पाहिले म्हणजे मराठीचे वय आठशे वर्षे नव्हे हे कोणालाही पटेल.

''एक होता कावळा नि एक होती चिमणी...'' ही प्रत्येक मराठी घरात आजही सांगितली जाणारी गोष्ट आहे. ती पहिल्यांदा ग्रंथात लिहिली गेली ८०० वर्षांपूर्वी. लीळाचरित्रात धानाई नावाच्या हट्टी मुलीला श्री चक्रधरांनी ती सांगितली असली तरी ती त्याआधी हजारबाराशे वर्षे मराठी लोकजीवनात सांगितली जात होती. ती विलक्षण लोकप्रिय होती.

तमिळ भाषेला अभिजात दर्जा मिळण्यात 'संगम साहित्याचा' मोठा वाटा आहे. हे साहित्य २३०० वर्षे जुने आहे. गोदावरी नदीवर धरण बांधले जात असल्याचा प्रसंग त्यात आला आहे. या धरणाच्या कामासाठी जगभरातून तज्ज्ञ मागवण्यात आलेले होते. महाराष्ट्रातील मराठी गवंडी मोठे कुशल असल्याचे वर्णन त्यात आले आहे.

'सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप' या ग्रंथात महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांनी नाणेघाटातील एका शिलालेखाचे वाचन दिलेले आहे. हा शिलालेख सुमारे २२२० वर्षांपुर्वीचा आहे. शिवनेरी किल्ल्यापासून सुमारे ४७ किलोमीटरवर सह्याद्रीच्या कुशीत एका सुंदर लेण्यात हा शिलालेख आहे. तो ब्राह्मी लिपीत आहे. ३० फूट लांबी आणि १० फूट रुंदीच्या या शिलालेखात 'महारठीनो' असा मराठी बोलणाऱ्या लोकांचा उल्लेख आढळतो. अलीकडेच इतिहासकार डॉ. शोभना गोखले यांनी या शिलालेखावर नव्याने संधोधन करून त्याचे वय दोन हजार वर्षांपेक्षा अधिक असल्याचे प्रमाणित केलेले आहे.

'विनयपिटक' हा पाली भाषेतील पवित्र धर्मग्रंथ आहे. तो बिहारमध्ये राजगृहला सव्वादोन हजार वर्षांपूर्वी

अनुक्रमणिका

लिहिला गेला. त्यात 'महाराष्ट्र'चा उल्लेख आलेला आहे. श्रीलंकेतील 'दीपवंश' आणि 'महावंश' या सिंहली लिपीतील दीडहजार वर्षांहून जुन्या ग्रंथांमध्ये तो मिळतो.

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात वररूचीने 'प्राकृतप्रकाश' हा व्याकरण ग्रंथ लिहिला. त्यात त्याने शौरसेनी, मागधी, पैशाची व महाराष्ट्री या प्राकृत भाषांचे व्याकरण सिद्ध केले. आधीचे सगळे नियम सांगून झाल्यानंतर शेवटचा नियम सांगताना तो म्हणतो, ''शेषं महाराष्ट्रीवत.'' यावरून देशाच्या वेगवेगळ्या भागांत प्रचलित असलेल्या सगळ्या भाषांना मराठीचे नियम लागू पडत होते. यातून मराठीची प्रतिष्ठा, मान्यता आणि श्रेष्ठता स्पष्ट होत नाही काय? संस्कृत महाकवी कालिदास आणि शूद्रक यांनी आपल्या 'शांकुतल' आणि 'मृच्छकटिकम्' या नाटकांमध्ये मराठीचा अनेक संवादांसाठी वापर केलेला आहे. महाभारत या जगप्रसिद्ध महाकाव्यात अनेक मराठी शब्द आलेले आहेत. यज्ञाच्या वेळी पंडितांना मराठीत बोलायला बंदी घालण्यात आल्याची नोंद रा. रा. भागवत यांनी दाखवून दिलेली आहे. संस्कृत ही धर्मभाषा असली तरी हे पंडित खाजगीत मराठीत बोलत असत हे यातून उघड होते. संत एकनाथांनी ''संस्कृत वाणी देवे केली मग प्राकृत काय चोरापासोनी झाली?'' असे संतप्त उद्गार काढले होते. 'विंचू चावला...' ही एकनाथांच्या भारुडांची मराठी आजची अस्सल मराठी असूनही ते तिला प्राकृत म्हणतात कारण महाराष्ट्री प्राकृत हीच मराठी आहे. रघुनाथराव गोडबोले यांनी १८६३ साली प्रकाशित केलेल्या मराठी शब्दकोशाला 'महाराष्ट्रीय भाषेचा' कोश म्हटले आहे, ते यामुळेच. आपल्या वाशीमचा (वस्तगुल्म) महाकवी गुणाढ्य याने पैशाची भाषेत 'बृहत्कथा' हे महाकाव्य लिहिले. दोन हजार वर्षांपूर्वी तो जेव्हा जम्मू-काश्मीरच्या राजाच्या पदरी होता तेव्हा त्याने ते रचले. जगातले हे तिसऱ्या क्रमांकाचे श्रेष्ठ महाकाव्य मानले जाते. या ग्रंथाचा अकराव्या शतकात सोमदेवाने संस्कृतमध्ये अनुवाद केला. त्याने गुणाढ्य आणि बृहत्कथेची माहिती सुरवातीलाच दिलेली आहे. आज मूळ पैशाचीतील ग्रंथ उपलब्ध नाही. संस्कृत अनुवाद तेवढा आहे. सोमदेवाने प्रामाणिकपणे गुणाढ्याची माहिती दिली नसती तर आज हा ग्रंथ संस्कृतच मानला गेला असता. जगात धनाढ्य अनेकांकडे असतील पण गुणाढ्य फक्त मराठीकडे आहे.

मराठी ही संस्कृतोद्भव नसून ती संस्कृतची मावशी आहे. 'माय मरो नि मावशी जगो' अशी आपल्या मराठीत म्हण आहे. मराठीची आई एक वैदिकपूर्व बोली होती आणि संस्कृतची आजीही दुसरी एक वैदिकपूर्व बोली होती हे लक्षात घेता, त्यांचे नाते आईमुलीचे नाही हे उघड आहे. संस्कृतचे दस्तऐवज जपले गेले, मराठीचे काळाच्या ओघात लुप्त झाले आणि संस्कृतप्रेमींनी आपले वर्चस्व प्रचारित आणि प्रसारित केले. मराठीवर संस्कृतचा जरूर प्रभाव आहे. मात्र मराठीने संस्कृतकडून जेवढे घेतले, त्याच्या दामदुप्पट परतही केले. मराठीवर इतर प्राकृत भाषा, सगळ्या द्रविडी भाषा आणि पर्शियन यांचाही प्रभाव आहे. पण मराठीचे स्वतःचे जे अस्सल आहे, ते जगातल्या इतर भाषेत नाही. जगातल्या अनेक भाषांमध्ये राष्ट्रगीते आहेत. विश्वगीत (पसायदान) मात्र एकट्या मराठीकडे आहे.


उद्योतन सुरीने इ.स. ७७८ मध्ये कुवलयमालेत मराठी माणूस लढवय्या, काटक, शूर, काळासावळा, धट्टाकट्टा आणि भांडकुदळ असल्याचे नमूद केलेले आहे. आठव्या शतकातील हरिभद्राचे 'समरादित्याची कथा' हे मराठी अभिजात महाकाव्य असल्याचे डॉ. ए. एम. घाटगे यांनी प्राकृत शब्दकोशात दाखवून दिले आहे.

हाल, पादलिप्त, हरिभद्र, उद्योतन सुरी, नामदेव, ज्ञानेश्वर, चक्रधर, तुकाराम, एकनाथ, फादर स्टीफन, फुले, आंबेडकर, रानडे, लोकहितवादी, टिळक, आगरकर, अण्णाभाऊ, साने गुरुजी, राजवाडे, केतकर, भागवत, पांगारकर, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, कुरुंदकर, सुर्वे, ढसाळ, नेमाडे, जीए, लक्ष्मीबाई टिळक, सावित्रीबाई, ताराबाई, इरावतीबाई, मालतीबाई, गडकरी, पाध्ये, सावंत, पु.लं., अत्रे, बागूल, तेंडुलकर, विंदा, कुसुमाग्रज, खांडेकर, बेडेकर, माडगूळकर, कोलटकर, चित्रे, एलकुंचवार यांच्या अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या मराठीचे वय किमान अडीच हजार वर्षे-असल्याचे अनेक हस्तलिखित पोथ्यांचे, शिलालेख-ताम्रपटांचे पुरावे उपलब्ध आहेत. आता तरी तिचे वय चोरू नका. मराठीतच बोला, लिहा, वाचा, जगा आणि जगवा.

• • •

▪ **प्रा. हरी नरके,** बी/१२, तेजलकुंज, करिष्मा इमारतीसमोर, कर्वे रोड, कोथरुड, पुणे - ४११०३८

अनुक्रमणिका



मराठी भाषा : शैक्षणिक वास्तव आणि उपयोजन

■ डॉ. नीलिमा गुंडी

अनेक शैक्षणिक आयोग आणि भाषातज्ज्ञ यांनी प्रादेशिक भाषांमधून शिक्षण द्यायची गरज प्रतिपादन केली आहे. तरीही महाराष्ट्रात मराठी भाषेच्या शिक्षणाची स्थिती दयनीय आहे. जागतिकीकरणानंतर व्यवसायानिमित्त स्थलांतरणाच्या वाढलेल्या शक्यता, 'ग्लोबल' वास्तवाचे वाढते आकर्षण आणि त्यामुळे इंग्रजी तसेच अन्य परकीय भाषांचे शैक्षणिक क्षेत्रातले वाढते स्तोम, अशा परिस्थितिजन्य कारणांचा दबाव या वस्तुस्थितीमागे आहे. यंदा पुणे शहर व जिल्हा परिसरात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५% प्रवेशासाठी पालकांनी मराठी माध्यमाच्या शाळांचा पर्याय निवडला नसल्याचे वृत्त याच वास्तवाचे दर्शन घडवते - (पाहा : वृत्त - 'लोकमत', पुणे, १० सप्टेंबर २०१६) समाज आणि शासन हे दोन्ही घटक या वास्तवाला जबाबदार आहेत.

मराठीची शैक्षणिक स्थिती : काही निरीक्षणे

महाराष्ट्रात शालेय शिक्षणाचे माध्यम या पातळीवरून मराठीचे अढळपद कधीच इतिहासजमा झाले आहे. मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना मान्यता देण्याबाबतही सरकारी धोरण फारसे अनुकूल दिसत नाही. विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सीबीएसईसारखी केंद्रीय मंडळे आणि आयसीएसईसारखी खाजगी मंडळे यांच्या शाळांची संख्या वाढते आहे. त्यामुळे दहावीपर्यंत मराठी अनिवार्य असल्याची वस्तुस्थिती फक्त राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांपुरतीच टिकून आहे. तेथेही इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी 'द्वितीय भाषा' या स्तरावर अस्तित्वात आहे. सीबीएसईच्या शाळांमध्ये पाचवीपर्यंतच मराठी आणि तीही 'तृतीय भाषा' या स्तरावर अस्तित्वात आहे. पहिलीपासून इंग्रजी सुरू झाले, पण 'पहिलीपासून मराठी' हे धोरण विनाअपवाद राबवले जात नाही. पहिली-दुसरीसाठी कधी पाठ्यपुस्तकांची सोय नसणे, पहिली ते चौथीच्या मराठी विषयाचे औपचारिक मूल्यमापन होत नसणे, अर्हताप्राप्त शिक्षक उपलब्ध नसणे आदी कारणांमुळे मुलांची प्राथमिक स्तरावर मराठीशी गट्टी होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार करण्यात शाळा कमी पडतात.

वास्तविक मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असल्यामुळे आपली परिसरभाषाही आहे. येथील अनेकांची ती मातृभाषा आहेच. खरे तर सीबीएसईसारख्या शाळांमध्ये ५० ते ७०% स्थानिक मुले असतात. तरीही त्यांना मराठी 'तृतीय भाषा' या स्तरावर शिकवण्याची सोय (की गैरसोय?) असणे आणि मराठीला शालेय स्तरावर परकीय भाषांचा पर्याय उपलब्ध असणे, हे वास्तव धक्कादायक आहे. मराठीचा द्वितीय भाषा व तृतीय भाषा या स्तरावरील अभ्यासक्रम

मुलांमधील भाषिक क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने अपुरा पडतो. भाषेचा अंतर्नाद ऐकण्यासाठी कान तयार करण्याच्या बाबतीत त्याला मर्यादा पडतात. येथे एनसीईआरटीतर्फे नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क (NCF) अंतर्गत केलेल्या अभ्यासातून समोर आलेली एक बाब लक्षात आणून द्यावीशी वाटते. ती म्हणजे पश्चिम बंगाल सरकार हे प्रादेशिक भाषेला महत्त्व देण्यासाठी 'अपर प्रायमरी लेव्हल'वर बंगाली भाषेची २०० गुणांची परीक्षा घेते. अशी परीक्षा घेणारे ते एकमेव राज्य आहे. (Times of India, ११ सप्टेंबर २०१६) बालवयात आपली परिसरभाषा शिकण्याचे महत्त्व त्यांनी जाणले आहे. आपण त्यांच्यापासून काही बोध घेणे गरजेचे आहे.

एकंदरीत बालवयात मराठी भाषेत न्हाऊन निघण्याचा रोमांचक अनुभव आपल्याकडील अनेक मुलांना घेता येत नाही. बालवयात भाषा मनात मुरण्यासाठी तशी संधी मिळणे खरे तर आवश्यक असते, पण बहुसंख्य मुले या अनुभवापासून वंचित राहतात. काही शाळांमध्ये तर मुलांना घरीही मराठीतून बोलणे टाळायला सांगितलेले असते. याचा परिणाम म्हणजे पुढील काळात ती मुले मराठी विश्वापासूनच लांब राहू लागतात! डॉ. राजेंद्र थोरात यांनी गेल्या पाच वर्षांतील मराठीची स्थिती जाणून घेण्याकरिता राज्यभरातील विविध महाविद्यालयांच्या मराठी विभागांतून माहिती संकलित केली आहे. कोकणासह विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश या सगळ्या भागांमध्ये युवा पिढी मराठीपासून दूर होत असल्याचे चित्र त्यांनी अहवालात मांडले आहे. दरवर्षी मराठीला ७ ते १४% इतक्या मोठ्या प्रमाणात गळती लागली असल्याचे चित्र त्यांच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. (पाहा : 'लोकमत', पुणे, १० ऑगस्ट २०१६).

येथे हे लक्षात घ्यायला पाहिजे की मराठी भाषा ही मातृभाषा/परिसरभाषा या स्तरावरच्या तिच्या न्याय्य हक्काला वंचित राहत आहे. मातृभाषा ही व्यक्तिगत पातळीवर भाव व संवेदन टिपणारी व त्याद्वारे व्यक्तीच्या भावजीवनाचे अस्तर बनणारी असते. व्यक्तीच्या आंतरिक विश्वाला बळ देणे आणि संवेदनाद्वारे बाह्य विश्वाशी दृढ बंध निर्माण करणे हेही तिच्यामुळे घडत असते. मराठी ही एक आधुनिक भारतीय भाषा आहे. त्यामुळे सामाजिक-सांस्कृतिक पातळीवर स्वतःला जगाशी जोडून घेण्याची प्रक्रिया तिच्यामुळे सहजपणे होत असते. परकीय भाषेतील कोरडे शब्दज्ञान आणि स्वभाषेमध्ये संवेदनाद्वारे सहज रुजणारे संकल्पनाविश्व तसेच त्यातून उमलणारे भावविश्व यांची तुलनाच होऊ शकत नाही! भाषा म्हणजे केवळ एक 'विषय' नसून विविध ज्ञानविषय आत्मसात करणारी केंद्रीभूत व्यवस्था आहे, याची आपण आठवण ठेवायला हवी. "This is to say that the place of language in education is necessarily central" अशा शब्दांत शिक्षणतज्ज्ञांनी तिचे महत्त्व सांगितले आहे. शिक्षणव्यवस्थेत म्हणूनच भाषेकडे केवळ एक विषय म्हणून न पाहता व्यक्तिसापेक्ष पातळीवरील मानसिक जडणघडणीतील तिच्या सहभागाचाही विचार केला पाहिजे. समाजाची आंतरिक वीण ही त्या त्या समाजाच्या प्रादेशिक धाग्यांनी होत असते; याचा विसर पडला तर उद्याच्या श्रीकृष्णाला उद्याच्या सुदाम्याची व्यथा न कळण्याचा धोका संभवतो! प्रादेशिक भाषांचे सामाजिक अभिसरण व त्याद्वारे राष्ट्रीय एकात्मता यांच्या बाबतीतले हे महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेणे आवश्यक आहे.

येथे एक दिलासादायक ताजी माहिती नोंदवायला हवी ती अशी : राज्य शिक्षण विभागाने गेल्या वर्षीपासून 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियान' सुरू केले आहे. या अभियानांतर्गत राज्यात डिजिटल शाळा, इंग्लिश स्पीकिंग आणि विविध उपक्रम राबवण्यात आले. त्यामुळे ३५% मराठी शाळांचा दर्जा सुधारला असून इंग्रजी शाळांमधील सुमारे दहा हजार विद्यार्थी मराठी शाळांमध्ये परत आले आहेत. राज्याचे शिक्षण आयुक्त धीरजकुमार यांनी नागपूरला नुकत्याच झालेल्या शिक्षक परिषदेच्या निमित्ताने ही माहिती दिल्याचे वृत्त आहे. ('सकाळ', पुणे, ११ सप्टें. २०१६).

मराठीच्या उपयोजनाची क्षेत्रे :

'उपयोजन' म्हटले की साधारणतः उपयोजित मराठीचा काही गुणांचा अभ्यासक्रम तयार करण्याकडे आपला कल असतो. वास्तविक मराठीच्या उपयोजनाची क्षेत्रे शोधताना समाजाच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन मराठीचे वेगवेगळ्या पातळ्यांवरील नवे अभ्यासक्रम तयार करणे गरजेचे आहे.

येथे सुरुवातीलाच एक चांगली बाब नोंदवायला हवी ती म्हणजे उच्च माध्यमिक स्तरावर मराठी (साहित्य) हा नवा अभ्यासक्रम गेली काही वर्षे सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाची पालक व विद्यार्थ्यांप्रत माहिती पोहोचवणे, तसेच या

अभ्यासक्रमाची कार्यवाही अधिकाधिक महाविद्यालयांमध्ये सुरू होणे याकडे लक्ष दिले पाहिजे.

मी येथे काही नवे अभ्यासक्रम सुचवत असून त्यांच्या परिपूर्तीसाठी शैक्षणिक धोरणात आवश्यक तेथे बदल करावे लागतील

'मराठी' (भाषा) : स्वतंत्र विभागाची गरज

विद्यापीठ स्तरावर 'मराठी' (साहित्य) हा एकच विभाग असतो. त्याच्या जोडीला प्रत्येक विद्यापीठात 'मराठी' (भाषा) असा स्वतंत्र विभाग कार्यरत असणे नितांत गरजेचे आहे. या विभागातर्फे अनेकविध भाषालक्षी अभ्यासक्रमांचे नियोजन करता येईल. ते असे :

- विविध विद्याशाखांसाठीच्या भाषालक्षी अभ्यासक्रमात उपयोजित मराठीबरोबरच भाषेविषयी कुतूहल निर्माण करणारा व त्या त्या विद्याशाखेच्या सामाजिक बाजू लक्षात घेणारा अभ्यासक्रम असावा.
- तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मराठीचा प्रसार (उदा. विविध ॲप्स, इ-बुक यांच्या निर्मितीला चालना) करणारा अभ्यासक्रम.
- अनुवादविषयक अभ्यासक्रम
- विविध भाषिक कौशल्यांसाठीचे पदविका पातळीवरील अभ्यासक्रम.
- सार्वजनिक भाषाव्यवहारविषयक अल्प मुदतीचे अभ्याक्रम
- अमराठी/परभाषक यांच्यासाठी मराठीचा 'बेसिक' अभ्यासक्रम.
- परदेशस्थ मराठी बांधवांसाठीचे विविध अभ्यासक्रम.
- अमराठी विद्यार्थ्यांसाठी भाषा-प्रशिक्षक तयार करणारे अभ्यासक्रम.
- तंत्रज्ञानाच्या मदतीने निरक्षरांना साक्षर करणारे अभ्यासक्रम.
- कोशनिर्मितीविषयक मार्गदर्शनपर अभ्यासक्रम.

ही यादी उदाहरणादाखल आहे. त्यात सतत भर पडू शकते. राज्य मराठी विकास संस्थेचे प्रभारी संचालक डॉ. आनंद काटीकर यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे की महसूल खात्याकडे ५ कोटी मोडी हस्तलिखिते पडून आहेत. पण एखादे विद्यापीठ वगळता मोडी लिपीचा अभ्यास हा विषय आपल्याकडील अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट नाही. हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला तर राज्य मराठी विकास संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना आर्थिक उत्पन्नाची संधी उपलब्ध करून देता येतील. (पाहा : 'लोकमत', पुणे, २१ ऑगस्ट २०१६).

मराठी भाषा-संशोधनाच्या संदर्भातील अशा गरजा लक्षात घेऊन त्यावर आधारित अनेक अभ्यासक्रम तयार करता येतील.

अलीकडे अनुवादाचे क्षेत्र विस्तार पावत आहे. त्यामुळे 'लिप्यंतरण' या कौशल्याला महत्त्व येत आहे. या दृष्टीने रोमन लिपीचे देवनागरी लिपीमध्ये लिप्यंतर करण्यातील तज्ज्ञता प्राप्त करून देणाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरू शकेल. अशाप्रकारे समाजाच्या बदलत्या गरजांकडे सातत्यपूर्ण पद्धतीने लक्ष ठेवण्याची गरज आहे. अलीकडे विविध रुग्णालयांमध्ये अमराठी परिचारिका व रुग्णसाहाय्यक यांची संख्या वाढताना दिसत आहे. रुग्णांच्या आरोग्याशी निगडित असा हा गंभीर विषय आहे. नेमक्या भाषिक संवादाच्या अभावी रुग्णाच्या जिवाला धोका संभवतो; हे लक्षात घेऊन अशा कर्मचाऱ्यांसाठी किमान भाषिक संज्ञापन कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करायला हवा आणि तो उत्तीर्ण होणे त्यांना बंधनकारक करायला हवे.

अनुवाद या क्षेत्रांतर्गत तांत्रिक अनुवाद हा विभाग देखील मराठीसाठी मोठ्या प्रमाणावर खुला होण्याची गरज आहे. औषधांपासून चॉकलेटपर्यंतच्या सर्वप्रकारच्या उत्पादनांच्या वेष्टनांवर मराठीतही मजकूर असणे महाराष्ट्रात बंधनकारक केले पाहिजे.

महाराष्ट्रातील अनेक ठिकाणांहून ये-जा करणाऱ्या विविध विमानसेवांचे ग्राहक मुख्यतः महाराष्ट्रातील मंडळीच असतात. तरीही विमानामध्ये दिल्या जाणाऱ्या सूचना मराठीतूनही देण्याची गरज का डावलली जात आहे? खरे तर हा राजभाषा मराठीचा स्वाभाविक अधिकार आहेच, शिवाय सर्वसामान्यांना लोकशाही प्रशासनात मिळणाऱ्या माहितीच्या अधिकाराशीदेखील ही बाब संबंधित आहे. आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडित महत्त्वाच्या बाबींची माहिती आपल्या परिसर भाषेतून जाणून घेता येणे हा नागरिकाचा अधिकार आहे. याला जोडून आणखी एका महत्त्वाच्या बाबीचा उल्लेख केला पाहिजे. आपल्याकडे २१ जुलै १९९८ रोजी काढलेल्या अधिसूचनेद्वारे राज्यातील दुय्यम न्यायालयांच्या कामकाजाची भाषा मराठी असेल, असे घोषित करण्यात आले. मात्र त्याची कार्यवाही तालुका व

अनुक्रमणिका

जिल्हा पातळीवरील न्यायालयांमध्ये अजूनही पूर्णपणे झालेली नाही, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे.

प्रशासनक्षेत्रातील उपयोजित मराठीचे क्षेत्रदेखील अमर्याद आहे. सर्व जीवनव्यवहाराला कवेत घेऊनही ते दशांमुळे उरणारे आहे. उपयोजित मराठीचा अभ्यासक्रम करताना याचे भान बाळगायला पाहिजे. मी मराठी अभ्यास परिषदेची कार्यवाह असताना पुण्यातील समर्थ मराठी संस्थेचे एक कार्यकर्ते अनिल गोरे यांनी आमच्या संस्थेकडे एक पत्र पाठवले होते. दि. ०९ ऑगस्ट २००५ च्या त्या पत्रातील महत्त्वाचा मजकूर असा आहे :

''समर्थ मराठी संस्थेने केलेली मागणी व पाठपुरावा यामुळे अखेर पुणे महापालिकेने 'राजभाषा अधिनियम १९९४' चे काटेकोर पालन करण्याचे मान्य केले आहे.

सर्व प्रशासकीय पत्रके, टिपण्या, शेरे, पत्रव्यवहार, पदनामे, नामफलक, सूचना, परिपत्रके, प्रकटने, दिशादर्शक व स्थलदर्शक पाट्या, अधिकाऱ्यांच्या नावपट्ट्या इतकेच नव्हे, तर पालिकेच्या वाहनांवरील क्रमांक, घरपट्टी-पाणीपट्टी देयक, भरणा पावत्या यापासून वाहनतळ, वाहने उभी करणे /न करण्याचे निर्देश तसेच मार्गावरील कठडे, गटारांची झाकणे इत्यादी सर्व ठिकाणी जिथे म्हणून मजकूर व अक्षरे लिहिण्याचा किंवा कोरण्याचा प्रसंग येईल तिथे-तिथे देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा पूर्णतः वापर होईल. जिथे मराठी सोबत अन्य भाषा वापरणे आवश्यक वाटेल तिथे मराठीला प्राधान्य राहील. सदर निर्णयाची १ नोव्हेंबर २००५ पर्यंत टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचे प्रशासनाने मान्य केले असून तसे अंतर्गत परिपत्रकही काढले आहे.''

हे पत्र वाचताना लक्षात येते की राजभाषा अधिनियमांचे पालन होत आहे की नाही. यावर देखरेख ठेवणारी यंत्रणाच आपल्याकडे नाही. अशा परिस्थितीत 'नियम' या शब्दाला काय अर्थ उरतो? त्यासाठी ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेपर्यंतच्या शासकीय भाषाव्यवहाराचे सुसूत्रीकरण करण्यासाठी प्रत्येक स्तरावर 'भाषातज्ज्ञ' हे पद अनिवार्य केले पाहिजे. त्यासाठी मराठी (भाषा) या विभागातर्फे अभ्यासक्रम तयार केला पाहिजे.

केवळ प्रशासकीय पातळीवरच नव्हे. तर विविध व्यावसायिक पातळीवरही (उदा. जाहिरात व्यवसाय, वृत्तपत्र व्यवसाय इत्यादी) भाषातज्ज्ञ या पदाची आवश्यकता समाजमनावर बिंबवली पाहिजे.

भाषाविषयक विविध अभ्यासक्रम राबवताना विद्यापीठाने विद्यार्थिसंख्येची अट शिथिल करून राजभाषाविषयक कर्तव्यभावनेला महत्त्व दिले पाहिजे.

बृहन्महाराष्ट्रातील मराठी :

बृहन्महाराष्ट्रातील मराठीच्या अध्ययनाचे क्षेत्रही हळूहळू कमी होत चालले आहे. झाशी (उ.प्र.), ग्वाल्हेर, धार (म. प्र.) येथील मराठी विभाग बंद करण्यात आले आहेत. गुजरातमध्येही मोजक्याच शाळांमधून दहावी-बारावीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून सुरू आहे. हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठाबरोबरच तेथील मराठी महाविद्यालयाने विद्यार्थीसंख्या अजूनतरी टिकवून धरली आहे. पण ते अपवाद आहेत. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने बृहन्महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर मराठी भाषेच्या प्राज्ञ, विशारद आदी परीक्षांचे आयोजन करण्यावर भर दिला पाहिजे. इतकेच नव्हे, तर या परीक्षांना मराठी विषयातील पदवीची समकक्षता मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. सध्या क्षीण होत चाललेल्या बृहन्महाराष्ट्रातील मराठीच्या अध्ययन-अध्यापनाच्या परंपरेला त्यामुळे नवसंजीवनी मिळू शकेल.

स्वायत्त संस्थेची गरज :

आपल्याकडे प्रमाण मराठीप्रमाणेच मराठीच्या विविध बोलींचेही समृद्ध भाषविश्व आहे. साहित्य, कला, लोककला, नाट्य-चित्रपट इत्यादींची विविधरंगी संपन्न परंपरा आहे. या कलाक्षेत्रातील अनेकविध कलाकृतींच्या सादरीकरणाबाबत प्रशिक्षण देणारी स्वायत्त संस्था निर्माण केली पाहिजे. या संस्थेतर्फे एफ. टी. आय. मध्ये ज्याप्रमाणे 'फिल्म ॲप्रिसिएशन कोर्स' घेतले जातात तसे विविध कलाक्षेत्रांतील कलाकृतींच्या चिकित्सक रसास्वादावर आधारित अभ्यासक्रम घेता येतील. त्यातून विविध विद्याशाखांमधील प्रतिभा आणि प्रज्ञा मराठी समीक्षा व कलास्वाद या क्षेत्रांशी जोडल्या जाऊ शकतील. मराठी मनाच्या रसिकतेचे चिकित्सक अंगाने पोषण करणे आणि कलानिर्मितीला चालना देणे हे याद्वारे घडले की मराठी समाजमनाच्या अभिरुचीचे संवर्धन होण्यास गती मिळेल.

अलीकडे विविध वाहिन्या, सोशल मिडिया आदींवर

अनुक्रमणिका

मराठीला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे पटकथालेखन, ग्रंथव्यवहारनिर्मिती, मनोरंजन उद्योगासाठी लेखन आदी नवी रोजगारक्षेत्रे उपलब्ध होत आहेत. याविषयीचे अभ्यासक्रम स्वयंनिर्वाही पद्धतीने चालवण्याची अट विद्यापीठातर्फे घातली जाते. अशावेळी एखाद्या स्वायत्त संस्थेतर्फे हे अभ्यासक्रम आखून कार्यान्वित करणे शक्य आहे.

ज्ञानभाषा मराठीच्या संवर्धनाचे मार्ग :

ज्ञानभाषा या रूपात मराठी रुजण्यासाठी सर्वच विद्याशाखांमधील महाविद्यालयीन शिक्षण मराठी माध्यमातून देण्याची पर्यायी व्यवस्था कार्यान्वित व्हायला हवी. त्यासाठी विद्यार्थिसंख्येची अट शिथिल केली जावी. तसेच 'आर्टस्' शाखेची प्रतिष्ठा वाढवायला हवी. तिच्याकडे 'मानव्यविद्याशाखा' म्हणून पाहायला हवे. या शाखेसाठी उद्योगविश्वाच्या मदतीने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, संशोधनाला चालना देणे, विद्यावेतनाच्या सुविधा उपलब्ध करणे, विद्यापीठस्तरावर संशोधनाला वाहिलेले नियतकालिक चालवणे, विविध विषयांवरील पीएच.डी.चे प्रबंध मराठीतून अनुवादित करण्यासाठी प्रोत्साहनपर निधी पुरवणे आदी मार्ग चोखाळणे आवश्यक आहे.

सध्याचे युग आंतरविद्याशाखीय ज्ञानव्यवहाराला महत्त्व देणारे आहे. अशावेळी आपण मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे असा प्रस्ताव पाठवू शकतो की, तंत्रशिक्षण संस्थामध्ये क्रेडिट सिस्टिमच्या आधारे 'मराठी भाषा' हाही पर्याय त्या अभ्यासक्रमांमध्ये उपलब्ध करून द्यावा (मराठी भाषा व समाजविषयक पायाभूत स्वरूपाचा अभ्यासक्रम त्यात समाविष्ट असावा.) येथे मला आय. आय. टी. (गांधीनगर) या संस्थेतील प्रा. मोना मेहता आणि रघुवीर शरण यांनी लिहिलेला एक निबंध नमूद करावासा वाटतो.

'IIT's and the Project of Indian Democracy' हा तो निबंध होय. (पाहा : होमजर्नल, व्हॅल्युम - ५१, इश्यु नं. ११, १२ मार्च २०१६). प्रस्तुत निबंधात लेखकांनी आय.आय.टी. मधील तंत्रज्ञान हे भारतीय लोकशाहीच्या गरजा पूर्ण करण्यात कसे कमी पडते, याची चर्चा केली आहे. त्यांच्या प्रतिपादनामागील सूत्र महत्त्वाचे आहे. प्रादेशिक भाषा, समाज आणि संस्कृती यांची काहीही पार्श्वभूमी नसलेले तंत्रज्ञ आज मोठ्या प्रमाणात घडत आहेत. त्यामुळे आपल्याकडील श्रमजीवी (उदा. हमाल, शेतकरी इ.) मंडळींच्या श्रमासाठी पर्यायी ठरणारे तंत्रज्ञान विकसित करण्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. अशावेळी सर्वसामान्यांचा विकास हा लोकशाहीचा गाभा प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रादेशिक भाषांना तंत्रज्ञान क्षेत्रातही मानाचे स्थान असण्याची गरज आहे. या दृष्टीनेही मराठीची वेगवगळ्या पातळ्यांवरील अभ्यासक्रमांमध्ये प्रतिष्ठापना होण्यासाठी आपण प्रयत्नशील राहायला हवे.

शेवटी हे लक्षात घ्यावयास हवे की भाषा ही व्यक्तिमनांचे स्वतंत्र भावजीवन आणि सामाजिक पातळीवरील त्यांचे सहजीवन साधणारी उभी-आडवी घट्ट वीण असते. भाषाव्यवहार हा केवळ संज्ञापनव्यवहार नसतो. तर तो ज्ञानसर्जनप्रक्रियेतील एक सेंद्रिय घटक असतो. त्यामुळे मराठीच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे कर्तव्य आपण वेळीच निभावले तरच तिची योग्य ती बूज राखली, असे म्हणता येईल.


आधारग्रंथ :

१. 'Paul H. Hirst, " Knowledge and the Curiculum Routledge and Kegam Paul, London and Boston, 1974.
२. 'भाषाप्रकाश', डॉ. नीलिमा गुंडी, मॅजेस्टिक, मुंबई, २०१५.
३. 'मराठी भाषा : संचित आणि नव्या दिशा, संपा. विजय कुवळेकर, प्रका. पी. डी. पाटील, पुणे, २०१६
४. 'अक्षरगाथा', मराठी भाषा विशेषांक, संपा. मा. मा. जाधव व इतर, अंक ३, ऑक्टो. २०१३.

• • •

▪ **डॉ. नीलिमा गुंडी**, अन्नपूर्णा, पहिला मजला, १२५९, शुक्रवारपेठ, सुभाषनगर, गल्ली क्र. ५, पुणे - ४११००२

अनुक्रमणिका



'अभिजात भाषा' नावाचे प्रकरण


■ डॉ. प्रमोद मुनघाटे

आपल्या देशात आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलगु, कन्नड, मल्याळम आणि उडिया या सहा प्रादेशिक भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. मराठी भाषेला हा अभिजाततेचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने पुरेपूर प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्र शासनाने या संदर्भात कोणते संस्थात्मक प्रयत्न केले, त्या प्रयत्नांना अद्यापि यश का आलेले नाही हे प्रश्न महत्त्वाचे आहेत, तसेच मुळात 'अभिजात भाषा' ही नेमकी संकल्पना काय आहे आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याची काय गरज आहे, या प्रश्नांच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे.

प्रथम 'अभिजात भाषा' म्हणजे काय याचा विचार केला पाहिजे. पाश्चात्त्य संस्कृतीत परंपरेने ग्रीक आणि लॅटिन या भाषांना 'अभिजात भाषा' (Classical languages) असे संबोधले जाते. ग्रीक व लॅटिन या युरोपमधील प्राचीन भाषा. आहेत. त्या भाषेत मौलिक साहित्य आहे. साहित्य, कला आणि शास्त्र या क्षेत्रातील काही मूलभूत सिद्धान्त आणि तत्त्वे त्या साहित्यातून आधुनिक ज्ञानशाखांनी स्वीकारली आहेत. परंतु ग्रीक व लॅटिन या भाषांना 'अभिजात भाषा' मानणे हा केवळ विद्वन्मान्यतेचा भाग आहे. कोणत्याही जागतिक संस्थांनी या भाषांना तसे प्रमाणपत्र दिलेले नाही. पश्चिमेकडे फ्रेंच, जर्मन, इंग्लिश या भाषादेखील साहित्य, कला व ज्ञान या संदर्भात समृद्ध भाषा आहेत. मात्र या भाषकांनी आमची भाषा 'अभिजात' आहे असे जाहीर करावे अशी मागणी आपल्या देशाच्या सरकारकडे किंवा संयुक्त राष्ट्र संघासारख्या संघटनेकडे कधी केल्याची ऐकिवात नाही.

भारतात परंपरेने संस्कृत भाषा ही 'अभिजात' भाषा मानली जाते आणि त्यास जगभर मान्यता आहे. अर्थातच महाकाव्ये, दर्शने आणि शास्त्रविषयक ग्रंथ संस्कृतमधून असल्याने स्वाभाविकपणेच संस्कृतचे वर्चस्व भारतात विद्येच्या क्षेत्रात अबाधित राहिले आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की तमिळ ही भाषा भारतातील संस्कृतइतकीच संपन्न व प्राचीन भाषा आहे. त्या भाषेत समृद्ध साहित्य उपलब्ध आहे. तरीही भारतात तमिळ भाषेला 'अभिजात' भाषा म्हणून मान्यता नाही, ही गोष्ट तामिळनाडूमधील भाषाभिमानी गटांना सलत होती. विशेषतः राजकारणात सक्रिय असलेल्या डीएमके गटाला ही गोष्ट अधिक डाचत होती. त्यासाठी तमिळ भाषेचे प्राचीनत्व व श्रेष्ठत्व जगाच्या नजरेस आणून देणे गरजेचे होते. त्यामुळे तमिळ साहित्याचा परिचय होईल, अधिक लोक ती भाषा शिकण्यास प्रवृत्त होतील आणि त्या भाषेबद्दल आदर निर्माण होईल. अर्थातच असे प्रयत्न दीर्घकाळ केले तरच ते शक्य होते. डीएमकेसारख्या अस्मितावादी गटाला दीर्घकाळ प्रतीक्षा झेपणारी नव्हती. त्यासाठी जवळचा मार्ग शोधणे गरजेचे होते.

अनुक्रमणिका



अमेरिकेतील बर्कली येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात तमीळ भाषा विभाग आहे. तेथे डॉ. जॉर्ज हार्ट हे १९७५ पासून तमिळ विभागाचे प्रमुख आहेत. तमिळ आणि संस्कृत या विषयाचे ते गाढे अभ्यासक आहेत. डॉ.जॉर्ज हार्ट यांना तमिळ ही अभिजात भाषा आहे की नाही यावर आपले मत द्यावे अशी विनंती तमिळ भाषेचे एक अभ्यासक डॉ.मराइमलाई यांनी केली. त्यानुसार डॉ. हार्ट यांनी ११ एप्रिल २००० रोजी आपला एक निबंध विस्तृतपणे प्रसिद्ध केला. तो त्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. डॉ. हार्ट यांनी तमिळला अभिजात भाषा का म्हणावे याबद्दल सविस्तर टिपण देऊन त्याबद्दल काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. कारण एकदा का तमिळ भाषेला अभिजात भाषा म्हणून घोषित केले की अन्य भारतीय भाषासमूह सुद्धा आपापल्या भाषांना तो दर्जा मिळावा यासाठी नक्कीच प्रयत्न करणार हे डॉ. जॉर्ज हार्ट यांच्या लक्षात आलेच होते. म्हणून तमिळशिवाय अन्य भाषांना 'अभिजात' असे का म्हणता येणार नाहीत हेही त्यांनी आपल्या निबंधात नोंदवून ठेवले आहे. या सर्व प्रकरणात राजकारणातील अस्मितेचा मुद्दा केंद्रस्थानी आहे, हे लक्षात येते.

डॉ. जॉर्ज हार्ट यांच्या तमिळ भाषेच्या संदर्भातील अभिजात भाषेच्या निबंधानंतर २००४ साली या प्रकरणाला नवे वळण मिळाले. २००४ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये केंद्रातील यूपीए (United Progressive Alliance) सरकारला तामिळनाडूमधील ज्या पक्षांचा पाठिंबा होता, त्यात प्रामुख्याने डीएमके हा एक पक्ष होता. डीएमकेने यूपीएला निवडणुकीत पाठिंबा देताना 'किमान समान कार्यक्रम' अंतर्गत (Common Minimum Program) काही मागण्या केल्या होत्या. त्यातील प्रमुख मागणी म्हणजे निवडणुकीनंतर केन्द्र सरकारने तमिळ भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा देणे अशी होती.

२००४ च्या निवडणुकीत यूपीए सरकार सत्तेवर आले. त्यानंतर डीएमके पक्षाने आपल्या अभिजात भाषेच्या मागणीची आठवण करून दिली. केन्द्र सरकारने अभिजात भाषेच्या प्रश्नावर साहित्य अकादमीचा सल्ला मागितला. साहित्य अकादमीच्या समितीने देशातील एकाच भाषेला अशा प्रकारचा दर्जा देणे उचित ठरणार नाही, तसे करण्याची आवश्यकताच नाही, आणि त्यामुळे चुकीचा पायंडा पडेल अशा प्रकारचा आपला अभिप्राय सरकारला कळविला. थोडक्यात साहित्य अकादेमीने अभिजात भाषेच्या संदर्भात तमिळबद्दल आपले स्पष्ट मत दिलेच नाही. परंतु एखाद्या भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा देण्यासाठी कोणते निकष पूर्ण करावे लागतात, ते मात्र ठरवून दिले. ते निकष पुढीलप्रमाणे आहेत.

१) अभिजात भाषा ही सुमारे १५०० ते २००० वर्षांहून अधिक जुनी असावी आणि तेवढेच प्राचीन वाङ्मय त्या भाषेत असावे.

२) ती भाषा बोलणाऱ्या लोकांचे मौल्यवान वारसा असे म्हणता यावे इतके प्राचीन वाङ्मय त्या भाषेत असावे.

३) त्या भाषेची स्वतःची परंपरा असावी आणि त्यासाठी दुसऱ्या भाषेवर अवलंबून नसावी.

४) भाषेचे आधुनिक रूप हे तिच्या प्राचीन रूपांहून भिन्न असले तरी चालेल; पण त्यांच्यात आंतरिक नाते असावे.

साहित्य अकादेमीने ठरविलेल्या अभिजात भाषेच्या निकषांच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा की हे निकष आणि डॉ. जॉर्ज हार्ट यांनी तमिळ ही अभिजात भाषा कशी आहे, हे सिद्ध करताना सांगितलेले निकष जवळजवळ सारखेच होते. यानंतर केन्द्र सरकारने १७ सप्टेंबर २००४ रोजी तमिळ भाषा ही 'अभिजात' असल्याची घोषणा केली.

अभिजात भाषेच्या संदर्भात एक महत्त्वाचा प्रश्न असा निर्माण होतो, एखादी भाषा 'अभिजात' आहे, असे ठरविण्याचा अधिकार केन्द्र सरकारला आहे काय? भारतीय राज्यघटनेनुसार किंवा कोणत्याही कायद्यानुसार असा अधिकार सरकारला नाही. तसेच कोणत्याही सरकारी धोरणामध्ये अशा प्रकारचा दर्जा बहाल करण्याच्या अधिकाराचा स्पष्ट उल्लेखही नाही. भाषेच्या संदर्भात एखादा अध्यादेश काढण्याचा सरकारला घटनात्मक अधिकार मात्र आहे. राज्यघटनेच्या ३४१ व्या कलमानुसार हिंदी भाषेच्या विकासाकरिता प्रामुख्याने संस्कृतचा आधार घेण्यात यावा, इतकाच संस्कृत भाषेचा विशेष उल्लेख आहे. त्याशिवाय कोणत्याही भाषेला एखादा विशेष आणि वेगळा दर्जा देण्याची तरतूद घटनेत नाही.

हे सगळे होत असताना भारतात परंपरेने अभिजात मानलेल्या आणि प्राचीन साहित्य असलेल्या संस्कृत भाषेचे काय, संस्कृत भाषा अधिकृतपणे अभिजात नाही का? असा प्रश्न निर्माण झाला. तो प्रश्न अधिक चिघळू नये म्हणून यासाठी केन्द्र सरकारने दि. २७ ऑक्टोबर २००५ रोजी संस्कृत भाषेलाही अभिजात भाषेचा दर्जा घोषित केला. मात्र असे करताना प्रारंभी निश्चित केलेले अभिजात भाषेचे निकष सरकारला सैल करावे लागले. अभिजात भाषा २००० ते १५०० वर्षे जुनी असल्याची अट सैल करून ती १५०० वरच आणली गेली.

कालांतराने या सगळ्या घटना दिल्ली मध्ये घडत असताना, त्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनलेले पृथ्वीराज चव्हाण हे केंद्रामध्ये पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री होते. तमिळ, कन्नड, संस्कृत, तेलगू या चार भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी त्यांनीच पुढाकार घेतला होता. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनीच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

परंतु त्यापूर्वीच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व भाषाविषयक क्षितिजावर आणखी काही घडामोडी घडत होत्या. साधारणपणे २००९ मध्ये महाराष्ट्र सरकारने राज्याचे सांस्कृतिक धोरण कसे असावे यासाठी थोर विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने आपल्या अहवालात मराठीच्या विकासासंबंधी काही सूचना केल्या होत्या. त्यातूनच राज्य सरकारचा 'मराठी भाषा विभाग' नव्याने अस्तित्वात आला. त्यानंतर महाराष्ट्राचे भाषिक धोरण कसे असावे यासाठी २०१० साली भाषा सल्लागार समिती स्थापन करण्यात आली. माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर हे या समितीचे पहिले अध्यक्ष होते, आणि त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण होते. ज्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या समितीची पहिली बैठक झाली, त्याच दिवशी मुख्यमंत्र्यांना आदर्श प्रकरणावरून राजीनामा द्यावा लागला होता. पण याचा तसा अभिजात भाषेशी थेट संबंध नाही. मात्र अशोक चव्हाण यांच्या नंतर पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री झाले आणि मराठी ही 'अभिजात भाषा' झाली पाहिजे अशी मागणी पुढे आली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्रस्ताव तयार करण्यासाठी शासनाच्या मराठी विभागाने एक समिती गठीत केली. प्रा. रंगनाथ पठारे हे त्या समितीचे अध्यक्ष होते. तसेच प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. हरी नरके, प्रा. मधुकर वाकोडे, प्रा. आनंद उबाळे, प्रा. मैत्रेयी देशपांडे, प्रा. कल्याण काळे, सतीश काळसेकर हे मान्यवर सदस्य होते.

येथे आणखी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्याचा हा खटाटोप कशासाठी? तर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दरवर्षी केंद्राकडून मराठीच्या विकासासाठी व संशोधनासाठी पाचशे कोटी रुपये मिळतील हा एक फायदा, तसेच काही अन्य फायदे प्रा. रंगनाथ पठारे यांनी मांडले आहेत. त्यांच्या मते, मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यास मराठी भाषकांचा आत्मविश्वास दुणावेल. कारण सद्यःस्थितीत भाषा टाळण्यात आपला पहिला क्रमांक आहे. समोरच्याने वेगळ्या भाषेत सुरुवात केली की आपण मराठी क्षणात विसरतो आणि त्याच्या भाषेत बोलायला सुरुवात करतो. परंतु आपल्या भाषेविषयी कुठेतरी खरेखुरे प्रेम, अभिमान आवश्यक आहे. भौतिक स्वरूपाचा असा दर्जा मिळाला तर तो अभिमान निर्माण होऊ शकेल.

अनुक्रमणिका

आपल्याकडे अनेक बोलीभाषा आहेत. त्यात मराठीतही अनेक आहेत. त्यांचा दीर्घ इतिहास असून, त्यांचे संवर्धन व जतन करण्याच्या दिशेने प्रयत्न करता येऊ शकतील. केतकरांच्या ज्ञानकोशासारखे मराठी साहित्यातले अनेक समृद्ध प्रकल्प आज उपलब्ध नाहीत. अशासारखे ग्रंथ पुन्हा छापून सर्व शासनमान्य ग्रंथालयांना उपलब्ध करून देता येऊ शकतील. धर्मानंद कोसंबी यांच्यासारख्या प्राच्यविद्याविशारदांनी मोठे संशोधन, लेखन केले आहे. त्यांचे लेखन प्रामुख्याने इंग्रजीत आहे. अशा स्वरूपाच्या साहित्याच्या अनुवादाला चालना देता येऊ शकेल. इंग्रजी शिकण्याला विरोध कुणाचाच नाही; परंतु इंग्रजी भाषा शिकणे आणि इंग्रजीतून सारे काही शिकणे यात मोठा फरक आहे आणि ती मोठी चूकही आहे. त्यामुळे त्यासाठी चांगले काम करून चांगली पाठ्यपुस्तके मराठीतून आणता येतील. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेतून विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ स्थापन करण्यात आले होते. त्याचे उद्देश व कल्पना चांगली होती; परंतु आता ते कागदावरच राहिलेले आहे. त्याचे पुनरुज्जीवन करता येऊ शकेल. अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर मराठीच्या प्राचीन सौंदर्याला उजाळा आणि गुणवैशिष्ट्यांचे संवर्धन अशा दुहेरी स्वरूपामध्ये काम करता येईल.

सुमारे अकरा कोटी लोकांची भाषा असलेल्या मराठीची मौलिक वैशिष्ट्ये, प्राचीनता आणि संपन्न वाङ्मयीन परंपरा सिद्ध करण्याचे मोठे आव्हान या समितीसमोर होते. या समितीने ७ जुलै २०१३ रोजी १२७ पानांचा अहवाल तयार केला. त्या अहवालाच्या आधारे केलेला प्रस्ताव राज्य सरकारतर्फे ५ फेब्रुवारी २०१५ रोजी केंद्र सरकारकडे रीतसर सादर करण्यात आला. केंद्राच्या संबंधित विभागाने कठोर छाननी करून तो अभिप्रायाकरिता साहित्य अकादेमीकडे पाठवला. साहित्य अकादेमीच्या समितीने प्रस्ताव आणि प्रत्यक्ष सादरीकरण लक्षात घेऊन मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा असा अनुकूल अभिप्राय पंतप्रधान कार्यालयाला पाठवला. त्यानंतर पंतप्रधान कार्यालयाने सदर प्रस्ताव कॅबिनेटच्या बैठकीपुढे ठेवणे अपेक्षित होते. परंतु आजतागायत ते झालेले नाही. आता मराठीला अभिजात दर्जा मिळण्याची निव्वळ प्रतीक्षा सुरू आहे.

महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या समितीतील अभ्यासक व संशोधकांनी अत्यंत कष्टाने हे काम करून आपला प्रस्ताव तयार केला होता. महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या अभिजात मराठी भाषा समितीच्या वतीने करण्यात आलेल्या मराठीच्या अभिजातताविषयक संशोधनात पुण्याच्या भांडारकर प्राच्याविद्या संशोधन संस्थेचा प्रमुख सहभाग आहे. भांडारकर प्राच्याविद्या संशोधन संस्थेच्या भारतीय भाषा अध्ययन विभागातर्फे अभिजात मराठी भाषा अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेमध्ये मराठी भाषाविषयक संशोधन प्रकल्प हाती घेण्याचे ठरले आहे. भांडारकर संस्थेचे एक पदाधिकारी डॉ. हरी नरके यांच्या वक्तव्यानुसार या संस्थेत स्वतंत्रपणे मराठी भाषाविषयक संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला. भांडारकर संस्थेमध्ये दीड ते दोन हजार जुन्या पोथ्या सापडल्यामुळे त्यांना त्यांचा अभ्यास करता आला. मराठी भाषेचे वय चोरले गेले आहे, असे नरके यांचे मत आहे. मराठीचे वय सुमारे अडीच हजार वर्षे असल्याचे अडीचशे पुरावे समितीने दिले आहेत. जगातील १९६ भाषांमध्ये राष्ट्रगीत आहे. मात्र, 'पसायदान' हे विश्वगीत फक्त मराठीत आहे. ज्ञानानी काठोकाठ भरलेले किमान एक हजार ग्रंथ मराठीत आहेत. म्हणून ती भाषा ज्ञानभाषा आहे. जगातील ७२ देशांमध्ये मराठी बोलली जाते. जगात सुमारे वीस हजार भाषा आहेत. त्यामध्ये मराठीचा क्रमांक दहावा आहे. मराठीला ५२ बोलीभाषांनी समृद्ध केले आहे. 'विनयपीटक' या बौद्ध धर्मग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख आढळतो. हा अडीच हजार वर्षांपूर्वीचा ग्रंथ आहे. हाल-सातवाहनाच्या काळातील मराठीतला पहिला ग्रंथ 'गाथासप्तशती' हा दोन हजार वर्षांपूर्वीचा आहे.

अभिजात भाषा समितीने ३० शिलालेख, ५२ ताम्रपट व मराठीच्या वयाचे शेकडो पुरावे दिले आहेत. मराठी ही संस्कृतची मुलगी नाही तर बहीण आहे, हे संत ज्ञानेश्वर, एकनाथांनी सांगितले आहे. संस्कृत ही वैदिक भाषेतून जन्माला आली असून वैदिक पूर्व भाषेतून मराठी जन्माला आल्याचे सिद्ध होते. संपूर्ण भारतात जेवढी ग्रंथालये आहेत त्यातील पंचवीस टक्के महाराष्ट्रातील आहेत.


श्रीलंकेतील सिंहली लिपीतील दीपवंश आणि महावंश या पंधराशे वर्षांपूर्वीच्या ग्रंथात महाराष्ट्री भाषेचा असलेला उल्लेख आढळतो. वररुची या पाणिनीच्या समकालीन विद्वानाने प्राकृत भाषांचे व्याकरण लिहिले आहे. त्याने शौरसेनी, पैशाची, अर्धमागधी, महाराष्ट्री या

प्राकृत भाषांचे व्याकरण लिहिले आहे. महत्त्वाचे म्हणजे, त्याने 'शेषं महाराष्ट्रीवत' हा ठळक नियम केला आहे. त्यानुसार सर्व प्राकृत भाषांचे उरलेले नियम मराठीप्रमाणे होते. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत असलेली ८० हस्तलिखिते ही प्राचीन आहेत आणि या पुराव्यांना बळकटी देणारी आहेत. संपूर्ण भारतात सुमारे हजारावर लेणी आहेत. त्यातील ८०० एकट्या महाराष्ट्रात आहेत. या लेण्यांतील सर्व शिलालेख जुन्या मराठीत आहेत.


केंद्र शासनाला अभिजात भाषेचा प्रस्ताव सादर केल्यावर तेथे प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले. दरम्यानच्या काळात २०१४ च्या निवडणुका झाल्या आणि केंद्र व राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार आले. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांना, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही त्यांच्या कारकिर्दीसाठी प्रारंभीची एक मोठी उपलब्धी वाटली. ५ फेब्रुवारी २०१५ ला महाराष्ट्र शासनाने केंद्राकडे प्रस्ताव सादर केला होता, आणि २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे त्या दिवशी केंद्राकडून नक्कीच ती घोषणा होईल अशी त्यांना खात्री होती. तशा हालचाली सुरू झाल्या होत्या. अभिजात भाषेच्या घोषणेच्या निमित्ताने सर्व विद्यापीठांनी मराठी भाषादिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात साजरा करावा असे निर्देश उच्च शिक्षण विभागाकडून देण्यात आले. पण महाराष्ट्राचा अपेक्षाभंग झाला. पण अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत साहित्य अकादेमीने पाठवलेला सुधारित प्रस्ताव केंद्र सरकारला उशिरा मिळाला. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याचा तो मुहूर्त टळला तो आजतागायत उगवला नाही. ही मराठीच्या अभ्यासकांना चिंतेची बाब वाटते. अभिजात भाषेच्या दर्जाच्या संदर्भात एक मुद्दा असाही आहे की, भाषांच्या संदर्भात अशा प्रकारची विषमता योग्य आहे का? काही भाषा अभिजात आणि काही भाषा अभिजात नाही असे ठरवून आपण त्या भाषिक समूहांमध्ये न्यूनगंड तर निर्माण करीत नाही ना? असाही प्रश्न पडतो. साहित्याची प्रतवारी करता येते, दर्जा ठरवता येतो. परंतु भाषा ही एखाद्या समूहाच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असतो. किंबहुना, त्या समूहाची संस्कृती त्या भाषेतच असते. पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक जिवाला जशी पर्यावरणाच्या साखळीत एक निश्चित भूमिका असते, सांस्कृतिक पर्यावरणात सर्व भाषांनाही ती असते. मौलिकता आणि अभिजातता त्या भाषेतील लोकांचे जीवनमान, भौतिक संपन्नता, नैतिक मूल्यव्यवस्था आणि संपन्न कला-साहित्याची परंपरा यांवर निसर्गतःच अवलंबून असते. त्यामुळे इंग्रजीसारख्या भाषेला अभिजात म्हणवून घेण्याची गरज पडत नाही. अर्थात धर्म, वंश आणि वर्ण या प्रमाणेच आधुनिक काळात भाषा हे मानवी समाजात सत्ताकारणाचे व त्या अनुषंगाने अस्मितेच्या राजकारणाचे लक्ष्य झाले आहे, म्हणून अभिजात भाषेच्या संदर्भातील राजकारणाला अकारण महत्त्व प्राप्त झाले आहे, असे वाटते.

• • •

■ **डॉ. प्रमोद मुनघाटे**, सी-३०१, शेवाळकर गार्डन, दक्षिण अंबाझरी मार्ग, नागपूर - ४४००२२.



अनुक्रमणिका



। टिपण :

मराठी बोली : वास्तव आणि संवर्धन

■ डॉ. रावसाहेब मुरलीधर काळे

आजचे युग हे फारच झपाट्याने बदलणारे आहे. काही वर्षांपूर्वी दहा वर्षांत जे बदल होत होते ते बदल आज एका वर्षातच होताना दिसून येतात. भाषेच्या बदलांचा अभ्यास करण्याकरिता दहा-वीस वर्षांचा कालखंड हवा असे. आज मात्र एका वर्षातच सामान्य माणसाला जाणवतील एवढे बदल कोणत्याही स्थानिक भाषेत होताना दिसून येतात. मराठीही याला अपवाद नाही. या बदलाचे मुख्य कारण म्हणजे इंग्रजीचा प्रभाव किंवा आक्रमण होय. हे आक्रमण तीन पद्धतीने होताना दिसून येते.

मराठी भाषिकांची मनोवृत्ती :

आजच्या मराठी भाषकांनाच आपली मराठी नको आहे. त्यांना वाटते की मराठी ही भाषा आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी परिपूर्ण आहे. मात्र भाकर मिळून देण्यास अपुरी आहे. त्यामुळे ते इंग्रजीला आपल्या जवळ करीत आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे इंग्रजीत बोललो तर आपली प्रतिष्ठा वाढते. आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन होते. माझ्या घरचेच उदाहरण देतो. माझ्या बहिणीचे पळसो, लोणी आणि अकोला येथे बालपण गेले, शिक्षण झाले. आज माझ्या भाचीला ती दूध 'फिनीस' केला, असे शिकविते. भाचीने गाय काऊ, म्हैस बफेलो म्हणूनच पाहिली. कठीण आहे. आपणही कोणी फोन नंबर मागितला की लगेच इंग्रजीत का सांगतो यावर विचार केल्यास वरील मुद्दा लक्षात येईल.

ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीचा वापर :

आपण आपल्या शिक्षणाचे माध्यमच इंग्रजी करून टाकले आहे. कृषीचे शिक्षणही आपल्या देशात इंग्रजीतून दिले जाते. त्यामुळे आपल्या मराठीचे महत्त्व मनातून कमी होत जाणे साहजिक आहे. आज तर मुद्दाम मराठी शाळा बंद पाडण्यात येत आहेत. कॉन्व्हेंटचे प्रमाण वाढत आहे. आपला मुलगा आपल्याला सतरा म्हणजे काय, सत्तावीस म्हणजे काय असे विचारतो. 'वन टू का फोर'च्या काळात आपण एक दोन तीन विसरत आहोत.

मराठी ही ज्ञानभाषा हवी. काही लोकांचे म्हणणे असे आहे की, 'मेडिकल' वगैरे क्षेत्रात इंग्रजी आवश्यक आहे. तर मग जपान, चीनमध्ये त्यांनी आपलीच भाषा ज्ञानभाषा म्हणून कायम ठेवली, त्यांचे तर इंग्रजीवाचून काही बिघडले नाही. येथे इंग्रजीला विरोध नाही. ती एक संपर्क भाषा म्हणून हवीच. त्यापेक्षा तिला अधिक महत्त्व नकोच. ती शिक्षणात नसेल तर ती येईल कशी, असाही एक प्रश्न पडेल. भाषा अभ्यासक असे सांगतात की, एक आपली मातृभाषा आपल्याला चांगली येत असेल तर जगातील कोणतीही भाषा तिच्या आधारे आपण

अनुक्रमणिका

शिकू शकतो. आपल्या आणि आपल्या पूर्वीच्या सर्व पिढ्यांची प्रथम भाषा ही आपली मराठीच होती. मराठीचे बोट धरूनच भाषिक प्रांतात आपला वावर सुरू झाला, तरी आपल्याला इंग्रजी बोलता येतेच ना.

नवीन यंत्रांचा वापर :

मराठीत इंग्रजीतील शब्दांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. इंग्रजी भाषेतील शब्दांचे प्रमाण वाढण्याचे महत्त्वाचे कारण नवनवीन आधुनिक वस्तूंचा, यंत्रांचा वापर हे आहे. एका वऱ्हाडी भाषिकाने ट्रॅक्टर विकत घेतल्या बरोबर ट्रॅक्टर, रेस, डायनामा, टायर, रोटावेटर, हॉडलीक, डिप, ब्रेक, व्ही पास, नट, ऑईल, थेचर असे कितीतरी शब्द रूढ होतात. मोबाईल संबंधित शब्दांचे वाक्प्रचारही होत आहेत. कोणी ऐकण्याच्या मनःस्थितीत नसेल तर 'तो रेंजमध्ये नाही' असे म्हणतात. आता असे शब्द स्वीकारायचे की एखादी वस्तू बाजारात उपलब्ध होण्यापूर्वीच तिच्या अवयवांसह आपल्या भाषेत नामकरण करावे हाही प्रश्नच आहे. तसेच, अशा परभाषेतील शब्दांचा किती प्रमाणात स्वीकार करावा हा एक प्रश्न आहे. खरे म्हणजे ही प्रक्रिया मोजूनमापून होऊ शकत नाही.

एखाद्या भाषेने परभाषेतील शब्दांचा स्वीकार करणे योग्य की अयोग्य हा जुनाच वाद आहे. इंग्रजी भाषेच्या समृद्धीचे, तिच्या श्रीमंतीचे महत्त्वाचे कारण सांगताना आपण म्हणतो की तिने वेगवेगळ्या भाषेतील शब्दांचा स्वीकार केला. जपानी, मराठी असे कोणत्याही भाषेतील शब्द तिने आत्मसात केल्याने आज कोणताही आशय व्यक्त करण्यास ती समर्थ आहे. म्हणून ती जागतिक भाषा झाली. मात्र, मराठीचा किंवा मराठी बोलींचा विचार करताना आपण फार वेगळी भूमिका घेतो. खरे तर इतर भाषेतील शब्द आपल्या बोलीत येणे, रूढ होणे म्हणजे आपल्या बोलीच्या शब्दसाठ्यात भरच पडणे होय. हे आपल्या बोलीची श्रीमंती आणि अभिव्यक्तीच्या कक्षा रुंदावणे होय.

मराठीचा शब्दकोश पहा. शब्दाच्या लगत त्याचे लिंग, व्याकरणिक स्थिती दाखविल्यानंतर तो शब्द कोणत्या भाषेतून आला ते दिले जाते. ते पाहिले तर असे आढळते की काही मोजके देशी शब्द सोडल्यास अरबीतून, काही फारसीतून तर काही संस्कृतमधून आलेले दिसतात.

खरे म्हणजे भाषेत नवीन शब्द रूढ होणे म्हणजे एखादी मुलगी सून म्हणून आपल्या घरी येण्यासारखे असते. माहेरपण विसरून सासरचा स्वीकार ती करते. तसेच शब्दांचे आहे. भाषेने तसेच करावे. इतर शब्दांचा स्वीकार करताना आपले सत्त्व, आपला मुखवटा, स्वभाव लोप पावू नये याकडे लक्ष द्यायला हवे.

इंग्रजी भाषेतील शब्दांचा आपण स्वीकार केला तर चालेल पण आपण नुसते शब्द स्वीकारत नाही तर मुद्दाम संपूर्ण इंग्रजी भाषा स्वीकारत आहो. म्हणून मराठीची जास्त चिंता वाटत आहे.

बोलींच्या संवर्धनाची गरज :

मराठी बोलीतून सर्व भावनांची अभिव्यक्ती होते. रागालोभापासून ते रतीपर्यंत सर्व भावनांची अचूक अभिव्यक्ती आपल्या भाषेत होते. अत्यंत राग आला तर लगेच एखादी शिवी देऊन राग व्यक्त करता येतो. आपण इंग्रजीमध्ये, हिंदीमध्ये, मराठीमध्ये तसेच आपल्या बोलीतून कडाक्याचे भांडण करून पाहा. असे लक्षात येईल की, आपण भांडण हे आपल्या बोलीतच अधिक प्रभावी पद्धतीने ते करू शकतो.

विविधतेत सौंदर्य असते :

विविधतेत सौंदर्य असते. निसर्गाने तशी विविधता सांभाळली आहे. एक झाड दुसऱ्यासारखे नाही. एक फूल दुसऱ्यासारखे नाही. कितीही लोकसंख्या वाढली तरी एक माणूस हुबेहूब दुसऱ्या माणसासारखा होत नाही. तसेच भाषेच्या बाबतही आहे. दर बारा कोसांवर भाषा बदलते. एवढेच काय व्यक्ती-व्यक्तीत भाषिक बदल जाणवतो. जसे वेगवेगळे पदार्थ खाऊन आपण जिभेचे चोचले पुरवतो तसेच कानाचेही लाड पुरवितो. सगळीकडे इंग्रजीचा वापर होत राहिल्यास ही विविधता नष्ट होईल.

पूर्वी आणि आजही मनोरंजनाचे महत्त्वाचे साधन ठरलेले लोकवाङ्मय हे बोलीतच निर्माण होते. आजच्या यंत्रयुगात, दूरदर्शनच्या युगात लोकवाङ्मयाचे महत्त्व राहिले नाही असे आपण म्हणू शकत नाही. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या विविध कार्यक्रमात एक तरी कार्यक्रम हा लोकगीतांचा, लोककलांचा असतोच.

तसेच, लोकवाङ्मयाचे एक महत्त्व असे की, हे लोकवाङ्मय भाषेतील जुन्या शब्दांचे जतन करते.नवीन शब्दांचाही स्वीकार करते मात्र आपल्या स्वरूपात संपूर्ण

बदल होऊ देत नाही. भाषाभ्यासकांच्या दृष्टीनेही लोकवाङ्मयाचे जतन होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी ती भाषा जिवंत असणे आवश्यक आहे.

पारंपरिक व्यवसायाचे ज्ञान आपल्या बोलीतूनच एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते. या पारंपरिक व्यवसायांमध्ये शेती हा मुख्य व्यवसाय आहे. आजच्या यंत्रयुगातही शेती ही पारंपरिक पद्धतीनेच केली जाते. त्यामुळे बोली सोडून अन्य भाषेचा वापर करणे आजच्या स्थितीला तरी अयोग्य आहे. मातृभाषा हेच संस्कृतीचे वाहक आहे.

आपली मायबोली हे आपल्या संस्कृतीचे वाहक असते. याकरिता जनाबाईच्या अभंगातील एक उदाहरण देतो.

डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारी। जाईन मी।
हाती घेईन टाळी खांद्यावरी विणा ।
आतां मज मना कोण करी ।।
पंढरीच्या पेठें मांडियेलें पाल।
मनगटावर तेल। घाला तुम्ही।
जनी म्हणे देवा मी झालें येसवा ।
निघालें केसवा। घर तुझे ।।

या ओळीत आलेला आशय अन्य भाषांमधून व्यक्त होणे अवघड आहे. कारण स्त्रियांचा डोईचा पदर खांद्यावर येणे म्हणजे काय हे फक्त मराठी भाषिकांनाच समजते.

भाषाभ्यासक असे म्हणतात की, भाषा नष्ट झाली की संस्कृती नष्ट होते. मात्र, याचा अधिक विचार केला तर असे लक्षात येईल की कोणतेही भाषिक चिन्ह तेव्हाच नष्ट होते जेव्हा त्याचा आशय वापरातून नाहीसा होतो, अर्थसंकेत नाहीसा होतो. उदाहरणार्थ आज कवेलूची घरे नष्ट होत आहेत म्हणून खापर, खापरखुंडी, वसरी, उंबरठा, वयचन, वयनाट असे शब्द लोप पावत आहेत. हे अर्थसंकेत कायम राहिले तर ते भाषिकांना व्यक्त करण्यासाठी भाषिक चिन्हांचा वापर करावाच लागतो. तसेच संस्कृतीचे आहे. ती नष्ट झाली की तिच्याशी संबंधित अर्थसंकेत नष्ट होतील मग भाषिक चिन्हे नष्ट होतील. आजतरी आपली संस्कृती कायम आहे, चालीरीती कायम आहेत, पारंपरिक व्यवसाय कायम आहेत त्यामुळे सांस्कृतिक, भाषिक संकराची एक विचित्र स्थिती निर्माण झाल्याचे जाणवते.

• • •

▪ **डॉ. रावसाहेब मुरलीधर काळे,** मु. लोणी, पो. रिधोरा, ता. बाळापूर, जि. अकोला-४४४३०२


साभार-पोच

- **युगमुद्रा** (कवितासंग्रह), यशवंत मनोहर, सायन पब्लिकेशन्स, पुणे, २०१६, मूल्य १८० रु.
- **या वेशीपासून त्या वेशीपर्यंत** (कवितासंग्रह), इंद्रजीत घुले, सई प्रकाशन, मुंबई, २०१४, मूल्य १०० रु.
- **बालाघाटची गाणी** (बालकविता), सय्यद अल्लाउद्दीन , इसाप प्रकाशन, नांदेड, २०१६, मूल्य ५० रु.
- **मन्हा गावले** (अहिराणी बालकवितासंग्रह), आबा गोविंदा महाजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१६ मूल्य : १२० रु.
- **केंद्र हरवत चाललेल्या वर्तुळाचा परिघ** (कवितासंग्रह), सुनील अभिमान अवचार, निर्मिती संवाद, कोल्हापूर, २०१६, मूल्य ४०० रु.
- **सोलमेट** (कादंबरी), अर्चना गाडेकर शंभरकर, ग्रंथाली, मुंबई, २०१६, मूल्य १५० रु.
- **चेहरे आणि मुखवटे** (एकांकिका संग्रह), डॉ. ईश्वर नंदपुरे, पायगुण प्रकाशन, अमरावती, २०१६, मूल्य १४० रु.
- **आशय** (त्रैमासिक), संपादक डॉ. संजीवनी तडेगावकर, जालना, ऑनोडि, २०१६.
- **सुवार्ता** (मासिक), संपादक फादर रेमंड परेरा, जीवनदर्शन केंद्र, वसई, डिसेंबर, २०१६

अनुक्रमणिका

कविता

तीन कविता : प्रशांत असनारे



१ : दंगल

मागची दंगल मी पेटवली होती.
आता तुझी पाळी आहे.

त्या दंगलीत मिळालेला टी. व्ही.
मी तुला दिला होता.
आता माझी पाळी आहे.

मी पाहून ठेवलंय
दुकान आणि मॉडेल...
तुझ्याजवळच्या दगडांची
काय पोझिशन आहे?

तुला जमेल का
शिवजयंती किंवा मोहरमच्यानंतर
ही दंगल मॅनेज करणं?
पहा ना प्रयत्न करून...
तेव्हा खूप सोपं जातं ते.

वाटल्यास पायरीवर टाकायला
शेण मी तुला आणून देतो
गुलालाचं काय...
तो तर कुठेही मिळतो.

तू फक्त पेटवून दे.
भडकवण्याची बाकी गणितं
मला चांगली ठाऊक आहेत.

फक्त हे सगळं करताना
माझ्या टी. व्ही.चं तेवढं लक्षात ठेव.

मुलांना कबूल केलंय
बाकी काही नाही.

•••

अनुक्रमणिका

२ : ए SSS

ए SSS बहिरे,
अलार्म वाजतोय
उठ आता.

ए SSS मूर्ख,
मला चहा दे
मी केव्हाचा उठलोय.

ए SSS बावळट,
गरम पाणी काढ लवकर
मला अंघोळ करायची आहे.

ए SSS बिनडोक,
मला जेवायला वाढ
ऑफिसला उशीर होतोय.

ए SSS वेडपट,
रात्री मला घरी यायला उशीर होईल
तू जेऊन घे!

ए SSS वेंधळे,
दार उघड
मी आलोय घरी.

ए SSS डार्लिंग SSS
लाईट बंद कर
अन् ये झोपायला !

•••

३ : गिरकी

रंगमंचावर
स्पॉटलाईटच्या प्रखर प्रकाशात
ती कधीची नाचतेय
बेधुंद होऊन.

हॉलमधल्या अंधारात
आम्ही खुर्च्यांशी जखडलेलो
कधीचे न्याहाळतोय
नाचताना
गिरकी घेताना
तिची उघडी पडणारी गोरीपान मांडी.

पडदा पडतो.
ती तृप्त.
घरी जाते,
आनंदानं गिरकी घेत घेत.

आम्हीही तृप्त
घरी जातो
गिरकी घेत घेत...
गिरकीतली गोरी मांडी घेत घेत...!

•••

▪ प्रशांत असनारे, 'अभिनंदन', मुकर्जी बंगल्याजवळ, राऊतवाडी, अकोला, भ्रमणभाष : ९७६३७१४३०४

अनुक्रमणिका

हे ईश्वरा... माझे दिवस मला परत कर! : संजय चौधरी

•

फारच मजेत गेले माझे तेव्हाचे दिवस
जेव्हा मला बोलता येत नसे


बोलण्यानेच तर करून ठेवलीय सगळी पंचाईत
आता वाटते उगाचच शिकलो उच्चार
नि समजावून घेतले त्यांचे जीवघेणे अर्थ

तिसरंच काहीतरी बोलत राहावं लागतं
आपल्या माणसाशी सुद्धा
जे बोलायचं असतं त्याच्याशी
ते घेऊन यावं लागतं आपल्या सोबत लपवून
त्याच्याकडून निघताना

परतता येईल का मला
माझ्या मुक्या दिवसात ?

हे ईश्वरा...
माझे मुके दिवस मला परत कर!

• • •



•

मुका नाहीये मी
बोलण्याची
इच्छाच गेलीय मरून

बोलायला गेलो
तर ...
हुंदकाच फुटेल
या भीतीनं
ओठ गच्च आवळून
धरले आहेत

बोलावं की बोलूच नये
या मोठ्याच पेचात सापडलो आहे मी

जीभ कडू होत गेली
... माणसागणिक

• • •

अनुक्रमणिका

•

असे कितीतरी शब्द आहेत
जे मी उच्चारू शकलो नाही
कितीतरी असेही
जे मला उच्चारू दिले गेले नाहीत

शब्दांकडेच राहावे लागले वेठबिगार
जीभ शब्दांकडेच आजन्म गहाण
मेंदूत इथून तिथून शब्दच गच्च भरलेले
सारे जगणे शब्दांनी ताब्यात घेतलेले

शब्दांनो!
आता मला माफ करा
थोडं एकट्याला... माझं मला जगू द्या
मला होऊ द्या
झाड, पक्षी, आकाश, डोंगर, समुद्र, तारे, वारे
आणि जगू द्या थोडं निःशब्द

मी आता माझ्या श्वासांसोबत राहू इच्छितो
... शब्दांनो!

• • •

•

पूर्वी मी
मला जे हवे ते बोलत असे
नंतर नंतर मी
लोकांना आवडेल असे बोलू लागलो
आता
कितीतरी दिवसात मी ते बोललोच नाही
जे मला बोलायचे होते

मला काय बोलायचे
हे आता पूर्ण विसरून गेलोय मी

अलीकडे माझ्या लक्षात आलंय
बऱ्याचदा मी बोलतो वेगळंच काहीतरी
जे मला बोलायचंच नसतं

गप्प बसल्याने तुझं भलं होईल
असे सांगून सांगून थकून गेलेत
माझं भलं होऊ इच्छिणारे लोक

मिलॉर्ड...
इथून पुढे
मी जे काही बोलेन

• • •

▪ **संजय चौधरी,** ए-९, विश्वास अपार्टमेंट, रामभाऊ म्हाळगी मार्ग, मंगला हायस्कूल मागे, ठाणे, (पूर्व) ४००६०३

तीन कविता : कविता ननवरे

१. परंतु तरीही...

बाकी किती राहील...?
याचा विचार न करता
होता होईल तेवढे
सगळे हिशेब पूर्ण केले.


कपाळ, गळा, हात आणि पायांच्या बोटांवरचं
आजपर्यंत मुश्किलीनं पेलवलेलं
त्याच्या नावाचं मणामणाचं ओझं
उतरवून कुलूपबंद केलं.

तोडता येतील तेवढे
सगळे पाश तोडले
मोडता येतील तेवढे
सगळे डाव मोडले.

विरलेल्या स्वप्नांची लक्तरं
वेशीवर फेकून दिली
नव्या स्वप्नांची नवी रेशीमवस्त्रे
परिधान केली.

फुलपाखराहूनही हलकी हलकी होऊन
आताशा मनाप्रमाणे मनसोक्त
आभाळभर बागडते आहे ती.

परंतु तरीही
आजही एकांतात तळहातावर
त्याचं नाव
पुन्हा पुन्हा गिरवते आहे ती...!
• • •



अनुक्रमणिका

२. उन्हाच्या तुकड्यात सावल्यांची घरं

अंधाराच्या सावल्यांनी बांधलीयत घरं
दारांतून खिडक्यांतून येऊन
घरभर पसरलेल्या
उन्हाच्या असंख्य तुकड्यात

उन्ह कलली की
नामशेष होतील घरं
हे माहीत नाही जराही
आपल्याच तालात फेर धरून नाचणाऱ्या

अंधाराच्या सावल्यांना
त्या सजवताहेत आपापली घरं
काढताहेत अंगणभर रांगोळ्या
विसरल्या आहेत आपला उगम आणि अस्तही

घर सजवून, रांगोळ्या रंगवून पूर्ण व्हायच्या आत
मी गच्च लावून घेणारेय
सगळ्या दारं खिडक्या
लागलीच पडदेही ओढून घेणारेय
त्यांच्या फटींतून
पुन्हा एखादा उन्हाचा तुकडा येऊ नये म्हणून

फार काही होणार नाही
थोडे लागतील शिव्याशाप
अंधाराच्या सावल्यांचे
अन् थोडे उन्हाच्या तुकड्यांचेही.

• • •

▪ **कविता विठ्ठल ननवरे,** मु. + पो. बी. बी. दारफळ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - ४१३२२२

अनुक्रमणिका



। कथा

पाड

■ वसंत वाहोकार

राजुसामामी बाहेर ओट्यावरच बसून होती. नलूची वाट पाहात. आता पाच तर वाजून गेले. सव्वापाच, साडेपाच होतील. शाळा सुटेल आणि नलू घरी येईल. आता ती घरात नाही. हा एवढा मोठा वाडा. पण सुना वाटतो. नलू नाही म्हणून. कोणी गडी माणूस नाही, कामावरची बाई नाही. एकट्या आपण. नलू येईपर्यंत कोणीतरी यावं, बोलता तरी येईल. इकडचं तिकडचं.

तेवढ्यात खांद्यावर मोठा झारा घेऊन भुरा परदेशी आलाच. राजुसाला पाहून त्यानं हातातली बिडी फेकली. पायाखालती चुरगाळली, मग राजुसाकडे डोळे मिचकावत म्हणाला, 'क्यों? खालीपिली बैठी है रे, कोई आ रहाँ है क्या?'

राजुसनं पानाची पिंक हाणली त्याच्या दिशेनं... गाल फाकवत म्हणाली 'हौ. येऊन राह्यला ना माझ्यावाल्या भैनीचा यार? तुले काऊन रे पंचाईत घमिल्या?'

'लो साला! बुड्डी हो गई जिधर उधर से! लेकिन काटा तो अभी भी... सीधी बात करेंगीही नही ये जय भवानी! खतरनाक जवानी!'

तेवढ्यात भुऱ्याच्या बायकोची आरोळी दणाणलीच, 'बरतन पडे है मांजने के... चुल्हा जलानेका है आज्जून... और ये आदमी? औ साधों... चलो अंदर आ जावो! बैठे फल्ल्या झडाते... उस...' आणि वाक्य तोडत तिनं जीभ चावलीच.

भुऱ्याच्या बायकोचा, कस्तुरीचा रोख राजुसावर होता. खरंतर राजुसा घरमालकीण. सुखवस्तू. परंतु पन्नाशीच्या वयात ती चळली. भुऱ्या तिचा भाडेकरी. मागच्या दोन अडीच खोल्यामध्ये त्याचा संसार. लालबुंद, मजबूत, तगडा, तीन पोरीचा बाप. खरं तर राजुसानं असं वागू नये. पण लालसा आणि वासना दोन्ही जिंकणं कठीण-महाकठीण. राजुसाच्या जाळ्यात भुऱ्या अडकला. दमेकरी-वाकलेल्या पंढरीबापूची बायको राजुसा आणि काळीकच्च भिल्लीण दाणगट कस्तुरीचा नवरा भुऱ्या दोघांचं कधी आणि कसं जुळून आलं, ते लक्षातही आलं नाही.

बायकोच्या आरोळीवर भुऱ्या पळाला. मग राजुसा तिथून उठली. घरात आली. चहाचं आंधण टाकलं चुलीवर. नलू शाळेतून आली की तिला चहा लागतो.

सव्वापाच-साडेपाच केव्हाच वाजून गेले. घंटा झाली होती केव्हाच शाळेची. आता तर रानातली गाई-वासरं देखील परत आलेली आणि अजून नलूचा पत्ता नाही. तिनं पुन्हा एकदा घरदार केलं. चहा बनला होता. स्वतः घेतला आणि भांडं झाकून ठेवणार तेवढ्यात नलूचा विळखा तिच्या कमरेला पडलाच, 'मामी!'

राजुसानं तिच्याकडे पाहिलं... 'आधी सोड बरं मले. दूर हट घोडे. लहान आहेस का वं तू आता... सरक तिकडे...' मग तिच्या उशिराचं लक्षात येताच राजुसा पुन्हा ओरडली - 'कुठीसाक

अनुक्रमणिका

होती वं इतका वेळ... कुठीसाक? झाल पड्याले आली... नायं पोट्टे! होती कुठीसा तू... कसं व्हईल अशानं माय तुव्हं! आता आठवीत जाशील पुढल्या वर्षी... कुठीसाक व्हती वं पोट्टे?'

'अवं तं मामी!' असं म्हणत नलूनं दम चोरला आणि थांबली. मामीकडे न पाहता खाली मान घालून. 'बोल नं वं! सिन्नाले! दातखिळी बसली का वं तुही!' होती कुठी तू...' राजुसाचा स्वर चढलाच.

वर माडीवरून पंढरीबापूचा खोकल्याचा आवाज येत होता.

'शाळेत नाटक बसवून राह्यले ना... तं त्याची प्राक्टीस होती. माहा पन पात्र हाये त्या नाटकात!'

'काय? आन् कोनाले इच्यारून केला शानपना? आन कोन्ता व्हय तो मास्तर... तंबाख्या बुहारा तं...!'

'डिगांबर गुर्जी! त्याहीनंच घेतलं मले त्या नाटकात...!'

'आत्ता माय! तो? सतरा पान्याचा! मास्तरडा! त्याले म्हना दूरून बोल गोचिडा... आंगाले हात लाव्याचं काम नाई लेकराच्या!'

मग ती नलूला म्हणाली 'जाय चहा ठेवला तो घे गरम करून फुलपात्रात... मामालेबी निवून दे माडीवर... आन् हो! सांगून ठेवतो त्या मास्तराशी जास्त खेटू नको! मोठा धड हाये तो सतरा पान्याचा! माहीत हाये तो बी मले...!'

आता भुन्या राहतो त्या घरात कधीतरी डिगांबर गुरुर्जीचाही संसार होता दोन वर्षे. मग ते सासऱ्याच्या घरीच राहायला गेले.

• • •

अभ्यास करता करता मधूनच नलू उठली. मामीचं तिकडचं स्वयंपाकाचं आटोपलं होतं. त्यांना म्हणाली तशीच उम्ब्यानेच.

'वही आण्याची आहे मामी, कमलाची... गणिताची वही... आण्याले जाते मी...' नलू विचारत होती.

'आता? इतक्या राती? आताच गणित अडलं काय वं तुह्यावालं? आता ते पोट्टंबी अशील घरीच... अशील ना, मंग? तू बस अथीसाक! मीच देतो आणून ते वही न फही!'

'मामी! तेव्हड्यासाठी तू काहले जातं वं... तुलेही मोठीच...!'

'बरं जाय तू! आण ते वही फही... पन सांगून ठेवतो, कमलीच्या घरी थांबाचं नाही... त्या पोट्ट्याशी शब्द बी बोल्याचा नाई! जाय! ये झपक्यानं... गेली तशी आली...'

'कायंच करा बापा! या बाईचं! निरा मान्साले कुलपातच ठेवते जशी! इची सग्गी पोरगी असती तं मंग? समजलं असतं इले... मी हावो ना!'

नलू धुसफुसतच बाहेर पडली.

कमली स्वयंपाकघरात होती. सुरेशनं नलूला आलेलं पाहिलं आणि आत बहिणीला हाक मारली.

'कमले! नली आली वं... बाहीर ये...!'

नलू तिथे न थांबता सरळ घरात कमलीकडे निघून गेली. कमली समोर आली. दोघी तिथेच बोलत बसल्या. नलूला तिथून ओट्यावर बसलेला सुरेश दिसत होता. कमलीशी बोलतानाही तिचं लक्ष तिकडेच होतं.

कमलीनं तिला वही आणून दिली. मग नलू कमलीला म्हणाली 'निघते बाई आता. अथीसाक बसली ना तं मामीच यील धावतपळत... जसं कायी मले झपाटूनच टाकते तुहा भाऊ!'

'नाई वं तसा नाई बरं सुर्शा... लै शायनं पोरगं हाये बापा ते. लोफ्फर पोट्टं नाई बाई माह्यावला भाऊ... बरं निघं तू आता!'

मग नलू बाहेर पडली. सुरेश ओट्यावरून उतरून समोर अंगणात फेऱ्या मारत होता. नलू तिथून शेजारून निघाली तसा तो तिलाच म्हणाला 'कावून वं... निघाली का? जेवूनच जाचं होतं ना आली तशी...'

नलूनं मान वाकडी केली. जीभ काढून त्याला वेडावत निघून गेली. घरातून कमली आवाज देत होती, 'दादा! ये नं रे... ये बरं!'

• • •

सकाळी अभ्यासाला बसली तेव्हा नलूनं इंग्रजीची वही उघडली. काल विक्रम गुरुर्जीनी तपासलेल्या वह्या वर्गात परत केल्या. तेव्हा नलूनं ती वही तशीच ठेवून दप्तरात घातली होती. आता तिनं ती सहज उघडली. गुरुर्जीनी Scen म्हणून तिथे सही केली होती. तारीख लिहिली होती. तिथेच एक छोटीशी चिठ्ठी होती. धडधडत्या छातीनं तिनं ती चिटोरा-चिठ्ठी उघडली... आणि त्या दोन ओळी वाचल्या. तिच्या तोंडाला-घशाला कोरड पडली जणू. ती थरथरली. त्या चिटोऱ्यात -

'तुम्हें और क्या दूं मै, दिलके सिवाय?
तू तो प्यार हो मेरा!'

असं हिंदीत लिहिलं होतं. ते अक्षर तिच्या ओळखीचं होतं. विक्रम गुरुजींचं. ते इंग्रजी आणि हिंदी दोन्ही विषय शिकवत होते. त्यांचं हिंदी अक्षर तिला माहीत होतं आणि हे त्यांचंच अक्षर तिनं ओळखलं. तिच्या अंगाचं पाणी पाणी झालं. तिनं ती चिठ्ठी फाडली नाही. व्यवस्थित एका डब्यात ठेवली, तिच्या सामानात. विक्रम गुरुजी तिच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. ही गोष्ट आता कोणाला सांगावी का? तिच्या मनात आलं.

'झाला अशील ना वं पोट्टे अभ्यास! झाला अशील! ये खाली आता. मॅड होशील ना एव्हडा अभ्यास करशील तं!'

राजुसामामी स्वयंपाकघरातून निघून मागच्या अंगणात तुळशीला पाणी घालत होती आणि भुरा परदेशी विहिरीवर बसून राजुसाला निरखित होता. नलू उतरत असताना त्यानंही आपला आवाज वाढवला 'ए नलिनी! अरे मामी बुला रही है आ, निचे आ रे!'

तेव्हा राजुसा एकदम खेकसलीच त्याच्यावर 'तू क्या कर रहां रे घमिल्या यहाँ पे बैठके! जा पिछेका गोबर उठाले... तेरी कढई बोंबल रही होंगी उधर! जा तू घमिल्या!' आणि तिनं नलूला दरडावलं. 'जाय वं पोट्टे... जाय घरात...'

भुरा एकदम चरफडला... 'ये स्साली!' म्हणून त्यानं एक सणसणीत शिवी घातली... आणि एवढंच बोलला, 'जब तो बडा 'गुलाब गुलाब' बोलके... तेरी तो...!'

नलूनं घरात वळता वळता एकदा मागे पाहून घेतलं. भुरा परदेसी मामीला काहीतरी इशारा करीत होता ते. ती चिठ्ठी रे बापा! माय वं!

काळ्या मारोतीच्या देवळात कीर्तन रंगात आलं होतं. बहुतेक बाया-माणसं तिकडेच असावीत. गल्लीत सामसूम होती. नलू अभ्यास संपवून, लाईट बंद करून झोपली होती. किती वेळ झाला अंदाज नव्हता. मात्र गलबला झाला तशी नलू धडपडून उठली. लाईट लावून समोर गेली.

'चोर! चोर!' असा गलबला सुरू होता आणि दोन चार पोट्टे इकडून तिकडे धावत होते.

एवढा गलबला सुरू होता तरी राजुसामामी डोक्याला कापड बांधून अंगावर घट्ट पांघरून घेऊन झोपलीच होती.

चोर मात्र कोणाच्याही हाती सापडला नाही.

तेवढ्यात मागच्या गल्लीतल्या बेपटीतून भुऱ्याच स्वतः समोर आला आणि शहाजोगपणे विचारू लागला,

'कहां है बे चोर? किसने देखा चोरको... बेफजूल चिल्ला रहे आधी रातको...' त्याला सुख्यानं ठामठोम जबाब दिला.

'कई तं येईन ना बे सायाचा अळ्सङ्यात. आता निसटला म्हना भाळखाव! जरा संभाळूनच रायजो...!' भुऱ्या परदेस्यानं बिडी पेटवली. ठसक्यात बिडी ओढत बसला कामठ्यावर. कस्तुरीचं, त्याच्या बायकोचं तोंड आडवंतिडवं सुरूच होतं. तेवढ्यात तिला नलूच दिसली.

''क्यों रे छोरी! तू जाग रई इतनी रात गये! और वो तेरी मामी... कहां है वो सुवर्णसुंदरी?''

राजुसा आणि कस्तूरी दोघींमधे सततचं शीतयुद्ध, नलू काय बोलणार होती. ती घरात निघून गेली. गर्दी पांगली. राजुसामामीच्या अंगावर जाडजूड रजई होती.

कीर्तनातली माणसं घरी परतत होती. त्यांनाही रस्त्यात समजलं... 'इकडच्या गल्लीत चोर आला होता म्हणून.'

सगळी सामसूम झाली तरी वर पंढरीबापूच्या खोकल्याचा आवाज काही थांबला नाही.

तेवढ्यात शंकऱ्या आला कुठूनतरी भेलकांडत आणि त्यानं डरकाळ्या फोडणं सुरू केलं. गर्दी पांगली होती, माणसं घरी गेली होती. ती शांतता ओरबाडून टाकत शंकऱ्याच्या अश्लील, बीभत्स शिव्या आणि चोराच्या नावानं शिमगा सुरूच होता. कस्तुरीला ते झोंबलं असावं म्हणून ती घर बंद करता करता तरतरा चालत आली. शंकऱ्याला अडवत म्हणाली - 'शंकर! तू गाली क्यो बक रहा दादा! मां बहनकी गाली. सबकी माँ बैन रहेती. अब वो चोर तो गया निकलके... वो क्या सून रहा होगा, हां! बता ना दादा, बता मेरे कूं!'

शंकर राजुसामामीचा सावत्र मुलगा. पंढरीबापूंच्या पहिल्या बायकोची संतान... स्वतंत्र राहतो तो बायको मुलांसह. त्याचंही कधी राजुसाशी पटलं नाही, पटत नाही. मग तो कस्तुरीवरच उखडला... 'वो क्या चोर... धेले पैसेका चोर नई वो... वो कमिना है... कमिना... मै सब जानता हूँ... एखाद्या दिवशी तो येतेच माझ्या झपाट्यात... घेतो मंग त्याची मायभैन... '

'जा बापा! जा तू! जा अपने घरकू... सब सो रहे होंगे तो!' ती शंकऱ्याला म्हणाली.

अनुक्रमणिका

वरून गॅलरीत पंढरीबापूची दम्याची हाक कानी पडली.

ते शंकऱ्याला म्हणत होते.

'शंकर! जाय नं दादा घरी... जाय... रायलंसुयलं आता उद्या सक्काळी बोलशील... जाय रे आता!'

शंकऱ्यानं बापाचं ऐकलं. तिथेच बिडी पेटवली बापासमोरच, आणि पाठमोरा झाला.

• • •

नलू सकाळी चहा घेऊन मागच्या खोलीत गेली तर मामी झोपूनच होती. नलूनं आवाज दिला. एकदा, दोनदा... तशी उठली. दिवस बराच वर आला होता. उठून तिनं आळोखेपिळोखे दिले आणि, कोपऱ्यातल्या टाक्यातील पाण्यानं गुळण्या केल्या. तसाच अधाशीपणानं चहाचा वाफाळला कप ओठांना लावला.

'बरं वाटलं माय चहानं बरं... नाई तं तोंड सगळं कडूजर झालं होतं वं... आंगात ताप होता माया रातभर... बाई! आता तू तेव्हळं सैपाकाचंबी पाहूनच घे बाई... माह्याच्यानं नाई व्हनार बापा रांधनंफांदनं... ढिल्लीच पडली माय मी तं...!'

नलू नुसती उभीच होती. तिला उगीचच हसायलाही येत होतं. ती मानभावीपणेच म्हणाली -

'मामी तुले उठोलं नाई राती आमी. चोरच आला व्हता वं आपल्या वाड्यावर... सगळ्या गल्लीभर बोंबाबोंब झाली ना आपल्या त्या चोराची... शंकरदादा किती शिव्या देत होता मामी!'


'येवो लेकाचा चोर येवो नाई तं डाकू येवो... आपला जीव आपल्याले भारी! काय करतं... तू नोको डोक्सं खराब करून घिवू... जाय लवकर रांधनाचं पाय बाई!'

नलूनं तिथून काढता पाय घेतला. तिला उगीच विक्रम गुरुजीची चिठ्ठी आठवली.

नलू स्वयंपाकघरात असतानाच कमलाचा भाऊ सुरेश आला आणि त्यानं मोठ्यानं हाक मारली. 'ओ! नलिनी!'

ती तशीच बाहेर आली. ओसरीत सुरेश उभा होता.

'कारे सुरेस? काय झालं रे, काऊन आल्ला तू... काय झालं?' तेवढ्यात राजुसामामीच स्वतः मधल्या दारात -



'नले काय हाये वं, कोन हाये?'

सुरेश मधेच बोलून गेला... 'मीच हाये आत्या सुरेश...'

'मंग नलीसंग काय काम पडलं रे तुले... आला म्होटा!'

'गनिताची वही वापस न्याची हाये कमलीची... कमलीचं जमत नाई शाळेत जानं... ते सांग्याले आल्तो ना आत्या!'

नलूनं वही त्याच्यासमोर धरली. त्यानं ती हातात घेतली. नलू बोलणार होती काहीतरी पण ती एवढंच म्हणाली त्याला... 'सांगील मी मास्तरले... सांगील... वही दे आठोनीनं कमलीले!' सुरेश हिरमुसून निघून गेला.

तीन वाजताचा पिरेड विक्रम गुरुजीचा होता. त्यांनी वर्गात फेरी मारली. मग नलूच्या टेबलाजवळ टेकून उभे राहात तिलाच विचारलं, 'कुठे गेली तुमची फ्रेंड! नलिनी खाडे?'

'तिची तब्येत बरी नाही... गुर्जी... निरोप पाठवला आहे तिनं...'

'कालची वही नेली ना घरी! उघडून तरी पाह्यली का... स्पेलिंग मिस्टेक किती आहेत. पाह्यल्या तरी का?'

नलूनं मान वर केली. विक्रमच्या नजरेला नजर भिडवली. 'पाह्यली ना गुर्जी वही!' ती सहज बोलून बसली.

'मग?'

तिनं मान खाली घातली. विक्रम गुरुजी पुढे निगाले, निघताना म्हणाले, 'अक्षराकडे लक्ष दे ना तू नलिनी...'

त्यांनी कोणतं अत्तर लावलं होतं की काय, पण ते उभे असताना एक धुंद गंध तिथे दरवळत होता. ते समोर निघून गेले... गंध तसाच मागे ठेऊन.

नलू पुन्हा एकदा शहारली. तशी शेजारची सुशी तिला कोपरात ठोसत म्हणाली...

'अक्षर सुधरून घे नं नले! टिवशनच लाव नं मास्तरची... जावावं सात वाजता त्याच्याच घरी... जवळच तं रायतो तो!'

मग तो पिरेड तिथेच संपला. वर्ग पुन्हा एकदा उधळला.

तेवढ्यात डांगे चपराशी वर्गात शिरला आणि त्यानं फर्मान सोडलं 'जोंधळे गुर्जीनं बलावलं रे बावा! नाटकावाले जे हायेत ते या बावा... लवकर या... लौकर!'

नाटकात भाग घेतलेले जेवढे त्या वर्गात होते तेवढे मोठ्या उत्साहात निघून गेले. नलू मात्र मागेच रेंगाळली. थोड्या वेळानं डांगे पुन्हा त्या वर्गात आला. नलूकडे पाहात म्हणाला 'ओ खाडे! चाला ना बापा! आता का पालखी आणू का, च्या भैन न्यासाठी...'

'मी येत नाही. माझं जमत नाही... सांगा तुमी तसं त्या गुर्जीले!'

'हे तं लेक बेजाच झाली. मंग आंदीच नाई का सांगाव तसं!'

'सांगतलं होतं ना! ऐकलं नाई गुर्जीनं.!' ती कातावून बोलली.

थोड्या वेळात स्वतः डिगांबर गुरुजीचं आले. नलू दोन्ही हातामधे डोकं दाबून बसली होती. त्यांनी तिच्या डोक्यावर हात ठेवत विचारलं, 'काय गं नलिनी! काय झालं? तुला बरं नाही का?'

नलूनं मान वर केली. डिगांबर गुरुजींचा हात आता तिच्या खांद्यावर होता. त्याचा दाब जाणवला तसा नलूनं तो स्वतःच बाजूला केला, म्हणाली 'नाही... बरं नाही वाटत, डोकं दुखत आहे'

'ऑफिसात ये मग! गोळी देतो त्यासाठी उठ. चल लौकर,' ती उठून त्यांच्या मागोमाग गेली. तिथे एका कपाटात मुलांसाठी म्हणून गरजेची थोडीफार औषधं होती. गुरुजींनी एक गोल जाड गोळी तिच्या हातावर ठेवली 'घे लगेच पाण्यासोबत' नलूनं ती गोळी पाण्यासोबत घेतली. गुरुजी म्हणाले -

'चला! आता नाटकाची प्रॅक्टीस... रेडी?'

'नाही गुरुजी! आम्ही नाही...'

'काय? काय नाही? का नाही... का?'

'मामी नाही म्हणते...'

'ते मी पाहून घेतो. तू चल प्रॅक्टीसला'

गुरुजींनी नलूचा हात हाती घेतला. तेवढ्यात विक्रम गुरुजी आले. मग नलूला उद्देशून म्हणाले, 'जा जा... नाटक छान झालं पाहिजे ना, जा'

गुरुजींनी नलूचा हात हातातून सोडवला. विक्रमला म्हणाले - 'घोर आहे गुर्जी लेकाचा! फार झेलावं लागते या पोट्ट्याइले...! तुमचं बर बावा... या झमेल्यात तुम्ही तं बावा नाही... सुटले राजे हो!'

'द्या ना मंग माह्याकडे... देता? झेलतही नाही ना सोडतही नाही. जमवून दाखवतो का नाही. ते पाहाच

अनुक्रमणिका

गुर्जी!'

'काय जमोता बावा! काय काय जमवसाल बावा तुमी... तुमचा काही नेम नाही... जवान गडी एकदम...' विक्रम गुर्जी समजून गेले.

नलू प्रॅक्टीसच्या खोलीत निघून गेली होतीच.

• • •

डिगांबर गुरुजी सारखे अंगचटीला येत होते. नाटकातला रोल समजावून देण्याच्या निमित्तानं. इतर मुलींच्याही तो एकूणच प्रकार लक्षात आला होताच. आता यातून सुटायचं कसं हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला होता.

कात्रेबाईच्या कानावर ही गोष्ट गेली होती. त्यांनी त्या मुलींना बोलावून घेतलं - म्हणाल्या, 'तुमची प्रॅक्टीस असेल तेव्हा मला बोलावून घ्यायचं... मी थांबेल तिथे... हेड गुरुर्जींना पण मी सांगितलं तसं! ते म्हणाले अवश्य... मी सगळ्यांना सिनियर आहे गं पोट्ट्याय हो!'

ती कुणकुण डिगांबर गुरुर्जींनाही लागली असेल. दोन दिवस कात्रेबाई तालमीला हजर होत्या, तेव्हा ते शांत होते... मात्र तिसऱ्या दिवशी त्यांनी हात वर केले. हेडगुरुर्जींनाच सांगितलं त्यांनी, 'मला हे शक्य नाही म्हणून...' त्यावर हेडगुरुजी काही बोलले नाहीत. मग कात्रेबाईच्या नजरेत प्रॅक्टीस सुरू झाली. मुली खुश झाल्या. त्यातही विक्रम गुरुजीही खुर्ची घेऊन कोपऱ्यात बसून राहू लागले. बसल्या जागेहून सूचना देऊ लागले.

कात्रेबाईच्या लक्षात आलं. सगळ्या पोरींपेक्षा या मास्तराला नलूमधे जरा अधिकच 'इंट्रेस' आहे. पण तो त्या मर्यादेत राहून. त्यामुळे त्या शांत होत्या.

मात्र,नलूला इंग्रजीच्या वहीत पुन्हा चिठ्ठी मिळाली... त्यात स्पष्टच लिहिलं होतं. 'आय लव्ह यू! घरी येऊन भेट...'

• • •

राजुसामामी माडीवर गॅलरीत बसून होती. बराच वेळ. तेव्हा कधीतरी तिचं लक्ष समोर पाराकडे गेलं. मंदिर आणि वडाचा पार. राजुसा दचकलीच.

नलू विक्रम गुरुर्जींशी बोलत होती. भर रस्त्यात आणि तेही पारावर. समोरासमोर.

राजुसाच्या कपाळाची नस तडकली. 'ही पोरगी म्हंजे ना जिवाले घोर झाला माय. एक तं लेकरू परक्याचं... एका पंखानं उणं... माय नसलेलं.... त्यात हे असं... घोरंच हाये ब्वा! कुठी कुठी लक्ष ठेवावं मान्सानं?'

तिला वाटलं ताडताड चालत जावं तिथवर, दोघांनाही खडसावं, जाब विचारावा, 'मास्तरला शोभते का असं, पोरीशी रस्त्यात उभं राहून बोलनं?' असं विक्रमला विचारावं... पण पुन्हा 'लोकं काय म्हनतील? रस्त्यात आपलाच तमाशा व्हईल. माय! आता यिवूच दे पोट्टी घरी! सांगतो तिले हिसोब पुरा!' ती मनात म्हणाली आणि नलू घरी येण्याची वाट पाहू लागली. ती खाली पायऱ्या उतरून येताना पंढरीबापूंनी हाक मारलीच, 'चहा नाई भेटला ना! पाठोजो बरं खाली गेल्यावर!' नलू धावतपळत आलीच. राजुसानं काही विचारण्याआधी स्वतःच म्हणाली 'मामी!' विक्रम गुर्जी आले होते ना पाराच्या दरशनाले... तं भेटले मले... म्हणत होते का पोरंपोरी येतात इंग्लिशच्या टिवशनले... तं तू बी येत जाय म्हणले... म्या म्हणलं त्याहीले की, मामा-मामीले इच्यारून सांगते गुर्जी!' राजुसामामी थोडी नरमली. म्हणाली डोक्यावर हात ठेवून. 'आपल्याले काहाले पायजे वं ते टिवशन फिवशन. पास झाली न वर्स निभावलं का झालं... त्याले म्हना येऊ दे कोनाचेबी पोट्टेपोट्ट्या... माहा काई जमत नाई... काय वं आलं ध्यानात...?'

त्यावर नलू गप्पगप्प राहिली. मग राजूसा वरतून म्हणाली 'हे पाय नले! चलवादे! अशी रस्त्यावर उभी राहून कोनाशीबी बोलत बसाचं नाई! लोक काई सुदे नसतात बैना! एकाचे दोन करतील... अंगार लावतील भलकशी! तुये इथीसा हाये कोन, मामा त ते तसे... आज हाये उद्या नाई... तू हायेस नयतूरणी... काय म्हणतो मी... काय म्हणतो, बोल नं...!'

नलू तणतणत घरात निघून गेली. 'हे करू नोको, तशी बसू नोको. याच्याशी बोलू नोको... त्याच्याकडे पाहू नको! जेलात टाकलं जसं मान्साले... तूल्हंच पाय नं वं... एखांद्या दिसी... तूच...!' ती स्वतःशीच धुसफुसत होती.

• • •

नाटक एकूणच छान झालं. जवळपासच्या सहा शाळांनी आपापली नाटकं सादर केली. पहिला क्रमांक

अनुक्रमणिका

निमकर्दा शाळेनं घेतला, दरवर्षीनुसार. दुसरा क्रमांक पारस शाळेला मिळाला. खरं तर तो नलूच्या शाळेच्या होता, पण पारसवाले तसे कारस्थानी, शिवाय गाव मुळातच नाटकांचं, त्यांनी ते जमवून घेतलं. आणि तिसऱ्या क्रमांकावर नलूच्या शाळेला समाधान मानावं लागलं. त्यातही अभिनयाचं दुसरं पारितोषिक नलूच्या पदरात पडलं. त्यावरही शाळेनं गावभर झेंडे फडकावले. शान मारली. अर्थातच् नलूचं होऊ नये एवढं कौतुक तर झालंच आणि तिच्याभोवती पोट्टेच नाहीतर गुर्जी लोकंही या ना त्या कारणानं लोणी लावू लागले. घिरट्या घालू लागले.

विक्रम गुरुजी मागे कसे राहणार? त्यांनी पिरीयडवर आल्या आल्या सगळ्यांसमोर नलूला समोर बोलावून घेतलं, आणि सगळ्या वर्गासमोर तिची तारीफ करीत तिला आपलं व्यक्तिगत बक्षीसही जाहीर केलं. गुलाबी गुळगुळीत कागदाचं, नवीन रंगीत बाँडबुक आणि एक स्टायलिश बॉलपेन तिथेच तिच्या हाती देत म्हणाले 'नलिनी खाडे माझी विद्यार्थिनी आहे याचा मला अभिमान वाटतो. तिनं केवळ इथेच न थांबता उत्तरोत्तर शैक्षणिक आणि कलात्मक प्रगती करावी अशी मनःपूर्वक शुभेच्छा देतो...'

सगळ्या वर्गानं टाळ्या वाजवून वर्ग डोक्यावर घेतला. मात्र, त्यांच्यात तिच्या आजूबाजूच्या चारही मुली नव्हत्या. त्या नुसत्याच टेबलावर हात ठेवून बसल्या होत्या.

'काय गं पोरींनो, तुम्हाला आनंद नाही का झाला?' असं विक्रम गुरुजींनी विचारलं, त्यावर त्यांनी तोंड फिरवलं.

• • •

सार्वजनिक गणपतीसमोर जुनाच सिनेमा सुरू होता. जवळपास सगळा गाव तिथे जमा झाला होता. नलूही होती आणि कमलीही. तिकडे मुलांमध्ये सुरेशही होता.

फार काही रात्र झाली नव्हती... अजून दहा वाजायचेच होते. पण ती खेड्यातली रात्र. मधे दोन दिवस पाऊस येऊन गेलेला. रस्त्यावरच्या दोन ट्युबलाईट तुटलेल्या... तिथे तर सतत अंधारच असे. सिनेमा सुरू असतानाच नलू कमलीला म्हणाली,

'आलीच मी पाच मिंटात कमला! तू बस!' म्हणून ती तिथून निघाली. पंचायतीच्या मागच्या भिंतीकडून, गल्लीतून जाताना भीत भीत चालली होती... मागे न पाहता. अंधारात नीट दिसलं नाही. पण तिची वाट अडली. थोराड, दणकट पुरुषाच्या विळख्यात ती सापडली. त्यानं तिला करकचून आवळली.

कशीबशी नलू किंचाळली... तिची आरोळी तशीच विरली... ती धावत सुटली. अंधारातून आलेला तो अंधारातच गायब झाला. कोण काय, कसं लक्षात येण्याआधीच ती वाड्याच्या मागच्या दारानं घरात शिरणार तेवढ्यात भुरा परदेसीच एकदम बाहेर पडला. त्याच मागच्या दारातून. मग तशीच कस्तुरीही धावत आली. तिच्या हातात मोठं दांडकूळ होतं. ती भुऱ्याच्या अंगावर धावून गेली. त्याला ठोकू लागली तिच्या तोंडाचा पट्टा सुरूच होता. 'तू नई सुधरेंगा सिनालके... घर में तीन तीन पोट्ट्या पड्या है... और तेरी ये जवानी, हरामी... उस रांड को भी नई छोडूंगी मै! इतनी अगन है उसमे तो सामने तो आ बोला...!' नेहमीसारखाच तिचा रोख राजुसावर होता.

ती दोघं भांडतच त्यांच्या घरात शिरताना नलूनं पाहिलं... त्यात ती आपलं विसरूनच गेली. मग ती तशीच पुन्हा समोरच्या दारानं घरात शिरली. राजुसामामी डोक्याला कापड बांधून आरामखुर्चीत विसावली होती. डोक्याच्या बामचा भपकारा खोलीभर जाणवला. नलूला वाटलं आता हिनं काही बोलू नये... विचारूही नये. आणि राजुसालाही वाटत होतं... तेच... तसंच.

मग रात्र संथ गतीनं पुढे पुढे सरकत राहिली.
आपल्यासोबतचा अंधार घेऊन...
डोळ्याला डोळा न लागू देणारी रात्र.

• • •

पण मग विचित्रच झालं. फारच विचित्र. तशी रात्र झाली... तसा अंधार झाला आणि तशा एकांतात तर नलू अस्वस्थ होऊ लागली. तिला तीव्रपणे वाटू लागलं. की आता 'ते' 'तसं' पुन्हा व्हावं. अंधारात कोणीतरी असं पुन्हा भेटावं.

तशातच मग विक्रम गुरुजी आठवून जात, समोर तेच उभे आहेत आणि...

ती हरवून जाऊ लागली. बिथरून जाऊ लागली. नाकपुड्या थरथरायला लागत. शरीराचं तापमान चढत आहे असं वाटत राही.

तिला 'विक्री' गुरुजीसमोर जाण्याची, उभं

राहण्याची, काही बोलण्याची भीती वाटत राहिली. ते प्रत्यक्ष समोर दिसले तरी, उजेडातही ती. संकोचून, आकुंचून जाऊ लागली.

सगळं अनपेक्षित आणि विचित्रच चाललं होतं. एकदा तर आरशासमोर ती एकटी, अर्धवस्त्रा, स्वतःतच हरवून गेली होती. देहाचे लाड सुरू होते.

तेवढ्यात राजुसामामीच मधल्या दारात येऊन उभी राहिली.

राजुसामामी निमूटपणे पाहत होती ते तारुण्य. कधीतरी तर... कधीतरी...

नलू आपल्याच नादात होती. दंग झालेली मश्गूल. राजुसा मागच्या पावली तशी परत फिरली. तिच्या मनात सावल्या थरथरू लागल्या.

• • •

दुपार उतरणीला लागली होती. राजुसामामी एकटीच झोपाळ्यावर बसली होती. मागेपुढे झुलत तेवढ्यात भुऱ्याची मोठी पोरगी तिच्यासमोर उभी राहिली.

राजुसानं झोपाळा थांबवला. विचारलं तिला.

'काय वं पोट्टे, कायले आल्ती वं अथीसाक... कायी काम हाये का वं तुयावालं... ओ पोरी?'

'हाव काकी... मेरी मा बुला रई है तुमारेकू... अब्बी के अब्बीच. राजुसाला जणू हीव भरलं त्याक्षणी. ती त्या पोरीला म्हणाली - 'जाय सांग तुया मायले... म्हना तूच ये मायावाल्या घरी... मी काहाले जावू वं कोणाच्या घरीफरी... सांग तिले...'

ती मुलगी आल्यापावली निघून गेली. मग ती कस्तुरी परदेसीन स्वतःच तरातरा चालत आली. झोपाळ्याच्या बाजूला पण समोर तिथलीच टपरी खुर्ची ओढून ऐटीत बसली. राजुसा काही बोलण्याआधीच ती म्हणाली -

'देख! तेरेकू नई कुच सरम ह्या... बुढ्ढी होइ गई पर तेरा, तेरा काटा नै ढिल्ला अब्बी बी... कोई लाज सरम नई बची तेरेमे... और वो हरामी... आदमी मेरा... वो बी वैसाच... सांडेकी औलाद... लेकिन मै तो समजती ना... लाज सरम है मेरे मे बची...!'

'हौ वं हौ! तू म्होटी सती सावत्री... सगळ्या गावाले हाये माईत... नोको सांगू मले शांपना...' राजुसानं तिला आडव्यात घेतलं. त्यावर ती म्हणाली-

'अबी हम जा रहे है यहाँसे... तेरा मकान खाली करके... जा रहे है उधर लंबा तेलीपुरे मे, मेऱ्या तीन तीन पोट्ट्या है बाई... छोकऱ्या जवान हो रह्या अबी... मेरेकू तो देखना पडेगा ना घरकी इज्जत, लाज सरम... यहाँ रहेके ये आदमी बरबाद हो जायेगा...!'

आता, कस्तुरी परदेसीन जरा हळवी आणि कातर झाली होती. म्हणूनच राजुसाही... तिला हे सगळं अनपेक्षित होत... तरी उसनं अवसान आणत ती परदेसीनला म्हणाली... 'जाती तो जा मायबाई... हम कायकू क्या तेरेकू रोक सकते... तेरी मरजी... आली तं जाशील बाई तू एक दिस...'

कस्तुरी काही बोलली नाही... बाहेर संथ सरकती दुपार होती आणि सावल्या कलू लागल्या होत्या. तशी गढूळ शांतताच होती. मग राजुसाच तिला म्हणाली... 'बस माय! मी चाहा ठेवतो तुयासाठी... जातं तं जाय... कधीही जाय बापा... पन चाहा धिवून तं जाय...!' आणि ती घरात निघून गेली.

राजुसाच्या घरचा चहा घेतला परदेसीनं आणि पानंही घेतलं... मग खुर्चीतून उठत म्हणाली -

'देख बाई! अब तो हम जा रहे है... हम परदेसी... ना घर हमारा ना वतन... तुमारे भरोसे रहना है बापा... मै कुछ बुरा भला बोली होगी तो बोली... भूल जाओ हुवा तो सब्ब... भुल जा... मन में मैल रखना नई बाई कब्बी बी...' आणि परदेसीन अधिकच कातर झाली.

आणि ती निघूनही गेली... राजुसा मात्र हलणाऱ्या वेलीसारखी नुसती थरथरत राहिली.

मग हिवाळी रात्रीसाठी सावल्या उतरत गेल्या भोवतालावर.

पण मग तसं काही कधी घडलं नाही. मग ती अवस्थाही कधीतरी निघून गेली. नलू शांत झाली. भुऱ्या परदेसी निघून गेला होता. त्याचा शेजार निघून गेला होता. त्या तिन्ही खोल्या आता रिकाम्या, भकास होत्या. घर एकटं झालं होतं आणि मामीची चिडचिड तर फारच वाढली होती. या ना त्या कारणावरून चिडत होती. उलटसुलट बोलत होती. लहानसहान गोष्टीवरून सारखा-सारखा पाणउतारा करीत होती. नलू चांगलीच कावून गेली होती. त्यात आता पुढे परीक्षेचे दिवस होते आणि उन्हाळ्याचेही. अभ्यास झालेला नव्हता... निदान पन्नास टक्केतरी मार्क मिळायला हवे होते... तरच पुढचं वर्ष इथे रायला मिळेल... नाहीतर आठवीही धड होणार नाही. म्हणून ती अभ्यासात अधिक लक्ष घालू लागली.

अनुक्रमणिका

पुस्तकं-वह्यांचा पसारा मांडून बसू लागली. कमला सोबतीला येत होती. कधी नलूही तिच्या घरी वर माडीवर बसून अभ्यास करीत होती. राजुसामामीनं तिला नाही म्हटलं तरी बऱ्यापैकी स्वातंत्र्य दिलं होतं.

आताही ती कमलाच्या माडीवरच होती. रात्रीचे साडेसात झाले होते. काहीतरी खायला द्यायचं म्हणून कमलाच्या आईनं वर आवाज दिला. त्यासाठी कमला पायऱ्या उतरून खाली गेली... मिनिटा-दोन मिनिटांचीच चुकामूक... एकदम वीज गेली. भकास अंधार झाला. नलू तशीच उठून उभी राहिली. बाहेर निघावं की थांबावं या संभ्रमातच... पुन्हा तसाच विळखा पडला आणि तशीच करकचून आवळली गेली ती. तिची किंकाळी तशीच त्या अंधारात विरली. ती धडपडली... धडपडली... अंधार ओळखीचा नव्हताच असा.

कमला कंदील घेऊन धावत वर आली... नलू खोलीतून सरळ दारात आली होती. एकटीच. धडधडत्या छातीनं... धपापत्या उरानं...

कमलानं कंदील जमिनीवर ठेवला. ती नलूला काही विचारणार तोच नलू तिच्या गळ्यात पडली. तिला हुंदकाच फुटला... ती थरथरू लागली. आणि स्फुंदून रडूही लागली.

'काय गं काय झालं... लौकरच तं आली बाई व मी... एव्हढी काय घाबरली गं तू एव्हड्याशा अंधाराले...'

नलूच्या दोन्ही हातांची पकड कमलाभोवती अधिकच घट्ट झाली. अधिकच घट्ट होत राहिली. कमलाला मात्र तो अंधार काही केल्या कळला नाही. तेव्हातर नाहीच नाही.

• • •

▪ **वसंत वाहोकार,** जानकी अपार्टमेंट्स्, २६, गजानननगर, वर्धा रोड, नागपूर-४४००१५

अनुक्रमणिका



। एकांकिका

मूक आठवांची रात्र

■ श्रीपाद प्रभाकर जोशी

(रात्री १० नंतरची वेळ. डॉ. नरसू मटामी यांचा दवाखाना. गडचिरोली जिल्ह्यातील एका तालुक्याचे गाव, गाव जंगलाने वेढलेले. डॉ. नरसूची ख्याती आजूबाजूला पंचक्रोशीत पसरली आहे. नरसूच्या दवाखान्याच्या पलीकडेच जंगलाची सुरुवात होते. डॉ. नरसू दवाखाना बंद करून निघण्याच्या बेतात आहे. तो त्याच्या कंपाउंडरला दारे खिडक्या बंद करण्यासाठी आवाज देतो आहे.)

नरसू : बाजोऽ... कुठे गेला हा? कितीदा सांगितलं दवाखाना बंद केल्याशिवाय जाऊ नको कुठे म्हणून. आता याला शोधणं हे एक काम. *(एवढ्यात जोरजोरात दरवाजा ठोठावल्याचा आवाज येतो.)*

नरसू : किती वेळ सांगतो अरे बेल लावली आहे ना दारावर, दरवाजा काय ठोठावताय? बाजो... बाजो... अरे कोण आहे बघतरी... दवाखाना बंद करायला जावं आणि कोणीतरी उभं राहतं. अरे. डॉक्टरला झोप वगैरे काही नको असते का?
(बाजोचा पत्ता नाही. अखेरीस तोच जातो, 'दवाखान्याची वेळ संपली आहे.' म्हणत जातो. एक तरुणी तोंडाला, कानाला स्कार्फ बांधलेली धावत आत येते. तिच्या अंगावर नक्षलवाद्यांचा वेष आहे. ''काय हवेय तुम्हाला?'' म्हणत नरसू येतो.)

नरसू : कोण आहेस तू? काय काम आहे? *(ती धापा टाकते आहे)* हे बघ, तू नक्षलवादी आहेस हे लक्षात आलंय माझ्या. पण तुम्हाला ठाऊक आहे, मी तटस्थ म्हणून येथे कार्यरत आहे. गरीब आदिवासी समाजाला आरोग्य सुविधा पुरविणं हेच माझे ध्येय आहे. निघून जा इथून, अकारण संशयाच्या घेऱ्यात मला अडकवू नको.

कुसुम : ते... ते... माझ्या मागावर आहेत. मला मारून टाकतील ते.

नरसू : कोण मागावर आहेत?

कुसुम : माझ्या दलमचे सहकारी.

नरसू : का पण? का मारतील तुला ते?

कुसुम : कारण मी दलममधून पळून आलेय.

नरसू : हे बघ, मी मानवतेच्या पातळीवर औषधोपचार करू शकतो. पण हा तुमचा प्रश्न आहे. मला वाटतं तू निघून गेलेलं योग्य राहील.

कुसुम : निघून जाऊ... (थांबून) मी माझ्या एका सहकाऱ्यावर गोळ्या घातल्या आहेत.

नरसू : का पण?

कुसुम : माझ्या इच्छेविरुद्ध त्यानं माझ्या इज्जतीवर हात घातला.

नरसू : पण दलममध्ये तर लग्न लावल्या जातं ना?

कुसुम : मी ते स्वीकारलं नाही. कारण मनानं मी कुणालातरी आपलं मानलं होतं.

नरसू : पण मग इथे का आलीस? *(ती स्तब्ध)* बोलत का नाहीस? तुझ्यामुळे माझा जीव धोक्यात येऊ शकतो.

अनुक्रमणिका

कुसुम : नाही येणार. तसं झालं तर मी माझ्या जिवाची ढाल करेन.

नरसू : इंटरेस्टिंग, तुझी तब्येत बरी नाही का? काही त्रास होतो आहे का? कुठे गोळी लागली आहे का?

कुसुम : नाही-नाही... मला काहीही झालेलं नाही.

नरसू : मग माझ्याकडे काय काम आहे?

कुसुम : त्यांच्या हातून मरण्यापूर्वी मला-तुला सगळं सांगायचं होतं.

नरसू : मला?

कुसुम : हो तुला?

नरसू : माझा काय संबंध?

कुसुम : *(चेहऱ्यावरचा स्कार्फ बाजूला करीत)...* ओळखलं?

नरसू : कुसुम... तू?... इतक्या वर्षांनंतर?...

कुसुम : हो... इतक्या वर्षांनंतर... म्हणजे मला जेव्हा शक्य झालं तेव्हा. *(तो अस्वस्थ येरझारा घालतो)*

कुसुम : मला इतक्या वर्षांनंतर बघून काहीच नाही वाटलं?

नरसू : काय वाटायला हवं?

कुसुम : मी भेटावं असं तुला कधीच नाही वाटलं?

नरसू : वाटलं... पण ते जाब विचारण्यासाठी? वाटायचं, ओरडून विचारावं एकदा, का असं वागलीस माझ्याशी?

कुसुम : मग विचार ना... विचार... त्यासाठीच आले आहे मी.

नरसू : पण आजची तुझी अवस्था बघून रागवावंसंही वाटत नाही.

कुसुम : माझ्यावर दया दाखवू नको. जिवाची बाजी लावून आले आहे मी येथवर.

नरसू : काय विचारणार? आणि उरलं काय आता? सगळं संपलं आहे कुसुम...

कुसुम : खरंच सगळं संपलं?

नरसू : हो... म्हणजे... ज्या क्षणी माझं आयुष्य भणंग करून निघून गेलीस तू नक्षलदलममध्ये... त्या क्षणापासून सगळंच संपलं?

कुसुम : मला वाटलं होतं, मला बघून... *(वाक्य तोडीत)*

नरसू : मी तुझं स्वागत करेन? कुसुम, तुझ्यासोबत माझाही जीव धोक्यात घालते आहेस तू...

कुसुम : एकेकाळी माझ्यासाठी जीव द्यायला तयार होतास तू?

नरसू : तू जीव घेणाऱ्या चळवळीत गेलीस आणि मला बदलावं लागलं. आता... आता...

कुसुम : आता माझ्याबद्दलचा रागच भरलाय मनात, असेच ना?

नरसू : हो आहे, आणि का बाळगू नये? स्वप्न बघायची, त्यात रंग भरायचे आणि एक दिवस अकस्मात त्याला अव्हेरून पाठ दाखवायची. तुला ठाऊक आहे, त्या क्षणापासून माझा प्रत्येक क्षण अपमानाचे कडू घोट गिळण्यात गेलाय.

कुसुम : मी समजू शकते...


नरसू : समजू शकते तर सांग ना मला. माझं आयुष्य उद्‌ध्वस्त करून का निघून गेलीस?

कुसुम : ती बोच आजही ताजी वाटतेय?

नरसू : हो आहे... आहे...

कुसुम : मग खरंच सगळं संपलं?

नरसू : *(रडवेला होत)* हो... हो... संपलं.. संपलं... काही उरलं नाही आता... ते दिवस पुन्हा



येणार नाहीत आता. ज्या दिवसात माझी कुसुम माझी होती, जिचं प्रेम माझी लढण्याची शक्ती होती. हळवी... निरागस कुसुम... *(तो बसतो. ती खट्टू झालेली... त्याला थोपटते.)*

कुसुम : ठीक आहे. चलते मी *(जाऊ लागते. तो उठून)*

नरसू : कुठे निघालीस?

कुसुम : दलममध्ये परत.

नरसू : *(गडबडीने)* नाही... नाही... वेडी आहेस का? ते मारून टाकतील तुला... असा अविचार करू नको... परत फिर... परत फिर... *(तो तिला वळवतो.)*

कुसुम : *(त्याच्याकडे कातरतेने बघत)* सगळं संपलं नाही नरसू...

(हळूहळू दृश्य बदल. कुसुम रानात मोहफुलं वेचते आहे. नरसू तिच्या मागून येऊन तिचे डोळे झाकतो.)

कुसुम : मी ओळखलं... नरसू... (खूप आनंदानं वळून) कधी आला? कसा आला?

नरसू : तुझी आठवण झाली म्हणून आलो?

कुसुम : खोटं, पुस्तक असताना तुला माझी कशाला आठवण येईल. काहीही सांगतो. डवार किंतोने बाहे...

नरसू : नाहीगं, खरंच, कॉलेजला चार दिवस सुट्टी होती. अभ्यासात लक्षच लागेना. सारखी तुझी आठवण येत होती. मग निघूनच आलो.

कुसुम : जाऽ मी बोलायचे नाही तुझ्यासोबत. माझ्यासाठी अभ्यास कशाला सोडायचा? मी एक-एक दिवस मोजते आहे, तू लवकरात लवकर डॉक्टर व्हावं म्हणून, आणि तू अभ्यास सोडून आला.

नरसू : त्याचा काय संबंध?

कुसुम : डॉक्टर झाल्याशिवाय तू लग्न करणार नाहीस आणि अभ्यास न केल्यानं नापास झालास तर माझं लग्न लांबणीवर नाही का पडणार?

नरसू : अगं पण आठवण येते त्याला मी काय करू?

कुसुम : काय करणार म्हणजे? आपण तळ्याला बांध घालतो तसा मनाला बांध घालायचा.

नरसू : बघ, तू अशी छान छान बोलतेस, म्हणून तर तुझी आठवण येते.

कुसुम : काही पण... डवार किंतोने बाहे...

नरसू : काहीही काय?

कुसुम : तुझ्या वर्गातली बाकी मुलं अशीच आठवण काढतात का आपल्या होणाऱ्या बायकोची?

नरसू : ते कशी काढतील?

कुसुम : का?

नरसू : अग आता ते लहान आहेत.

कुसुम : आणि तूच फक्त मोठा आहेस?

नरसू : तसं नाही गं. मी पण त्यांच्या बरोबरीचाच आहे. पण ते फक्त बारावीत आहेत.

कुसुम : आणि तू?

नरसू : मी पण बारावीतच आहे.

कुसुम : मग ते लहान आणि तू मोठा कसा?

नरसू : काय आहे त्यांच्याकडे हॉटेल आहे, मोटेल आहे, पण गोटुल नाही ना. मी शिकत नसतो तर एव्हाना आपल्या खांद्यावर बाळ असतं.

कुसुम : चल काहीतरीच. डवार किंतोने बाहे... मग ते केव्हा शोधतील त्यांची बायको?

नरसू : किती भोळी आहेस गं तू? शहरात शिक्षण झालं, मुलं आपल्या पायावर उभी झाली की मग शोधतात आपली बायको.

कुसुम : पायावर उभं रहायला काय लागतं (उभी राहते) हे बघ मी पण उभी झाले पायावर.

नरसू : पायावर उभं राहणं म्हणजे स्वतःच्या बळावर मिळवणं... कमाईला लागणं...

कुसुम : असं होय? बरं झालं बाप्पा, पेरसापेनची कृपाच म्हणायची आपलं लग्न अगोदर ठरलं.

नरसू : का बरं?

कुसुम : शहरात राहून सरकायला वेळ नाही लागत.

नरसू : वेडी की काय? कुसुम, मला डॉक्टर व्हायचं आहे. जंगलपाड्यात वसलेल्या आपल्या आदिवासी बांधवांना आरोग्यसेवा द्यायची आहे. तुला ठाऊक आहे ना, माझ्या आईवर अस्वलानं हल्ला केला होता, मांडीचा पार लचकाच तोडला होता, कुठल्याही उपचाराविना मरून गेली ती बिचारी.

कुसुम : होय. सगळं गाव आपलं भयभीत झालं होतं.

नरसू : आणि हो, आणखी एक करायचं आहे...
कुसुम : काय?
नरसू : माझ्या कुसुमला खूप सुखात ठेवायचं आहे.
कुसुम : चल काहीतरीच. डवार किंतोने बाहे... आणि माझ्याजवळ बोलला तर बोलला, दुसरीकडे कुठेही बोलू नको.
नरसू : का बरं?
कुसुम : दृष्ट लागायची.
नरसू : वेडी आहेस काय? हे दृष्ट वगैरे सगळी अंधश्रद्धा आहे.
कुसुम : का बरं? मागच्या वर्षी शाळेत पहिला नंबर आला म्हणून पेपरात फोटो आला होता तुझा. तेव्हा किती दृष्ट लागली होती? चांगला चार दिवस तापानं पडला होता तू.
नरसू : अगं, दहावीत मेरीट आलो होतो मी म्हणून फोटो आला होता माझा. नरसू मटामी, सतरावा मेरीट जिल्ह्यातून पहिला.
कुसुम : होय. पण दृष्ट किती जोरदार लागली होती.
नरसू : कसली दृष्ट पाण्यातून Infection झालं होतं.
कुसुम : पण दृष्ट काढल्याबरोबर पळाला होता की नाही ताप?
नरसू : काहीतरीच! तालुक्यावरून अँटिबायोटिक्स बोलावल्या होत्या मी.
कुसुम : म्हणजे?
नरसू : गोळ्या... औषध... ते घेतल्याबरोबर ताप पळून गेला. औषधानं सगळे आजार दूर होतात. आपण दृष्ट, करणी, जादुटोणा म्हणत राहिलो फक्त.
कुसुम : मला काय कळणार? मी तर पाचवीतच शाळा सोडली.
नरसू : का बरं?
कुसुम : बाबा म्हणाला, शाळा दूर आहे. आता शेतात चल कामाला.
नरसू : मी तुला पुन्हा शिकवेन. शिकशील ना?
कुसुम : शिकेन, पण तू असं बोलायचं नाही.
नरसू : आता तुला एवढं समजावून सांगितलं ना?
कुसुम : पण मला भीती वाटते.
नरसू : *(गंमत घेत)* पण मला सांगायचं आहे.
कुसुम : मग या झाडाला सांग.
नरसू : का बरं? झाडाची दृष्ट नाही लागत?
कुसुम : जंगल तर आपलं मायबाप आहे. त्याची कशी दृष्ट लागणार?
नरसू : *(हसत हसत झाडाजवळ जात लांब हात करून)* मी माझ्या कुसुमला खूप सुखात ठेवेन.
कुसुम : एवढ्या जोरात ओरडून कशाला सांगायचं?
नरसू : मग कसं सांगायचं?
कुसुम : मनात ठेवायचं.
नरसू : का बरं?
कुसुम : झाडं बोलतात एकमेकांशी, सुखदुःख सांगतात.
नरसू : किती निर्मळ, निरागस आहेस गं! भोळी तरीही हुशार. *(स्तब्धता)* आपला आदिवासी समाज वर्षानुवर्षेजंगलात राहिला. शहरांपासून दूर. आपल्या चालीरीती, जगण्याची शैली शहरी जीवनापासून वेगळी राहिली. प्रकाशभाऊंनी शाळेची दिशा दाखवली. आता आपली मुले शिकू लागली. चार मुले डॉक्टरही झाली. मलाही त्यांच्यासारखं डॉक्टर व्हायचं आहे, आपल्या समाजाची सेवा करायची आहे.
कुसुम : *(तिच्या डोळ्यात पाणी)* नरसू...
नरसू : एSSS रडायला काय झालं?
कुसुम : तुझं असं बोलणं ऐकलं की कळत नाही पण छातीत कसंतरीच व्हायला लागतं. रडायलाच येऊ लागतं.
नरसू : वेडी कुठली!
कुसुम : तुला डॉक्टर व्हायला किती वर्ष लागतील?
नरसू : बघ आता मी बारावीत आहे. मग मेडिकलचे पाच वर्ष, मग इंटर्नशिप, पिजी सात वर्ष तरी लागतील.
कुसुम : इतका वेळ तू शिकतच राहणार? मी एकटीच राहू? नरसू आपण लग्न करून टाकू ना!
नरसू : ते आताच कसं शक्य आहे?
कुसुम : आपल्या बरोबरीच्या सगळ्या मुलांची लग्न झाली.
नरसू : घाई कसली आहे? मी कुठे पळून जाणार आहे?
कुसुम : मला भीती वाटते.

अनुक्रमणिका

'कुसुम चैतूसोबत पळून गेली. नक्षलदलममध्ये सामील झाली' मग मी कसा विश्वास ठेवणार नाही?

कुसुम : नक्षलवादी त्यांच्या षड्यंत्रात यशस्वी झाले. तू तुझ्या आयुष्यात यशस्वी झालास. बळी फक्त माझा गेला.

नरसू : म्हणजे?

कुसुम : तुला ठाऊक आहे, नक्षलवादी कुणाची गय करीत नाही. आदिवासींची छोटी चूक त्यांच्या जिवावर बेतते. साऱ्या गावकऱ्यांना गोळा करून त्यांनी सांगितलं, कुणी विचारलं तर हेच सांगायचं, 'कुसुम चैतूसोबत दलममध्ये पळून गेली.' कुणाची टाप होती त्यांच्या विरोधात जायची!

नरसू : पण माझ्या बाबानंही कधी सांगितलं नाही.

कुसुम : अरे, आपला सगळा समाजच दहशतीत आहे. तुझा बाबा असला तरी आगीत उडी कोण घेणार?

नरसू : कुसुम, पण माझ्या माहितीप्रमाणे नक्षलवादी दलम भरतीसाठी दबाव टाकतात, प्रलोभनं दाखवतात. पण मुलींना पळवून नेऊन भरती करीत नाही.

कुसुम : ते सारे प्रकार माझ्यासोबत, माझ्या बाबासोबत, त्यांनी केलेच. पण मी त्या दबावाला झुगारत राहिले तेव्हा एक दिवस शेतात माझ्याभोवती आठ नक्षलवादी उभे राहिले. चैतू त्यांच्यासोबत होता. माझ्या डोळ्यावर त्यांनी पट्टी बांधली. पाठीवर बंदूक रोवली. मग त्यांच्या मागोमाग जाण्याशिवाय मला पर्याय नव्हता. मी मरायलाही तयार झाले असते. पण तुझी आशा मनात जिवंत होती आणि राहिला प्रश्न पळवून नेण्याचा तर नक्षलवादी मुलींना पळवून नेत नाही या भ्रमात राहू नकोस. माझ्यानंतर सहा महिन्यांनी लाहेरीहून तीन मुलींना त्यांनी पळवून नेलं होतं.

नरसू : *(निःशब्द, हळवा, हतप्रभ. बसतो... हळुवार रडू लागतो...)* कुसुम... कुसुम... खूप अपराधी आहे मी तुझा... खूप अन्याय झाला तुझ्यावर... मी काही करू शकलो नाही तुझ्यासाठी...

कुसुम : काय नाही सहन केले मी... मनाविरुद्ध शस्त्र हाती घेतलं, सतत जंगलात भ्रमंती केली... मिळेल ते खाल्ले... वाईट नजरेपासून स्वतःला सांभाळलं... फक्त तुझ्यासाठी... तुझ्याकडे पळून येईल म्हणून मला कोरची दलममध्ये पाठवलं. माझे सगळे रस्तेच त्यांनी बंद केले. तुझ्यासाठी दुःखाचे घोट गिळत असताना तू माझ्या द्वेषानं आंधळा झाला होतास, ही गोष्ट माझा जीव गुदमरून टाकते आहे.

नरसू : नाही. नाही... कुसुम असं म्हणू नको... तू गेल्यापासून मन असहायतेनं भरून गेलं होतं. तू स्वेच्छेने गेलीस या कल्पनेनं मी व्यथित झालो. त्या अपमानानं क्षणोक्षणी होरपळत राहिलो. समोर आलीस तर गळा दाबावा असंही वाटत राहिलं. कारण तुझ्या प्रेमासमोर मी अगतिक होतो. पण खरं सांगतो, जीव तोडून प्रेम केलंय मी तुझ्यावर. तसं नसतं तर मी अविवाहित राहिलो नसतो.

कुसुम : लग्न नाही केलंस?

नरसू : नाही.

कुसुम : का?

नरसू : कस करणार कुसुम? तुझ्या प्रेमानं मला बांधून ठेवलं होतं. तुला आठवते आपली शेवटची भेट. तेव्हा मी सेकंड इयरला होतो.
(दृश्य बदल. पूर्वस्मृतिचित्रे जागृत होतात.)
(कुसुम बसलेली नरसू येतो.)

कुसुम : *(आनंदून)* या डॉक्टरसाहेब, कसं काय येणं केलं?

नरसू : तेंदुपत्ता गोळा करायला आलो.

कुसुम : त्याची काय गरज पडली तुला?

नरसू : पैशांची गरज पडली. काही पुस्तकं घ्यायची आहेत. महागडी, पण आवश्यक आहेत.

कुसुम : पैसे मी देते.

नरसू : मी थोडं काम केलं तर काही बिघडणार आहे का?

कुसुम : हो बिघडणार आहे. तू अभ्यासाकडे दुर्लक्ष करशील. मग नापास होशील. मग माझं लग्न लांबणीवर पडेल.

नरसू : अभ्यास होईल गं. पण याक्षणी पैशाची

निताांत गरज आहे.

कुसुम : माझ्याकडे आहेत थोडे पैसे.

नरसू : मला जास्त पैशांची गरज आहे, कसं सांगू तुला?

कुसुम : (गळ्यातलं लपवलेलं मंगळसूत्र काढत) मग हे माझं मंगळसूत्र घे, दहा ग्रॅमचे आहे. विकून टाक.

नरसू : थांब... थांब... थांब... आपलं लग्न तर व्हायचं आहे मग हे मंगळसूत्र तुझ्या गळ्यात कसं आलं?

कुसुम : (हसत) ती आमची एक गम्मत आहे.

नरसू : (वेडावत) एऽ वेडी, मंगळसूत्र ही गंमत नाही, गंभीर गोष्ट आहे. त्यासाठी लग्न करावं लागतं.

कुसुम : माहिती आहे. *(त्याला वेडावत)* लग्न करावं लागतं. पण ही आमची वेगळीच गम्मत आहे.

नरसू : कळू दे तरी मग मला, कसली गम्मत आहे...

कुसुम : नक्षलवादी दलमसाठी तरुण मुलामुलींच्या शोधात असतात. पैशाचं आमिष दाखवतात, दबाव टाकतात, नाना युक्त्या वापरतात. त्यांना लग्न न झालेल्या मुली हव्या असतात. म्हणून गावातल्या मुलींनी नक्षलवाद्यांनी आपल्याला पळवून नेऊ नये म्हणून आपलं लग्न झालं आहे हे दाखविण्याकरिता मंगळसूत्र घालायला सुरुवात केली आहे.

नरसू : खुळी आहेस का कुसुम तू? कोणाचं लग्न झालं आहे, कोणाचं नाही झालं, नक्षलवाद्यांना सगळी माहिती आहे.

कुसुम : असेल. पण मला ही कल्पना खूप आवडली. आपलं लग्न होईल तेव्हा होईल, पण तुझ्या नावाचं मंगळसूत्र घालायला मला खूप मजा वाटते आहे.

नरसू : केलं आहे तर असू देना तुझ्याजवळ. आपलं लग्न होईल तेव्हा तुझ्या गळ्यात घालेन मी, माझ्या हातानं.

कुसुम : ज्याच्या नावानं केलं त्याला गरज असताना गळ्यात अडकवून काय करू? हे विक आणि तुझं काम भागव.

नरसू : नाही कुसुम, मला नाही जमणार.

कुसुम : तुझ्या सुखासाठी मी काहीही करायला तयार आहे.

नरसू : म्हणून तुझं मंगळसूत्र विकावं मी?

कुसुम : आपलं लग्न कुठे झालं अजून? मोठा होशील तेव्हा भारी मंगळसूत्र करून दे मला.

नरसू : नाही... नाही... शक्यच नाही.

कुसुम : (रडू लागते)

नरसू : रडायला काय झालं?

कुसुम : तू मला आपलं समजत नाही ना?

नरसू : असं कोण म्हणालं?

कुसुम : म्हणावं कशाला लागतं?... ते दिसूनच येते आहे...

नरसू : किती वेडी आहेस गं. ही गोष्ट माझ्या मनाला तर पटायला हवी.

कुसुम : न पटण्यासारखं काय आहे? मी तुझी, माझं शरीर तुझं, माझं मन तुझं... तर माझं मंगळसूत्रसुद्धा तुझं आहे.

नरसू : माझे आई, दे ते मंगळसूत्र. झालं समाधान?

कुसुम : हो... झालं.... (त्याच्या खांद्यावर मान ठेवते)

नरसू : (गहिवरून) तुझं हे प्रेम गहिवरून टाकते मला... सारखं धावं घेते तुझ्याकडे.

कुसुम : म्हणून सारखं गावाकडे यायचं नाही.

नरसू : हे बरं आहे, प्रेमात बांधून ठेवायचं आणि वर गावाकडे यायचं नाही म्हणून धमकी द्यायची.

कुसुम : आम्हाला पण येते म्हटलं आठवण, पण आम्ही राहतोच ना!

नरसू : मी म्हणतो ना, दिसते साधीभोळी, पण आहे पक्की हुशार. निरुत्तर करतेस. तुला सांगतो, तुझ्या याचं मायेनं कॉलेजमध्ये कुणाकडे बघावसं वाटत नाही.

कुसुम : असंचं रहायचं शहाण्यासारखं नाही तर...

नरसू : नाही तर काय?

कुसुम : कोयता आहे माझ्याजवळ.

नरसू : शिकली नसशील जास्त, पण तुझी इयत्ता कोणती हेच कळत नाही

(अंधार. दृश्य पुन्हा पूर्ववत ती थरथरत उभी, भारावलेली... तोही गहिवरलेला...)

नरसू : त्या मंगळसूत्रानं आयुष्यभर मला बांधून

अनुक्रमणिका

ठेवलं.

कुसुम : मी काय म्हणावं? मी तर सर्वच गमावलं.

नरसू : काय चुकलं आयुष्यात हेच कळत नाही. अकारण हे सारे भोग वाट्याला आले. *(तिला बसवतो)* किती भोगलंस... अपराधी वाटतंय मला. तुझ्या प्रेमाला मी पात्र ठरलो नाही, काहीच करू नाही शकलो तुझ्यासाठी.

कुसुम : याच शब्दासाठी इतका काळ जिवंत आहे मी. नाहीतर एक गोळी कानशिलावर केव्हाही ठेवू शकले असते.

नरसू : नको असं बोलू... विसरू सारं. पुन्हा आयुष्याला सामोरे जाऊ...

कुसुम : आता स्वप्नालाही दहशतीची काजळी लागली आहे.

नरसू : काळजी करू नको. माझी सारी प्रतिष्ठा पणाला लावून मी तुला दलममधून परत आणेन.

कुसुम : शक्य नाही नरसू. मी त्यांच्या एका सहकाऱ्याला ठार मारलं आहे.

नरसू : मी तुझ्या प्राणाची भिक मागेन.

कुसुम : तुझ्या याचनेला काय अर्थ आहे?

नरसू : बराच अर्थ आहे. दंडकारण्याचा दलम कमांडर जगन अण्णा, त्याच्या पायात गोळी लागली होती. तेव्हा बेशुद्धावस्थेत त्याला माझ्याकडे आणलं होतं आणि मानवतेच्या पातळीवर मी त्याचे प्राणही वाचवले होते.

कुसुम : मागच्यावर्षी कसनसूरच्या जंगलात झालेल्या पोलीस चकमकीत मारला गेला तो.

नरसू : म्हणून काय झालं...?

कुसुम : नरसू, त्यांच्या एका क्रांतिकारकाला ठार मारलं आहे मी.

नरसू : तर...

कुसुम : ते सहजासहजी सोडणार नाही मला. जनतेच्या न्यायालयात खटला भरतील माझ्यावर. माझा मृत्यू अटळ आहे.

नरसू : मग शरण जायचं... आत्मसमर्पण करायचं... सकाळ होताच मी एसपीसाहेबांशी बोलतो.

कुसुम : सकाळी... वेळ फार कमी आहे नरसू. ते आताच माझ्या मागावर आहेत.

नरसू : ते मागावर आहेत म्हणूनच आता बाहेर पडणं धोक्याचं आहे.

कुसुम : नाही नरसू... तो धोका आपण स्वीकारू पण इथे राहणं जास्त धोक्याचं आहे. माझा माग घेत ते इथेच येतील असं मला वाटतं.

नरसू : ठीक आहे. आपण आताच निघू...

कुसुम : पण नरसू, आणखी एक धोका आहे. तुझ्यासाठी.

नरसू : काय?

कुसुम : तू नक्षलवाद्यांच्या रडारवर येशील. आधीच आदिवासी समाजात तुझा वाढत्या प्रतिष्ठेनं त्यांच्या मनात तुझ्याबद्दल राग आहे. तुझं नेतृत्व प्रस्थापित होईल अशी भीती वाटते त्यांना.

नरसू : इतका विचार करण्याची ही वेळ नाही कुसुम... चल निघ... (दोन पावलं पुढं जाऊन त्याला काहीतरी आठवतं) एक मिनिट... बस एक मिनिट... मी आता आलो... *(म्हणत वेगाने आत जातो आणि तितक्याच वेगाने परत येतो, खिशातून मंगळसूत्र काढतो.)*

नरसू : आठवलं!

कुसुम : *(तिला हुंदका फुटतो, ती मान हलवते.)* विकलं नाही?

नरसू : (डबडबलेल्या डोळ्यांनी) कसं विकणार? प्रेम जपायचं असतं विकायचं नसतं. तू नाही म्हणाली तेव्हा आरमोरीला जाऊन तेंदू सिजनमध्ये काम केलं मी, पण तुझं मंगळसूत्र जपून ठेवलं.

(तो ते तिच्या गळ्यात बांधतो. ती त्याच्याकडे बघते. हमसाहमशी रडत बिलगते. तो तिला थोपटू लागतो. एवढ्यात बाहेरून दरवाजा धाडधाड ठोठावण्याचे आवाज ऐकू येऊ लागतात. दोघेही सावध होतात.)

नरसू : कोण आहे? दवाखान्याची वेळ संपली आहे.

बाहेरुन आवाज : तुम्हारी मौत... दरवाजा खोलो... आम्ही...

नरसू : (कुसुमला) तू आत जा (ती घाईघाईने आत जाते) कोण आहे सांगितल्याशिवाय

दरवाजा उघडणार नाही.

बाहेरून आवाज : डॉक्टर माझ्याजवळ फालतू वेळ नाही आहे. जल्दी खोलो. नही तो दरवाजा तोडके आयेंगे..

(नरसू बाहेर जाऊन दरवाजा उघडतो. नक्षलवादी चैतू त्याच्या पाठीवर पिस्तूल रोखून त्याला ढकलत आत आणतो.)

नरसू : चैतू तू चुकतो आहेस... तू चुकतो आहेस...

चैतू : काय बरोबर ते नंतर बघू डॉक्टर, पहिले हे सांग, कुसुम इकडे आली?

नरसू : नाही.

चैतू : खोटं बोलू नको डॉक्टर. तुझ्याशिवाय ती कुठे जाणार नाही हे ठाऊक आहे मला.

नरसू : कशाला तिला त्रास देतो आहेस? आधीच खूप भोगलंय तिनं तुझ्यामुळे

चैतू : डॉक्टर माझ्याजवळ वेळ नाही. लवकर सांग, कुठे लपवलंस तिला?

नरसू : ती इथे नाही आहे आणि तू तत्काळ निघून जा. नाहीतर पोलिसांना कॉल करेन मी.

चैतू : ठीक आहे. मी शोधून घेईन तिला. *(तो आत जायला वळतो तसा नरसू फोनकडे धावतो. चैतू वळून)* डॉक्टर मला शहाणपणा चालणार नाही. फोनला हात लावशील तर याक्षणी कुसुमला गोळी घालून ठार करेन. *(नरसू अस्वस्थ, चैतू आत जातो कुसुमच्या केसांना धरून तिला बाहेर आणतो.)*

चैतू : मला ठाऊक होतं तू इथेच असणार.

नरसू : चैतू सोड तिला. तिची इच्छा नसताना तू तिला नेऊ शकत नाही. तिला आत्मसमर्पण करू दे चैतू. तिला सामान्य माणसासारखं जगू दे.

चैतू : डॉक्टर, खरं तर माझ्याशी खोटं बोलला म्हणून मी तुलाही शिक्षा करू शकतो. पण याक्षणी माझ्याजवळ तेवढा वेळ नाही. (कुसुमला) चल.

कुसुम : (चवताळून) मी आता त्या जगात पाऊल टाकणार नाही.

चैतू : तुझ्या इच्छेचा प्रश्नच कुठे येतो? एका क्रांतिकारकाला ठार मारलं आहेस तू. तुला परत आणण्याचे आदेश आहेत मला.

कुसुम : माझ्या अंगावर हात घालत होता तो, त्याला काय जिवंत सोडू?

चैतू : त्याचा फैसला जनतेच्या न्यायालयात होईल, चल...

नरसू : चैतू, का असा वागतो आहेस? लहानपणी आपण एकत्र खेळलो आहे. तुला काहीच वाटत नाही?

चैतू : डॉक्टर, क्रांती भावनेवर चालत नाही.

नरसू : कसली क्रांती? निरपराध आदिवासींना छोट्या-छोट्या कारणांवरून ठार मारणं, खंडणी गोळा करणं, तरुण-तरुणींना शिक्षणापासून वंचित ठेवणं, त्यांच्या मनाचा विचार न करता त्यांना जबरदस्तीनं दलममध्ये भरती करणं, ही क्रांती आहे का?

चैतू : जेव्हा जनतेचं खरंखुर राज्य येईल, तेव्हा या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळतील.

कुसुम : वाट पहा, त्या अगोदर पोलिसांच्या एखाद्या गोळीने जंगलात मरून पडशील.

चैतू : *(खवळलेला. रागाने तिचे केसं आवळीत)* इतकी वर्षे दलममध्ये राहून क्रांतीच्या विरोधात बोलतेस?

नरसू : चैतू, तुझ्या कमांडरशी बोलू दे मला एकदा.

चैतू : नाही. मी फक्त मला मिळालेला आदेश पाळणार आहे.

नरसू : (अगतिकपणे) माझी विनंती आहे तुला, तिला आत्मसमर्पण करू दे.

कुसुम : काही गरज नाही, त्यांच्यासमोर हात जोडण्याची.

चैतू : खूप जीव आहे डॉक्टरचा तुझ्यावर. आजही कायम आहे. (पिस्तुल रोखून) चल... चल...

कुसुम : मी येणार नाही.

(नरसूही त्याच्यासमोर येतो. एवढ्यात गोळीबाराचे आवाज येऊ लागतात. चैतूचा वायरलेस फोन वाजू लागतो. चैतू तिला धरून ठेवीत)

चैतू : कायSS? कोम्बींग टीमने घेरलंय? कुसुमला घेऊन निघतोच आहे मी. दोघंजण कव्हर द्या? चला, आता वेळ उरला नाही. (नरसू

कुसुमला सोडवू पाहतो. चैतू त्याला ढकलतो. त्याच्यावर पिस्तूल रोखून तू मुकाट्याने आली नाहीस तर डॉक्टरला ठार केल्याशिवाय राहणार नाही.

नरसू : मी मेलो तरी चालेल, पण कुसुम तू परत जाऊ नको.

कुसुम : नाही नरसू... समाजासाठी तुझं जगणं महत्त्वाचं आहे. चैतू, सोड त्याला, मी तयार आहे यायला.

चैतू : डॉक्टर, वाचला आज तू माझ्या हातून. सांभाळून राहा *(तिला घेऊन बाहेर पडतो. नरसू हतबल... गोळीबाराचे आवाज वाढतात... नरसू फोनकडे धावतो.)*

नरसू : (फोनवर) हॅलो... हॅलो... हां... एसपीसाहेब, मी डॉ. नरसू मटामी बोलतो आहे. कुसुम... एक...एक... महिला नक्षलवादी... जिला बळजबरीने नक्षलदलममध्ये भरती केलं होतं, ती दलम सोडून पळून आली होती. हो... हो... ती माझ्याकडे आली होती... हो आजच... तिला आत्मसमर्पण करायचं होतं... तिच्या दलमचा सहकारी आता तिला पिस्तुलाच्या धाकावर परत घेऊन गेला... दूरवर गोळीबाराचे आवाज येत आहेत. मला भीती वाटते आहे... या गोळीबारात कुठे तिला... *(त्याला हुंदका फुटतो)* तिला वाचवा एसपीसाहेब... तिला वाचवा... माझी कोण आहे ती?... माझं सर्वस्व आहे ती... *(भावनाविवश झालेला. फोन ठेवतो. गोळीबाराचे आवाज येतच असतात. नरसू अस्वस्थपणे येरझारा घालतो आहे. हळूहळू गोळीबाराचे आवाज कमी होतात. त्याच्यावर अंधार. फोनवर प्रकाश... फोन वाजतो आहे. तो अधीरतेने फोन घेतो.)*

नरसू : हॅलो... हां... हो हो... मी डॉ. नरसू मटामी बोलतो आहे... एसपीसाहेब काय झालं?... काऽय? दोन नक्षलवादी मारले गेले... कोण होते ते?... नाव कळलं का?... काऽय?... त्यात एक महिला नक्षलवादी होती... आई गं... तिचा मृतदेह कुठे आहे?... मी बघू शकतो का तिला?... काऽय?... नक्षलवादी मृतदेह पळवून नेण्यात यशस्वी झाले... कुसुम... कुसुम... कुसुम... *(खाली बसतो. रडू लागतो. शून्य विमनस्क... क्षणभर ताबा गेल्यासारखा... उठतो. गळ्यातल्या स्टेथॉस्कोपचे इअरनॉब्ज कानाला लावतो. डॉयफ्राम हवेत ठेवून पेशंटला चेक केल्यासारखे करतो.)*

नरसू : ही व्यवस्थाच आजारी आहे कुसुम, ही व्यवस्थाच आजारी आहे... जुनं दुखणं आहे हे... शतकांचं... एक डॉक्टर पुरेसा नाही त्याला... हजारो डॉक्टर हवे आहेत... चुकीचं निदान केले जातंय... शस्त्र कुठल्या रोगावरचं औषध असतं कां?... आम्हाला शस्त्र नाही शास्त्र हवं आहे... पण त्यांना हे कळत नाही आहे... त्यांना हे कळेपर्यंत कुसुम, तुझा यात बळी जात राहणार... मला माफ कर कुसुम... बघना मी तुझ्यासाठी काहीच करू शकलो नाही. *(म्हणत रडू लागतो. हळूहळू अंधार...)*

• • •

▪ **श्रीपाद प्रभाकर जोशी,** समाधी वार्ड, चंद्रपूर, भ्रमणभाष : ९८५०३५०६६५

अनुक्रमणिका



‘फुटपाथ ते नोटरी’च्या निमित्ताने

■ डॉ. सुनील रामटेके

ग्रंथालीने अलीकडच्या काळात ‘फुटपाथ ते नोटरी’ ही सुजाता लोखंडे यांची कादंबरी प्रसिद्ध केली आहे. परमनप्रवेशातून साकारलेली कलाकृती म्हणून तिची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. या कांदबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ती दलितत्वाच्या आवरणातून पूर्णतः मुक्त झाली आहे. शिवाय आंबेडकरांच्या नव्या प्रबुद्ध तत्त्वज्ञानाकडे तिची वाटचाल आहे. बदलत्या काळात दलितसाहित्याने कात टाकली याचे स्पष्ट संकेत ही कादंबरी देते. त्यात नायकाचा अखंड संघर्ष आहे. आणि बदलत्या जीवनाचे स्वच्छ, नितळ रूप वाचकांच्या थेट मनात उतरते. प्रासादिक आणि ओघवत्या लेखनशैलीने कथावस्तूचे मूल्य वाढले आहे. १९६० च्या दशकातील दलित साहित्याने वेदना, विद्रोह आणि नकार या त्रिसूत्रीचे वास्तवदर्शी रूप जगापुढे आणले. दलित आत्मकथनांनी त्या काळात वादळ उठवून दिले. दलितांच्या वाट्याला आलेल्या अनंत यातनांचे, दुःख, दैन्य, दारिद्र्याचे चित्रण आत्मकथनातून केले गेले. हे जीवनदर्शन ओंगळवाणेही होते. भेदकही होते. त्यामुळे आंबेडकरी विचारांनी जागृत झालेल्या अस्मितेला बोचणारेही होते. म्हणूनच रूढी, परंपरा आणि प्रचलित व्यवस्थेविरुद्ध प्रलयंकारी विद्रोहाने हे वाङ्मय प्रस्थापितांच्या विरुद्ध उभे ठाकले. ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी विद्रोही साहित्याबाबत केलेली मांडणी अतिशय महत्त्वाची आहे. ‘‘विद्रोही चळवळीला परिवर्तनाचे अवतारकार्य धिमेपणाने व प्रदीर्घ काळपर्यंत करावे लागेल. तिचा आशय व औजारे यांचाही सतत आढावा घेत राहावे लागेल. स्वयंमूल्यमापन टप्प्याटप्प्यावर करण्याची गरज राहील. डावपेचात्मक व्यूहांचाही वारंवार विचार करावा लागेल. मात्र या चळवळीची इष्टता व आवश्यकता दीर्घकाळ अबाधित राहणार आहे.’’ (रा. ग. जाधव, ‘माझे चिंतन’, पृ. १०४, मनोविकास प्रकाशन, २००६) अत्यंत दूरदृष्टीने केलेले हे विधान आज काळाच्या कसोटीवर खरे ठरले आहे.

दलित साहित्याने साठच्या दशकात निर्माण केलेले प्रश्न पूर्णांशाने मिटलेत. असे नाही. पण बाबासाहेब आंबेडकर यांच्या अद्वितीय प्रेरणेने आणि विचारसामर्थ्याने आजकालचा अस्पृश्य-दलित वर्ग प्रस्थापितांची बरोबरी करू लागला आहे. काही प्रमाणात शैक्षणिक, सामाजिक प्रगती झाली आहे. त्यामुळे 'दलित' या शब्दाचीही त्याला घृणा वाटू लागली आहे. बाबासाहेबांनी बुद्ध तत्त्वज्ञानाशी त्याची सांगड घातल्याने नवीन पण प्राचीन बौद्ध संस्कृतीशी तो आपली नाळ जोडू शकला आहे. प्राचीन बौद्ध अस्मितेचा स्वाभिमान त्याच्या अस्तित्वातून झळकू लागला आहे.

या जाणिवेचे स्पष्ट प्रतिबिंब बऱ्याच कालावधीनंतर साहित्यातून उमटले, ते 'फुटपाथ ते नोटरी' या कादंबरीतून. कालच्या दलित साहित्यातील अस्पृश्यता, गलिच्छ, घृणास्पद जगण्याचे चित्र यातून हद्दपार झाले आहे. जगण्याचा संघर्ष आहे; पण तो एका निर्णायक प्रगतीच्या टप्प्यावर येऊन विसावला आहे. सुजाता लोखंडे या नव्या लेखिकेने लिहिलेली ही कादंबरी म्हणजे असंख्य वास्तव घटनांचे चलचित्र आहे. सागर या आपल्या धाकट्या चुलत दिराची ही कहाणी लेखिका सुजाता यांनी अत्यंत प्रगल्भ व प्रासादिक शैलीत मांडली आहे. ''नागपूरचा पावसाळाही तसा विचित्रच. बरसला तर खूप, नाही तर काहीच नाही. यावर्षीही तसंच झाले.'' या वाक्यापासून कादंबरीची सुरुवात होते. एका मागून एक संवाद आणि दृश्य यांची निवेदने येऊ लागतात. नागपूर-विदर्भाच्या परिसराची वर्णने कथा-कादंबऱ्यांतून जरा क्वचितच दिसतात. पण या कादंबरीत प्रथमच नागपुरी प्रादेशिकतेच्या वैशिष्ट्यांनी ठसठशीत आकार घेतला. दारिद्र्यात वाढणाऱ्या सागरचा जीवनसंघर्ष त्याच्या वाढत्या वयाबरोबर वाढत जातो. शिक्षण घेऊनही हाताला काम नाही. रिक्षा चालवण्यापासून तर रस्त्यावर डांबर टाकण्याच्या कामाचा रगाडा सुरू असताना सागरच्या तारुण्याला पालवी फुटते. एकाचे दोन हात होतात, पण दारिद्र्य संपत नाही. त्याच्या आयुष्यासोबत त्याची पत्नी ज्योती हिचीही फरफट सुरूच असते. मध्यंतरीच्या काळातील भारतीय राज्यव्यवस्थेला आलेले अपयशाचे चित्र यात उमटले आहे. शिक्षण वाढले पण निव्वळ बेकारांच्या फौजा तयार झाल्या. सरकार या शिकलेल्या तरुणांना योग्य नोकऱ्या देऊ शकत नव्हते. कादंबरीतील नायकही या अपयशी राज्यव्यवस्थेचा एक बळीच आहे. तो चागंला एल.एल.बी. झाला, पण रस्त्याच्या कामात रखडत होता. जीवनाशी त्याचा अव्याहत संघर्ष सुरू होता. सागरच्या जन्मापासून दारिद्र्याचा आणि संघर्षाचा प्रवास, लेखिकेने अत्यंत समतोलपणे चित्रित केला आहे. ''पावसाळ्यात शेतीची कामं, उन्हाळ्यात खोदकामाला जाणं, तळ्याच्या कामाला जाणं, रानावनात भटकून लाकडं गोळा करणं, कधी मोहफुलं वेचायला जाणं असं जीवनचक्र सुरू होतं.'' (पृ. २८) ही कहाणी समाजव्यवस्थेतील शेवटच्या माणसाची आहे. हा शेवटचा माणूस लोकसंख्येचा मोठा भाग आहे. ज्याच्या अस्तित्वाची फारशी दखल आजवर कुणीच घेत नव्हतं, लेखिकेने त्याची दखल का घेतली? त्याचे उत्तर जीवनदृष्टीत आहे. कादंबरीची सामग्री म्हणजे मानवी जीवन. मानवी जीवनातून कादंबरीकार सामग्रीची निवड करतो. या निवडीमागे विशिष्ट दृष्टिकोन असतो. जो कधी सूचक तर कधी स्पष्ट असतो. मानवी जीवनाच्या सूक्ष्म निरीक्षणातून लेखकाचे काही ग्रह होतात. लेखक पात्रांकडून जीवनविषयक विचार मांडत असतो. लेखिकेने सागर या पात्राच्या माध्यमातून जीवनविषयक दृष्टिकोन मांडला आहे. सागरला बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक जाणिवेचा विचार जवळचा वाटतो. ज्या माणसाच्या आयुष्याला कोणत्याही तत्त्वज्ञानाचा कधीही स्पर्श झाला नाही त्याला आंबेडकरांचे तत्त्वज्ञान जवळचे वाटावे हे लक्षणीय आहे.

कादंबरीकार एखाद्या व्यक्तीची भूमिका घेऊन आत्मनिवेदनपर कादंबरी लिहितो. विशिष्ट भावानुभवाची उत्कट अभिव्यक्ती दर्शविण्यासाठी हा रचनाप्रकार अधिक उपयुक्त ठरतो. या आत्मनिवेदनात्मक प्रकारामुळे मूळ लेखकाचे अस्तित्व झाकून सत्याभास निर्माण करण्यास मदत होत असल्यामुळे या आत्मनिवेदनपर व प्रथमपुरुषी भूमिकेचा आश्रय घेतला जातो. जीवनदृष्टीच्या आविष्कारासाठी ही पद्धत रास्त आहे. ''सुखदेव मामा मोलमजुरी करून जगला. मोहफुलं खाऊन जगला. पोटात अन्न पडायचं नाही पण त्याने पुस्तकाची साथ सोडली नाही. एक शर्ट दोघं मिळून घालायचो.'' (पृष्ठ २८) या वाक्यांमधून ही मांडणी आली आहे. खायला अन्न नसेल तरी शिक्षण महत्त्वाचे हा आंबेडकरी दृष्टिकोन अचूकपणे मांडलेला दिसतो. अत्यंत दाहक वास्तवाची, दारिद्र्याची ही कहाणी आहे. तरीही आक्रोश, दुराग्रह यांचा लवलेशही

अनुक्रमणिका

लेखिकेच्या भाषेत नाही. सुबोध, समतोल, साक्षेपी, टोकदार, भाषाशैलीने विषय वाचकांच्या हृदयापर्यंत पोचवला आहे. दारिद्र्यातून, कष्टातून वाट काढत सागर अखेरीस वकील-न्यायाधीश पदापर्यंत पोहोचतो. हा आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा विकास लेखिकेने अत्यंत कुशलतेने चितारला आहे.

अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे तत्त्वज्ञान म्हणजे आंबेडकरी तत्त्वज्ञान आहे. 'फुटपाथ ते नोटरी' या कादंबरीने त्याची प्रचीती दिली आहे. दलित साहित्याच्या विकासाचा हा टप्पा आहे. कालपर्यंत ज्या सागरचे स्थान भारतीय समाजात आणि विकासाच्या प्रक्रियेत गौण होते, ते स्थान आज विकासप्रक्रियेत प्रधान आहे. ही विकासाच्या वाटचालीची यशोगाथा आहे. भौतिक प्रगतीचा मार्ग अर्थसत्तेतून जातो पण आत्मोन्नतीचा मार्ग विचार-तत्त्वज्ञान-कला संस्कृतीतून जातो हे या कादंबरीने अधोरेखित केले आहे.

• • •

फुटपाथ ते नोटरी (कादंबरी)
सुजाता लोखंडे,
ग्रंथाली, मुंबई, २०१६,
मूल्य १८० रु.

▪ **डॉ. सुनील रामटेके,** सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई.

२०१६ मधील प्रकाशित पुस्तके

- अमोल उकिडवे
  जगरहाटी ४९० रु.
- बाबू मोशाय
  खोया खोया चाँद ४९९ रु.
- श्रीकांत पाटील
  भावरवीन्द्रांजली १०० रु.
- किशोर बळी
  धुम्मस १५० रु.
- अनु. चंद्रकांत भोंजाळ
  ब्रेकिंग न्यूज ३०० रु.
- डॉ. संजय बजाज
  डॉक्टर मला वाचवा-पडण्यापासून २०० रु.
  उत्तरायण (दुसरी आवृत्ती) २०० रु.
- श्याम पेठकर
  ऋतुस्पर्श (दुसरी आवृत्ती) २५० रु.
- विजया ब्राह्मणकर
  सोनेरी सांज (दुसरी आवृत्ती) २५० रु.
- शंकर बडे
  धापाधुपी २०० रु.
- सौ. वसुमती धारप
  गोष्ट सत्यवान् सावित्रीची २५० रु.
- पुष्पा नागपुरे
  ऊनपाऊस ४०० रु.
- डॉ. संध्या पवार
  समाजभान १५० रु.
- संपादक - डॉ. मनोहर रोकडे
  मराठी शुद्धलेखन पॉकेट डिक्शनरी ३० रु.
- अनु. डॉ. ओमप्रकाश गुप्ता
  उत्तरायण (हिंदी) २०० रु.
- डॉ. रंजना वाघ्रळकर
  आयुर्वेदिक गर्भसंस्कार १०० रु.
- डॉ. ऊर्मिला चाकूरकर
  काळोखकशिदा २०० रु.
- डॉ. चारुशिला ओक
  शहाणी पहाट २५० रु.
- हेमंत चोपडे
  सावरकर-आंबेडकर (दुसरी आवृत्ती) २५० रु.
- राजा भोयर
  दुर्गी... द सेकंड लेडी ४५० रु.
- मराठी अनुवाद- डॉ. वसुधा सहस्रबुद्धे
  मंटोच्या निवडक कथा ५०० रु.
  प्रतिक्षा मंटोची २०० रु.
- राजा नाईकवाडे
  राजसी ३५० रु.
- संपादन - भाग्यश्री पेठकर
  बोलु कवतिके २०० रु.
- आशा सावदेकर
  प्रकाशाचे झुंबर ३०० रु.
- सुमेध वडावाला (रिसबूड)
  माणसं घडवणाऱ्याची गोष्ट ४५० रु.
- मनीषा साधू
  पुरुषांच्या देशात २०० रु.
- डॉ. रवींद्र शोभणे
  पांढरे हत्ती ४०० रु.
- महावीर जोंधळे
  हिरवे ढग २०० रु.
- विजया राजाध्यक्ष
  ओ-पॉझिटिव्ह २५० रु.
- सुरेश भट
  रंग माझा वेगळा (अकरावी आवृत्ती) १५० रु.

विजय प्रकाशन
हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपूर ४४००१२ / फोन : (०७१२) २५३०५३९, ६६०४०५०
Website : www.vijayprakashan.com, E-mail : vijayprakashan@gmail.com

विदर्भ साहित्य संघ

मकर संक्रांत १९२३

कार्यवृत्त

(ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर २०१६ या काळातील)

- **दि. ९ ऑक्टोबर २०१६ :**
  विदर्भ साहित्य संघ व सिने मोंटाज यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपटांचे प्रदर्शन झाले.

- **दि. १४ ऑक्टोबर २०१६ :**
  ज्येष्ठ वैदर्भीय कवी उ. रा. गिरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कोजागिरी निमित्ताने नवोदितांच्या कविसंमेलनाचे आयोजन झाले. ज्येष्ठ कवी विनोद मोरांडे कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. इरफान शेख ह्यांनी सूत्रसंचालन केले. संजय तिजारे, पुनम चव्हाण, मंजूषा काऊटकर, शीतल सोनावणे, माधुरी सेलोकर, सावन धर्मापुरीकर, प्रशांत झिलपे, वर्षा ढोके, मंगला रामापुरे, भारती दवणे, चित्रा कहाते, सायली लाखे, केतकी कानिटकर, जगदीश राजूरकर, अभय नवाथे, स्नेहल मुळे, नमिता माने, प्रतिभा माने, प्रतिभा गवळी, पवन कामडी व देवयानी मोहगावकर या कवींचा कविसंमेलनात सहभाग होता.

- **दि. २२ ऑक्टोबर २०१६ :**
  ज्येष्ठ लेखक-नाटककार डॉ. ईश्वर नंदपुरे यांच्या 'चेहेरे आणि मुखवटे' या एकांकिकासंग्रहाचे प्रकाशन झाले... आचार्य अ. द. वेलणकर हे प्रमुख अतिथी होते. प्रकाश एदलाबादकर ह्यांनी एकांकिका-संग्रहावर मनोगत व्यक्त केले.

- **दि. ४ नोव्हेंबर २०१६ :**
  जागतिक मराठी रंगभूमी दिनानिमित्त मराठी संगीत नाटकातील गाजलेल्या नांदी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. प्रकाश एदलाबादकर ह्यांच्या संकल्पनेतून ह्या कार्यक्रमाची निर्मिती झाली. वसंतराव नाईक शासकीय समाजविज्ञान संस्था (मॉरिस कॉलेज), श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, एल. ए. डी. व श्रीमती रत्नीबाई पुरोहित महाविद्यालय आणि कै. राधाबाई कानिटकर संगीत विद्यालय यांमधील ४० विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा यात सहभाग होता. कार्यक्रमात एकूण बारा नांदगीते सादर झाली. ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. राम म्हैसाळकर आणि ज्येष्ठ लेखिका आशा बगे हे प्रमुख अतिथी होते. संवादिनीवर राहुल मानकर व तबल्यावर श्रीधर कोरडे यांनी संगती केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन सहस्रबुद्धे यांनी केले. प्रकाश एदलाबादकर यांनी निवेदन केले.

- **दि. ९ डिसेंबर २०१६**
  ग. त्र्यं. माडखोलकर व्याख्यानमालेत महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक श्रीपाद अपराजित ह्यांचे 'प्रगती, प्रजा व प्रसारमाध्यमे' ह्या विषयावर व्याख्यान झाले. विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग अध्यक्षस्थानी होते.

- **दि. २३ डिसेंबर २०१६**
  विदर्भ साहित्य संघ, सप्तक व ऑरेंज सिटी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल यांच्या संयुक्त विद्यमाने 'अवेकनिंग' ह्या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय ब्रेन सप्ताहानिमित्त आयोजिलेल्या ह्या कार्यक्रमात डॉ. जब्बार पटेल व डॉ. चंद्रशेखर मेश्राम विशेषत्वाने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन सहस्रबुद्धे यांनी केले.

विलास मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय आणि
विद्वत्‌रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय
ह्यांचा संयुक्त उपक्रम : ग्रंथसहवास

कार्यवृत्त

(आक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर २०१६ या काळातील)

• **वाचन प्रेरणा दिन** : देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन दि. १५ आक्टोबर २०१६ रोजी 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून ग्रंथसहवासमध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात ज्येष्ठ हिंदी लेखक डॉ. सरजूप्रसाद मिश्र, डॉ. राजेन्द्र नाईकवाडे, विशाखा मोरोणे, पत्रकार श्री. चारुदत्त कहू, आभाराणी पटवर्धन (आकाशवाणी वृत्तनिवेदिका), डॉ. पराग घोंगे, डॉ. ईश्वर नंदपुरे आणि डॉ. अरुंधती वैद्य यांनी सहभाग घेतला.

• **ग्रंथचर्चा** : उदयोन्मुख कवयित्री सौ. ज्योत्स्ना पंडित यांच्या 'मनवा' या काव्यसंग्रहावर आधारित 'मनःपूर्वक' हा ग्रंथचर्चेचा कार्यक्रम घेण्यात आला. या ग्रंथचर्चेत ज्येष्ठ लेखिका डॉ. जुल्फी शेख, प्रा. विवेक अलोणी, प्रा. ऋता धर्माधिकारी, डॉ. रजनी हुद्दा, प्रा. गायत्री ताजने, कु. प्रतीक्षा महंत, साक्षी नागमोते, शर्वरी पेटकर इत्यादी रसिक-अभ्यासकांनी सहभाग नोंदविला.

• **ग्रंथपूजन** : दीपोत्सवाच्या काळात पंचमीच्या दिवशी ग्रंथालयाचे सभासद डॉ. मुक्ता जतकर यांच्या कुटुंबीयांना ग्रंथपूजनासाठी आमंत्रित करण्यात आले. यावेळी सुजाता लोखंडे, डॉ. विनिता हिंगे, डॉ. अरुंधती वैद्य, श्री. जयंत उमरेडकर, करुणा भाकेतकी कानिटकर, अरविंद पुराणिक, सुचिता खनगई, नितीन सहस्रबुद्धे, प्रभा देऊसकर, राज मेहर इत्यादी मंडळी उपस्थित होती.

• **उजळणी वर्गातील प्राध्यापकांची सदिच्छा भेट** : रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागातर्फे आयोजित मराठी उजळणी वर्गातील प्राध्यापकांनी डॉ. शैलेंद्र लेंडे यांच्या मार्गदर्शनात ग्रंथसहवासला सदिच्छा भेट दिली. ग्रंथसहवासचे समन्वयक दिलीप म्हैसाळकर आणि ग्रंथालय संचालक डॉ. अरुंधती वैद्य यांनी प्राध्यापकांशी सुसंवाद साधून ग्रंथालयीन उपक्रमांचा विस्तृत परिचय करून दिला.

• **संविधान दिवस** : दि. २६ नोव्हेंबर २०१६ रोजी ग्रंथसहवासतर्फे संविधान दिनाचा सोहळा संपन्न झाला. 'भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि मुलभूत कर्तव्य' या विषयावरील परिचर्चेत डॉ. इंद्रजित ओरके, डॉ. संजय गोहोणे, राज मेहर, आभाराणी पटवर्धन, अधिवक्ता गणेश खानझोडे यांनी अभ्यासपूर्ण मते मांडलीत. यावेळी कवी राज मेहर यांच्या 'संविधान' या कवितेचे डॉ. अरुंधती वैद्य यांनी अभिवाचन केले.

• **ग्रंथभेट** : मराठी साहित्याच्या प्रसिद्ध अभ्यासक डॉ. श्यामला मुजुमदार यांनी ग्रंथसहवासला एकूण २३० पुस्तकांची मौलिक ग्रंथभेट दिली.

• **रचनेच्या खोल तळाशी** : 'रचनेच्या खोल तळाशी' या काव्यविषयक विशेष उपक्रमात श्रेष्ठ कवी बाळ सीताराम मर्ढेकर, भारतीय ज्ञानपीठ विजेत्या कवयित्री अमृता प्रीतम आणि मराठीतील विज्ञानकविता समृद्ध करणारे डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांच्या काव्यनिर्मितीची चिकित्सक मीमांसा करण्यात आली. या कार्यक्रमात मर्ढेकरी काव्यावर डॉ. गिरीश सपाटे, अमृता प्रीतम यांच्या कवितेवर डॉ. जुल्फी शेख आणि शिरीष गोपाळ देशपांडेंच्या विज्ञानकाव्यावर डॉ. राजेन्द्र नाईकवाडे या मान्यवरांची मीमांसक भाषणे झालीत.

• **कथनांजली** : 'कथनांजली' या विशेष उपक्रमातून मराठीतील कविता, कथा आणि कादंबरी क्षेत्रांत महनीय कर्तृत्व गाजविणाऱ्या बी. रघुनाथ यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाला आणि कर्तृत्वाला उजाळा देण्यात आला. यावेळी श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी आपल्या व्याख्यानातून बी. रघुनाथांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची लक्षणीय मांडणी केली. तसेच अभियंता अभिषेक वाघमारे यांनी बी. रघुनाथांच्या 'धर्म बुडत चालला आहे' आणि 'बेगम सकीना' या दोन लघुकथांचे अभिवाचन केले.

- डॉ. अरुंधती वैद्य, संचालक, ग्रंथालय

अनुक्रमणिका

ग्रंथालयासंबंधी काही निवडक अभिप्राय

विदर्भ साहित्य संघाच्या वाचनालयातील हा ग्रंथोत्सव भारावून टाकणारा आहे. येथील नेपथ्य, प्रकाशयोजना, आसनव्यवस्था सगळे अगदी घरचा जिव्हाळा देणारे आहे. काय म्हणू? शब्दाच्या या जगात मी निःशब्द!

- प्रवीण दवणे, मुंबई

आज एक यादगार दिवस! विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथसहवासला भेट देण्याचा योग आला. एका अतिशय देखण्या, नेटक्या ग्रंथालयात इतकं रमायला झालं की पाय निघत नव्हता. 'पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही' हा 'एहसास' व्हायला मदत झाली... शुक्रिया, आभार!

- भीमराव पांचाळे, मुंबई

प्रत्येक वास्तूला स्वतःची काही स्पंदने असतात. संवेदनशील मनाला ती जाणवतात... आणि संवेदना जाग्या होतात. असाच एक सुखद अनुभव विदर्भ साहित्य संघाच्या 'ग्रंथसहवास'मध्ये आला. दिलीपराव म्हैसाळकर यांच्या अविश्रांत तळमळीला मनापासून सलाम.

- आशुतोष अडोणी, नागपूर

आज विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयाला भेट देण्याचा योग आला. दुर्मीळ ग्रंथसंपदेचे जतन-संवर्धन जवळून बघण्याचा हा आनंदक्षण होता. एक आगळे-वेगळे ग्रंथसंग्रहालय पाहायला मिळाले. माझ्या मनापासून शुभेच्छा.

- अरुण शेवते, पुणे

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक 'युगवाणी'बद्दल वार्षिक निवेदन

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाची मालकी व इतर बाबी यांच्यासंबंधी वृत्तपत्रे आणि पुस्तक नोंदणी अधिनियम, कलम डी १९(बी) आणि वृत्तपत्रे नोंदणी (केंद्रीय) नियमावली १९५६, नियम, ८, नमुना ४, यांना अनुसरून केलेले निवेदन.

०१. **प्रकाशनस्थळ :** नागपूर, महाराष्ट्र

०२. **प्रकाशनाची कालनियतता :**
त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

०३. **प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
विलास गंगाधर मानेकर, भारतीय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर - ४४० ०१२.

०४. **मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
माधव प्रकाश लोखंडे, भारतीय, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर - ४४० ०२२.

०५. **मुद्रणस्थळ :** मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर - ४४० ०२२.

०६. **संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
अनिल सेवकराम नितनवरे, भारतीय, 'जातक', स्नेहनगर, नागपूर मार्ग, भंडारा-४४१ ९०४.

मी विलास गंगाधर मानेकर, असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

विलास गंगाधर मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर (प्रकाशक)

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

मकर संक्रांत १९२३

आमची प्रकाशने

• **मराठी वर्णोच्चार विकास** : डॉ. द . ह. अग्निहोत्री	१००.०० रु.
• **लोकसाहित्य संपदा** : संपादक : ना. रा. शेंडे	१००.०० रु.
• **आणखी गडकरी** : डॉ. मधुकर आष्टीकर	२५.०० रु.
• **तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७** : डॉ. र. शं. केळकर	६०.०० रु.
• **'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथासंग्रह (१९८०)** : संकलन : प्रा. ज. रा. फणसाळकर	१००.०० रु.
• **समग्र बजाबा** : संपादन / संकलन - द. भा. प्रधान	१००.०० रु.
• **ज. के. उपाध्ये यांची कविता (१८८३ - १९९३)** : संपादन : डॉ. आशा सावदेकर	१००.०० रु.
• **दक्षिणेतील दोन आचार्य** : तर्कतीर्थ लक्ष्मशास्त्री जोशी	२०.०० रु.
• **कविता विदर्भाची** : संपादन : डॉ. आशा सावदेकर	१२५.०० रु.
• **छंदःशास्त्र : एक अध्ययन** : कुंदर दिवाण	४०.०० रु.
• **वसंत वैभव : (कै. व. कृ. वऱ्हाडपांडे)** : संपादन : डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुलकर्णी	१५०.०० रु.
• **धन्यतेची थाप** (निवडक प्रस्तावना) : डॉ. वि. भि. कोलते	१००.०० रु.
• **वक्ता दशसहस्रेषु** : (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) - संपादक : डॉ. वि. स. जोग	१५०.०० रु.
• **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड १** : संपादक : सा. भू. तु. ना. काटकर	२००.०० रु.
• **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड २** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	२५०.०० रु.
• **विविध प्रवाही साहित्य संमेलनांची अध्यक्षीय भाषणे** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	३००.०० रु.
• **युगवाणी साहित्य सूची** : संपादक : केशव जोशी	१००.०० रु.
• **युगवाणी साहित्य सूची** (पुरवणी) : संपादक : केशव जोशी	७५.०० रु.
• **वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८)** : संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी	१००.०० रु.
• **कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुटलेखन, ३ खंड : तुलाधर, चित्रगुप्त, त्रिविक्रम** : संपादक : प्रा. राम शेवाळकर	१०००.००रु.
• **विदर्भ साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका (१९९९)** : संपादन : वामन तेलंग	२००.०० रु.
• **युगवाणी : ग. त्र्यं. माडखोलकर विशेषांक १९९८** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर	१००.०० रु.
• **युगवाणी : कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक (२००४-०५)** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर	१००.०० रु.
• **युगवाणी : वसंत आबाजी डहाके विशेषांक** : संपादक - प्रा. अजय देशपांडे - २०११-१२	१००.०० रु.
• **युगवाणी : ग्रेस विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे २०१२-१३ (आवृत्ती संपली)	
• **युगवाणी : नामदेव ढसाळ विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे - २०१३-१४	१००.०० रु.
• **निवडक युगवाणी भाग १** : संपादक : वामन तेलंग - २०१४-१५	३५०.०० रु.
• **निवडक युगवाणी : भाग २** : संपादक : वामन तेलंग - २०१५-१६	३५०.०० रु.

विदर्भ साहित्य संघाने आजवर प्रकाशित केलेल्या दुर्मिळ २० ग्रंथांचा संच २००० रुपयांत उपलब्ध (पार्सल खर्च वेगळा). महाविद्यालये, ग्रंथालये आणि अभ्यासकांनी संपर्क करावा.



श्रद्धांजली

क्रांतिकारी लोकनेते आणि क्युबाचे माजी राष्ट्राध्यक्ष
फिडेल कॅस्ट्रो
१३ ऑगस्ट १९२६ - २५ नोव्हेंबर २०१६

~~~

ज्येष्ठ कथा-कादंबरीकार आणि लेखक
आनंद यादव
३० नोव्हेंबर १९३५ - २७ नोव्हेंबर २०१६

~~~

ज्येष्ठ विचारवंत
वसंत पळशीकर
१८ फेब्रुवारी १९३६ - २९ आक्टोबर २०१६

~~~

प्रसिद्ध अर्थचिंतक आणि अनेक सामाजिक चळवळींच्या अग्रणी
सुलभा ब्रह्मे
१९३२ - १ डिसेंबर २०१६

~~~

सुविख्यात आंबेडकरी कथा-कादंबरीकार
वामन होवाळ
१ एप्रिल १९३८ - २३ डिसेंबर २०१६

तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री
जयललिता जयराम
२४ फेब्रुवारी १९४८ - ०५ डिसेंबर २०१६

~~~

प्रख्यात पार्श्वगायक आणि संगीतकार
एम. बालमुरलीकृष्ण
६ जुलै १९३० मे २२ नोव्हेंबर २०१६

~~~

ज्येष्ठ व्यंगचित्रकार
वसंत सरवटे
३ फेब्रुवारी १९२७ - २४ डिसेंबर २०१६


~~~

ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत
दिलीप पाडगावकर
१ मे १९४४ - २५ नोव्हेंबर २०१६.

~~~

प्रसिद्ध समीक्षक, लेखक
प्रा. गोविंद देशपांडे
२५ आक्टोबर १९३९ - १० नोव्हेंबर २०१६

अनुक्रमणिका



IMPORTANT FEATURES OF THE INSTITUTION

- Expert and Efficient Teaching Staff
- Well-Equipped Laboratory
- Various Training Under Vocational Courses.
- Study Center for YCMOU
- District Center for YCMOU
- Guest Lecture of eminent personality
- Hostel Facility for Girls.
- Well-Equipped Gymnasium.
- Spoken English Classes in Language Lab.
- Book Bank Facility.
- Student aid fund facility
- Laboratories equipped with LCD Projector
- Blood Collection Centre
- UGC sponsored certificate/Diploma Courses
- Excellent Sports, culture with summer coaching and gymnasium
- Well equipped Library with latest Computers.
- International and National Journals.
- Internet Facility for Students.
- Best Results in University exam.
- Placement Facility.
- Research Journals for students.
- Internet facility for students.
- e-learning facility
- Bank Facility in College Campus
- 45 K.V. Generator Facilities.
- NCC & NSS unit for Boy's & Girl's
- Centre for Higher Learning & Research

COURSES UNDERTAKEN

1) Junior (11th & 12th)

Arts, Commerce, Science,
MCVC- (Cookery, Purchasing & Storekeeping, Accounting& Auditing),
Vocational Courses - (Banking & Marketing)

2) Senior (Graduation)

Arts : B. A. (Marathi & English),
Commerce : B. Com. (Marathi & English),
Science : B. Sc.
Home Science : B.F.D.
Library Science : B. Lib. Sci.
Computer Sci. : B.C.C.A. (Commerce),
: B.C.A. (Sci.), B.Sc.(I.T.),

3) Post Graduation

Arts : English, Marathi, Hindi, History, Economics, Home Economics, Geography, Political Science, Sociology,
Commerce : M. Com.
Science : M. Sc. : (Physics, Chemistry, Zoology, Computer Science, Environmental Science, Mathematics, Microbiology,Biotechnology)
Library Science : M. Lib. Sci.
Home Science : M.F.D.

4) Diploma Courses

- Certificate Courses in Library Science

5) P. G. Diploma Course

- PGDCSA,

6) Professional Course

- M. A. (Mass Communication)
- MCA,
- MCM,
- M. Phil (Commerce)

7) Centre for Higher Learning & Research

Recognized by Gondwana University, Gadchiroli

- Science Faculty
  i) Chemistry
  ii) Microbiology
  iii) Math
  iv) Computer Science
  v) Zoology
  vi) Environmental Science
- Arts Faculty
  i) English
  ii) Marathi
  iii) Hindi
- Social Science
  i) Geography
  ii) Economics
  iii) History
- Commerce Faculty
  i) Commerce
  ii) Business Economics
  iii) Business Management & Administration

Shri. Shantaram Potdukhe
President
Sarvodaya Shikshan Mandal

Shri. Prashant Potdukhe
Secretary
Sarvodaya Shikshan Mandal

Dr. R. P. Ingole
Principal
Sardar Patel Mahavidyalaya,

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका